कर्नाटक सरकार

# समाज विज्ञान

## भाग - 2

# SOCIAL SCIENCE

## Textbook
## Part 2

## मराठी माध्यम
## Marathi Medium

# 9

## इयत्ता 9 वी

## NINTH STANDARD

**KARNATAKA TEXTBOOK SOCIETY (R.)**

6th Cross, Malleswaram, Bengaluru - 560 085.

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# अनुक्रमणिका

D3M6E4


| पाठ क्रम | पाठ | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| | **इतिहास** | |
| 17. | अहोम राज्यघराणे, मोंघल आणि मराठे | 1 |
| 18. | भक्ति पंथ | 19 |
| 19. | युरोप मध्य युग आणि आधुनिक युग | 26 |
| 20. | क्रांती आणि राष्ट्र-राज्यांचा उदय | 40 |
| | **राज्यशास्त्र** | |
| 21. | निवडणूक प्रक्रिया | 52 |
| 22. | देशाची संरक्षण व्यवस्था | 63 |
| 23. | राष्ट्रीय एकात्मता | 79 |
| 24. | आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यासाचा परिचय | 84 |
| | **समाजशास्त्र** | |
| 25. | सामाजिकिकरण आणि कौटुंबिक नाते संबंध | 90 |
| 26. | समुदाय | 96 |
| | **भूगोलशास्त्र** | |
| 27. | कर्नाटकातील खनिज संपत्ती | 103 |
| 28. | कर्नाटकातील वाहतूक व्यवस्था | 107 |
| 29. | कर्नाटकातील उद्योगधंदे | 115 |
| 30. | कर्नाटकातील प्रमुख पर्यटन केंद्रे | 122 |
| | **अर्थशास्त्र** | |
| 31. | पैसे आणि कर्ज | 127 |
| 32. | श्रम आणि उद्योग | 139 |
| | **व्यवहार अध्ययन** | |
| 33. | बाजाराचे व्यवस्थापन | 147 |


NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

प्रकरण-17 वे

B2X5X7

# अहोम राज्यघराणे, मोंघल आणि मराठे

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल.**
- *अहोम राज्यघराणे आणि त्यांचे कार्य.*
- *मोंघल राज्यकर्ते.*
- *मोंघल सुलतानांचे साहित्य, कला आणि शिल्पकलेतील योगदान.*
- *मराठ्यांच्या उदय आणि छत्रपती शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था.*

## अहोम राज्य घराणे:



**अहोम राज्य घरणांचे राजचिन्ह**

अहोम हे मूळ मंगोलीयन वंशातील शान जमातीतील एक गट होता. ते 13 व्या शतकाच्या सुरुवातीला आतांच्या म्यानमार आणि थायलंडमधून भारतातील आसाम मध्ये स्थायिक झाले. ते बाहेरून आले असले तरी त्यांनी भारताची संस्कृती फार लवकर आत्मसात केली. 1228 मध्ये त्यांनी स्वतंत्र राज्य स्थापन केले. या घरान्याचा सुकपा हा संस्थापक होता. चेरोई ही त्यांची पहिली राजधानी होती त्यांने खिलजी, लोदी, बंगालचा सुलतान यांचे ही हाल्ले परतावून लावले. मोंघल राजा औरंगजेबने अहोम राज्य जिंकण्यासाठी घाट घातला. औरंगजेबच्या सैन्याने बंगालला वेढा घातला व तो प्रदेश जिंकला आणि ब्रम्हपुत्रा नदीकाठी चाल करून अहोम राज्य गाठले औरंगजेब व अहोम यांच्यात घणघोर युद्ध सुरु झाले यात औरंगजेब विजयी झाला अहोमाना बराचसा भूभाग गमवावा लागला. अहोम राजा जयध्वज सिंह राज्याला अंत्यत अपमानास्पद तडजोड करावी लागली.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## चक्रध्वज सिंह :



**सुकपा: अहोम संस्थापक**

जयध्वज सिंह यांच्या मृत्यूनंतर चक्रध्वज सिंह हा अहोम राज्याचा राजा झाला. लचित हा त्यांचा प्रमुख सेनापतीत होता. सेनापती या पदाला बोर्फुकन असे म्हणत. तेव्हा पासून 'लचित बोर्फुकन' झाला. त्यांनी अहोम सैन्याला बळ दिले आणि शस्त्रास्त्राचे आधुनिकीकरण केले. अहोम भूमीतुन मोंघलाना हकलून लावण्यासाठी त्यांनी इटाकुली

किल्ला ताब्यात घेतला त्याने किल्याला वेडा घातला आणि मोंघल अधिकारी आणि सैनिकांना हकलून लावले अशा प्रकारे गुहाती पर्यंत अहोम राज्य विस्तारले.




**अलबोई युद्ध :**

यानंतर अलबोई मैदानावर मोंघल आणि अहोम सैन्यात घनघोर युद्ध झालेल्या लढाईत अहोम सैन्याने विजय मिळविला असलातरी त्यांना अनेक सैनिक गमवावे लागले.



**लचित सेनापती**

**सराई घाटचा लढाई :**

1670 मध्ये चक्रध्वज सिंहच्या मृत्यूनंतर उद्यादित्य सिंह यांनी सत्ता आपल्या हाती घेतली. त्यांनाही मोगलांच्या आक्रमनाला तोंड द्यावे लागले. 1671 मध्ये मोंघल आणि अहोम सैन्य सराईघाट येथे भिडले. ब्रम्हपुत्रा नदीवरील या नौदल युध्दात अहोम सैन्याने बलाढ्य मोंघल सैन्यावर विजय मिळवला. या युध्दानंतर वर्षभरातच गंभीर आजाराने लचितचा मृत्यू झाला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शेवटचे अहोम मोंघल युद्धः**

अहोम-मोंघल शेवटची लढाई 1682 मध्ये झाली. तेव्हा गदाधर सिंह हा राजा होता. मोंघल सैन्याचा अत्यंत यशस्वी पणे पराभव करणाऱ्या गदाधर सिंहाने केवळ मोंघलांच्या अधिपथ्याखालील सर्व अहोम प्रदेश काबीज केला नाही तर त्यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर विजय संपादन केला. ब्रम्हपुत्रेच्या सर्व भूभागातून मोंघलांना हुसकावून लावले आणि आपले साम्राज मानस नदीपर्यंत वाढाविले.

अहोम राजांनी वेळोवेळी एकूण सहा ठिकाणांचा आपली राजधानी म्हणून विकास केला. संपूर्ण ईशान्य भागावर संघटित होऊन राज्य करने हे त्यांचे कर्तव्य होते.

अहोम राज्यांनी अनेक दशकांमध्ये मोंघलांचा जोरदार प्रतिकार केला आणि 17 लहान मोठ्या लढायांमध्ये त्यांचा पराभव केला. 1228 मध्ये स्थापन झालेल्या या घराण्याने 598 वर्षे राज्य केले. 1826 मध्ये या घराण्याचा ऱ्हास झाला.

## भारतातील मोंघलाचे शासन (1526-1707)

**बाबरः** भारतात मोंघल सत्तेचा पाया घालणारा बाबर मूळचा तुर्कस्थानचा होता. त्याचे वडिल उमरशेख मिर्झा अफगाणीस्तानातील छोट्या प्रांताचे परगण्याचे राजे होते.

वडिलांच्या मृत्यूनंतर वयाच्या 11 व्या वर्षी बाबर गादीवर बसला. स्वतःचे राज्य हातातून गेल्यामुळे कांही काळ तो भटके जीवन जगत असतानाच भारतावर आक्रमण करण्याची लालसा निर्माण झाली. त्याने भारतावर पाच वेळा आक्रमण केले. 1526 च्या पानिपतच्या लढाईत दिल्लीचा राज्यकर्ता इब्राहिम लोदीचा पराभव करून भारतात मोंघल सत्तेला प्रारंभ केला. यालाच पानिपतचे पहिले युद्ध असे म्हटले जाते. पुढील चार वर्षे दिल्ली ही त्याची राजधानी होती. त्याने मेवाडचा राजा संग्रामसिंग, चंदेरीचा राजपूत राजा मेदीनारायण आणि इब्राहिम लोदीचा भाऊ मोहम्मद याना पराभूत केले. बाबरने पानिपत, घोग्रा आणि कन्व जिंकले. त्यांने उत्तर भारतात मोंघलांचे वर्चस्व निर्माण केले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**तुम्हाला हे माहित आहे का?**

*(तुझुक-ई-बाबरी) बाबरनामा: बाबरने आपले तुर्की भाषेमध्ये आत्मचरित्र लिहिले आहे. राजकीय घडामोडी सोबतच निसर्गाची वैशिष्ट्ये, सौंदर्य आणि वनस्पती, वेगवेगळ्या उद्यानांचे वर्णन केलेले आहे. बाबर हा कवी आणि उत्तम कलाकार होता. अब्दुल रहिम खानने बाबरचे आत्मचरित्र पर्शियन भाषेत भाषांतर केले आहे.*

**हुमायून:**

हुमायून हा मोंघलांचा दुसरा बादशहा आणि बाबरचा जेष्ठ पूत्र होता. राज्यावर येताच त्याला असंघटित राज्य, अफगाणांच्या स्वाऱ्या, गुजरातच्या बहाद्दूरशहाचे वैरत्व आणि स्वतःच्या भावांचे असहकार इत्यादी समस्यांना तोंड घावे लागले. त्याने कलिंजरचा किल्ला, दौराजोनपूर, चिनारकोट, मंडसर इत्यादी जिंकले. शेरशहाने हुमायूनचा पराभव केला. तेंव्हा हुमायुनने सिंध प्रातांत आश्रय घेतला. शेरशहाच्या मृत्यूनंतर हुमायून पुन्हा राज्यकर्ता बनला.

**तुम्हाला हे माहित आहे का?**

*राज्यकारभाराची व्यवस्था पहाण्यासाठी चार विभाग होते. दिवान-ई-इन्सा, दिवान-ई-अरीज, दिवान-ई-वजारत, आणि दोन उपविभाग दिवान-ई-खाजा, आणि दिवान-ई-मामलिक होते.*

**शेरशहा:**

शेरशाहा ह मुळचा अफगाणिस्तानातील सूर कुळातील होता. शेरशहाचे मूळ नांव फरीद असे होते. तो सूर साम्राज्याचा संस्थापक होता. त्याचे बालपण खूप कष्टात गेले. आईवडिलांच्या प्रेमापासून वंचित शेरशहा बराच काळ भटके जीवन जगला. दक्षिण बिहारचा सुलतान बहादरखान लोहाली यांच्या पदरी कामाला असताना त्याने वाघाला ठार मारल्याने त्याला शेरखान असे नांव दिले गेले. बाबरच्या काळात देखील शेरशहाने मोंघल साम्राज्यात महत्वाची कामगिरी बजावली.

शेरशहाने हुमायूनचा पराभव करून पंजाब, सिंध, मुलतान, ग्वालिहर, माळवा, रैसिनदुर्ग, मारवाड आणि कल्लिंजर किल्ले जिंकले.

**तुम्हाला हे माहित आहे का?**

*चार प्रमुख महामार्ग*

*1) सोनारगांव पासून प्रारंभ होऊन आग्रा-दिल्ली आणि लाहोर मधून सिंधू नदीच्या काठापर्यंत असलेल्या मार्गाला सडक-ई-आझम असे म्हटले जाते.*

*2) आग्रा ते बुरहानपूर*

*3) आग्रा ते चितोड*

*4) लाहोर ते मुलतान*

*राज्य मार्गाच्या दोन्ही कडेने सावली देणारी झाडे. प्रवासासाठी 1700 विश्रांती स्थानके बांधली.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शेरशहाच्या राज्यकारभार:**

आसाम, गुजरात आणि काश्मीर व्यतिरिक्त शेरशहाचे साम्राज्य उत्तर भारतात पसरले. त्याच्या संरक्षण विभागात सुमारे 25,000 पायदळ 1,50,000 घोडे आणि 500 हत्ती होते. अश्वदळ अतिशय प्रबळ होते. सैन्याची वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये विभागणी करून त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी फौजदार नेमले होते. शेरशहा स्वतः सैन्य, युद्ध सामग्री आणि दारुगोळा, सैन्यातील शिस्त यावर जातीने लक्ष्य ठेवत असे. सैनिकी फौजाकडून पिकांना नुकसान झाले तर शेतकऱ्याना सरकारकडून नुकसान भरपाई दिली जात असे. शेरशहाने दिल्ली, रोहतास, कनोज आणि पटना येथे नवीन किल्ले बांधले.

राज्यातील जमिनीची उत्पादन क्षमतेनुसार वेगवेगळे विभाग पाडले होते. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नाच्या 1/3 भाग कराच्या स्वरूपात सरकारला द्यावा लागे.

शेरशहा नि:पक्षपाती न्यायदानासाठी प्रसिद्ध होता. सुलतान हा सर्वोच्च न्यायाधीश होता. ते अंतिम सुनावणीवर निकाल देत असत. दर बुधवारी सायंकाळी न्यायदानासाठी दरबार भरविला जात असे. शेरशहाने दाम नावाचे नवीन चांदीचे नाणे चलनात आणले. त्याचे वजन 180 गुंजा होते. इतर मोंगल राज्यकर्त्यांनी त्याचेच अनुकरण केले.

**अकबर:**



अकबर

अकबर हा प्रसिद्ध सुलतान होता. त्याच्या जन्म सिंध प्रांतातील अमरकोट येथे झाला. हुमायून त्याचे वडील होते. अकबर वयाच्या 14 व्या वर्षी गादीवर आला. अकबर हा अल्पवयीन असल्याने त्याचा प्रतिनिधी बैराम खान याने राज्य कारभार पाहिला. हुमायूनच्या मृत्यूनंतर बंगालचा नवाब मोहम्मद शहा अब्दालीचा सेनापती हेमूने दिल्ली आणि आग्रा ताब्यात घेतले. हेच पानिपतचे दुसरे युद्ध 1556 मध्ये हेमू आणि मोंघलाच्यात लढले गेले. या युद्धात बैरामखानच्या मदतीने अकबराने हेमूचा पराभव केला. आपल्या प्रबळ सैन्याच्या बळावर अकबराने माळवा, जयपूर, गोंडवाना, चितोड, रणथंभोर, कलिंजर, गुजरात आणि बंगाल जिंकले. हलदी घाटाच्या लढाईला भारतीय इतिहासात खूप महत्त्व आहे. चितोडचा राजा राणा उदयसिंग याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा राणा प्रताप सिंग

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

गादीवर बसला. अकबराने सेनापती मानसिंग आणि असफखान यांच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य देऊन राणा प्रतापसिंग वर आक्रमण केले. हलदी घाटाच्या लढाईत मोंघल सैन्याचा विजय झाला. मेवाडचा बराचसा भाग राणा प्रतापसिंगकडे राहिला. काश्मीर, सिंध, ओरीसा, बलुचिस्तान, कंदहार, अहमदनगर अकबरच्या ताब्यात आले. अशा रीतीने मोंघल साम्राज्याचा प्रचंड विस्तार झाला.

**दिने-ई-इलाही:**

अकबराला आई, गुरू व सुफी संत यांची प्रेरणा घेतली. याचाच परिणाम म्हणून सर्व धर्मातील चांगली तत्त्वे समाविष्ट करून त्याने दिने-इ-इलाही या नवीन धर्माची 1582 मध्ये स्थापना केली. हा धर्म शांततापूर्ण सहजीवन (Sal-e-Kul) या तत्त्वावर आधारीत होता. या धर्मात सर्व धर्माचे महान विचार अंतर्भूत होते.

अबुल फजल हा या पंथाचा वरीष्ठ पुरोहित होता. हा धर्म विचारशीलता, अनुभव आणि निसर्ग शक्तीची आराधना याचे मिश्रण होते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**अकबराचे हिंदू विषयक धोरण:**

अकबराने हिंदू विषयी सहनशिलतेचे धोरण अनुसरले होते. त्याने आपल्या राजपुत पत्नीला राजमहालात देवपूजेला अनुमती दिली होती. त्याने हिंदू वरील जिझिया नावाचा कर काढून टाकला. त्याने हिंदू देवळांचे बांधकाम आणि जिर्णोद्धार केला. त्याने हिंदू धार्मिक पुस्तकाचे पर्शियन भाषेत भाषांतर केले. पात्र हिंदूची उच्च पदावर नियुक्ती केली. राजा तोडरमल हा प्रसिद्ध अर्थमंत्री होता. भगवान दास, मानसिंग, तोडरमल



आणि रायसिंग हे राज्यपाल होते. 12 प्रांताच्या अर्थमंत्री त्यापैकी आठ मंत्री हिंदू होते. रक्षाबंधन, दीपावली आणि शिवरात्री हे सण आपल्या दरबारात साजरे करण्याचे आदेश अकबराने दिले होते.

**अकबराचा राज्यकारभार :**

सुव्यवस्थित राज्यकारभारासाठी अकबराने आपले राज्य केंद्र सरकार, प्रांतीय सरकार, परगण्यामध्ये विभागले होते. मनसबदारी पद्धत हे त्यांच्या राज्यकारभाराचे वैशिष्ट्य होते. अकबर हा त्यांच्या विस्तृत साम्राज्याचा बादशहा होता. बादशहा हा सैन्यप्रमुख, कार्यकारी मंडळाचा प्रमुख आणि मुख्यन्यायाधीश होता. वकिल, दिवान, मिरबक्षी आणि मुख्य सदर हे चार मंत्री बादशहाला राज्यकारभारात सहाय्य करत असत. त्यांने राज्याची विभागणी वेगवेगळ्या प्रांतात केली होती. त्यांना सुभा असे म्हटले जात असे. असे एकूण 15 सुभे होते. प्रत्येक सुभ्यासाठी 'सिपाह-सालार' (राज्यपाल) दिवाण, बक्षी, सदर, पुरोहित, कोतवाल आणि वकीया नवीस असत. प्रत्येक जिल्हासाठी फौजदार, अमलगुजर, बक्षी असत. प्रांताचा राज्यकारभार शेखदार, अमिन, पोतदार आणि खांनुंगो पहात असत. अकबराने आपल्या सैन्यात वेगवेगळे विभाग निर्माण केले होते. याना मनसबदार असे म्हटले जात असे. सैन्यात पायदळ, घोडदळ, गजदळ, तोफखाना इत्यादि विभाग होते. घोड्यावर शिक्का मारण्याचे वेगळे खाते होते. त्याला दाग महाली असे म्हटले जात असे.

> **तुम्हाला हे माहिती असुदे:** अकबराचा राज्य कारभार पंधरा प्रातांत चालत असे प्रत्येक प्रांतात दिवाण बक्षी काझी, कोतवाल हे कारभार पहात असत प्रत्येक जिल्ह्यात फौजदार अलमगुजार पहात लहान खेड्यांचा कारभार अमिन पोतदार पहात असत.

**महसूल विभाग:**

महसूल पद्धत हे अकबराच्या शासन पद्धतीचे महत्वाचे वैशिष्ठ्य होते. त्याने जुबती पद्धत (रयतवारी पद्धत) अमलात आणली. बांबूला लोखंडी चिप बसवून त्याचा वापर जमिनीचे

> **तुम्हाला हे माहित आहे का?**
> *अकबराच्या दरबारातील नवरत्न 1) अब्दूल रहीम 2) अब्दूल फजल 3) बिरबल 4) फैजी 5) हमीद हुमान 6) राजा मानसिंग 7) शेख मुबारक 8) तानसेन 9) तोडरमल*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मोजमाप करण्यासाठी केला जात असे. जमिनीच्या उत्पादन क्षमतेनुसार पौलज (पिकावू), परौत (बागायत), चहर (कुरण), बंजर (नापिक) असे चार विभाग पाडले जात. बंजर जमिनिखेरीज उरलेल्या जमिनिवर माती आणि उत्पादन यावर आधारित उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशी विभागणी करून कर घेतला जात असे. शेतकऱ्यांना पट्टा म्हणजे विशिष्ठ जमिन बहाल केली जात असे.

अकबराच्या काळातील पोलीस दल (कोतवाल) सुनियोजित आणि कार्यक्षम होते. जिल्ह्यामध्ये फौजदार आणि परगण्यामध्ये महसूल अधिकारी राज्यकारभारात मदत करत. जिल्ह्यामध्ये हमरस्त्यावर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे कार्य पोलीस दल करत असे. परगण्यामध्ये पोलीसठाणी असत. अशा प्रकारे मध्ययुगात पहिल्यांदाच अकबराने कार्यक्षम राज्यव्यवस्था आणली. अकबराने कला व शिल्पकलेला प्रोत्साहन दिले. फत्तेपूर सिक्री येथील प्रमुख स्मारक, दौलतखाना, खाजाबाग, दप्तरखाना, इबादतखाना, मक्तबखाना, जोधाबाईचा महाल, पंचमहाल, बिरबल महल, कबुतर खाना इत्यादि महत्वाच्या इमारती होत.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED



**फत्तेपूर सिक्री येथील पंचमहल**

अकबरानंतर त्याचा मोठा मुलगा जहांगीराने राज्यकारभार सांभाळला. त्याच्या मृत्यूनंतर शहाजहान राज्यावर आला.

**शहाजहान:**



ताजमहल

***ताजमहल:*** *शहाजहानने आपली पत्नी मुमताजच्या स्मरणार्थ यमूना नदीच्या काठावर आग्रा येथे ताजमहाल बांधला. त्यांचे बांधकाम 1632 ला प्रारंभ करून 1653 ला पूर्ण केले. आग्रा उत्तर प्रदेशात आहे. ताजमहालाचे बांधकाम पांढऱ्या संगमरवरी दगडात बांधले आहे. हे जगातील सात आश्चर्यापैकी एक असून युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळापैकी एक आहे.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

शहाजहानने मयूर सिंहासन तयार केले. त्यांने आपला मुलगा औरंगजेबाला दख्खनचा प्रतिनीधी म्हणून नेमले. त्याने 1636 मध्ये पोर्तुगिजांचा पराभव करून अहमदनगर जिंकले. त्याने दक्षिणेकडे भूमापन व मूल्यमापन पद्धत अमलांत आणली. पुढील काळात औरंगजेब सुलतान झाला.

शहाजहानच्या कार्यकाळात भारत आणि पश्चिम आशिया तसेच युरोपमधील व्यापाराची प्रगती झाली. शहाजहानने आपली पत्नी मुमताज हिच्या स्मरणार्थ ताजमहल बांधले. लाल किल्ला आणि दिल्लीतील अनेक इमारती ही शहाजहानची देणगी आहे. म्हणून त्याच्या कालावधीला मोंघल कला आणि शिल्पकलेचा सुवर्णकाळ असे म्हटले जाते.

**औरंगजेब:**

औरंगजेबाच्या बालपणीच त्याला उत्तम सैनिकी प्रशिक्षण प्राप्त झाले. त्यामुळे तो समर्थ सैनिक होता. स्वतःचे वडिल शहाजहान यांना कैदेत टाकून तो स्वतः सिंहासनावर बसला. यामुळे त्याला आलमगीर पदवी प्राप्त होवून, तो सिंहासनावर बसला. औरंगजेबाने कुराणातील तत्वे अमंलात आणली. कुराणातील कायद्यांचे रक्षण नीट होते की नाही, यासाठी त्यांने प्रमुख शहरामध्ये मुक्तसिबतची नेमणूक केली. सती पद्धत, संगीत कार्यक्रम, जुगार, मद्यपान आणि गांजाची लागवड यावर राज्यात बंदी आणली. औरंगजेबाच्या क्रूर राज्यवटीच्या विरोधात जाट, सतनामी, बुंदेल आणि शिखांनी उत्तर भारतात बंड केले. शिखांचे नववे गुरू तेजबहादूर यांना औरंगजेबाने तुरुगांत टाकून त्यांचा छळ करून

त्यांना ठार मारले. औरंगजेबाने सामर्थ्यशाली राजपूतांच्या विरोधात शत्रुत्वाचे धोरण अवलंबल्यामुळे मोंघल साम्राज्याचा नाश झाला.

औरंगजेबाने मराठा साम्राज्याविषयी असहिष्णुतेचे धोरण ठेवून छत्रपती शिवाजी महाराजांसोबत सतत संघर्ष केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी राजांना तुरुंगात टाकून छळ करून त्यांना ठार मारले. त्याने दक्षिण भारतातील विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची निजामशाही यांच्याशी संघर्ष करून त्यांना पराभूत केले. आणि त्यांचे राज्य मोंघल साम्राज्यात समाविष्ठ केले.

**मोंघलांचे योगदान:**

राज्यकारभार: मोंघलाचा उत्तराधिकारी वारसा हक्काने ठरविला जात असे. बादशहा सर्व सत्ताधीश असे. राज्यकर्ते स्वतःला बादशहा असे म्हणून घेत. राज्यकारभारात सल्ला आणि मदत करण्यासाठी मंत्री तसेच अधिकारी असत. पर्शियन भाषेचा वापर कार्यालयीन भाषा म्हणून केला जात असे. राज्यकारभाराच्या सोयीसाठी साम्राज्यामध्ये प्रांत, जिल्हा आणि नगर असे विभाग पाडले होते. यावर देखरेख ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. सुलतान हा न्यायव्यवस्थेचा प्रमुख असे. मोंघल राज्यकर्त्यांना सेनापती, आणि मंत्र्याची नेमणूक करणे अथवा काढून टाकण्याचा सर्वाधिकार असे. मनसबदारांची नेमणूक, जहांगीरी प्रदान करणे, कायद्याची रचना करणे हे बादशहाचे मुख्य कर्तव्य होते. केंद्र सरकार, वकिल, दिवाण, मिरबक्षी आणि मुख्य सदर हे महत्वाचे मंत्री असत. प्रातांचा राज्यकारभार राज्यपाल, दिवाण, बक्षी, वाकिया, नवीस, कोतवाल, फौजदार, अमलगुजर, बत्तिकची पहात असत.

**महमूल:**

मोंघल काळात बहुतांश जनतेचा मुख्य व्यवसाय कृषी व्यवसाय होता. जमिनीच्या उत्पादन क्षमतेनुसार कर गोळा केला जात असे. जमिनीचे योग्य मोजमाप करून कर निश्चित केला जात असे.

**सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था:**

बादशहा, मंत्री, अधिकारी आणि इतर नोकरदार, वर्गाला समाजामध्ये मानाचे स्थान होते. ते उंची वस्त्रे परिधान करत. औरंगजेबाव्यतिरिक्त बाकीचे संगीत, मनोरंजन, मद्यसेवन, जुगार इत्यादी छंदात भाग घेत असत. राजमहलात राणीची देखभाल करण्यासाठी अनेक दासी असत. राजकुंटूंबातील लोक मोती, माणिक, आणि मौल्यवान धातूचे अलंकार वापरत असत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

राजा तोडरमलने जमिनीचे वर्गीकरण आणि मोजमाप करून कर बसविले होते. उत्तर भारतात अनेक नद्या असल्यामुळे नैसर्गिक सुपीक जमिनी उपलब्ध होत्या. पाणी पुरवठ्याच्या सोयी करून बराच मोठा प्रदेश लागवडीखाली आणला. मोंगलाच्या काळात लाहोर, आग्रा, फत्तेपूर सिक्री आणि अहमदाबाद येथे अनेक सरकारी कारखाने होते. बनारस, पाटणा, ढाका, सबसपूर, सोनार, लाहोर, फत्तेपूर सिक्री आणि आग्रा येथे प्रसिद्ध कापड व्यवसाय होता. शाल आणि गालीचे विणण्यांचा व्यवसाय अकबराच्या काळात वाढीस लागला. काश्मिरी शाली प्रसिद्ध होत्या. मोंघलांच्या काळात भारताचा अनेक आशियांयी आणि युरोपियन राष्ट्रांशी व्यापारी संबंध वाढीस लागले. कच्चे रेशीम, धातू, घोडे, सुगंधी द्रवे, सोने आणि चांदी याची आयात केली जात असे. तर सुती कापड, मिरी, केशर, सैधंव (मीठ) गांजा आणि कापडाची निर्यात केली जात असे आणि उद्योगाची स्थापना झाली आणि परदेशाशी व्यापारी संबंध दृढ झाले.

**माहिती असुदे:** लाहेर आग्रा, फत्तेपुर सिक्री आणि अहमदाबाद येथे सरकारी कारखाने होते. बनारस, पाटना, ढाका, चाबसपूर, सोनार ही त्या काळतील सुती कापड उद्योगाची प्रसिद्ध केंद्रे होती, लाहोर फतेहपूर सिक्री आणि आग्रा येथे मोठे उद्योग होते अकबरच्या काळात शाल व जिमखान्याच्या विनकामाची भरभरार झाली होती. काश्मिर शाली प्रसिद्ध होत्या. मोंघल काळात भारताचे आशिया आणि युरोपातील अनेक देशांशीव्यापारी संबंध होते, कच्चे रेशीम, धातू, घोडे, सुगंधी द्रव्ये, सोने आणि चांदी यांची आयात होत असे. व कापूस, मिरी, अफू व लोकरीचे कपडे हे प्रमुख निर्यात होत असे.

**साहित्य:**

मोंघलाच्या काळात पर्शियन, अरेबिक, तुर्की, हिंन्दी आणि संस्कृत भाषेत साहित्य रचना झाल्या. बाबर आणि जहांगीर हे स्वतः विद्वान होते. त्यांनी स्वतःचे आत्मचरित्र लिहिले. बाबरचे बाबरनामा आणि जहांगीराचे तुजुक-ई-जहांगिरी अकबरांच्या दरबारातील अब्दुल फजल याने एन-ए-अकबरी आणि बाबरनामा या पर्शियन रचनाची निर्मिती केली. बदायुनीने रामायणाचे पर्शियन भाषेत भाषांतर केले. तर फैजीने गणितातील लिलावती नावांचा ग्रंथ भाषांतरीत केला. राजा तोडरमल याने भागवत पुराण पर्शियन भाषेत भाषातंरित केले. याच काळात तुळसीदासाने रामचरित्र मानस, सूरदासाने सूरसागर या हिंदी रचना केल्या.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**कला आणी शिल्पकला:**



लाल किल्ला

अकबर आणि शहाजहानचे मोंघल कला आणि शिल्पकलेतील योगदान उल्लेखनीय आहे. अनेक अद्भूत स्मारके फत्तेपूर सिक्री, आग्रा आणि दिल्ली येथे बांधली. ही मोंघलाची राजधानीची ठिकाणे होती. शहाजहानने अकबरी महल, ताजमहल आणि जहांगीर महल आणि आग्रा येथे किल्ला बांधविला. त्याने लाहोर आणि अलाहाबाद येथे आग्रा प्रमाणेच किल्ले बांधले.

लाल किल्याच्या बांधकामानंतर दिवाण-ए-खास, रंगमहल, मुमताज महल, मोती मशिद, नक्करखाना, खांसा महल, इत्यादी इमारती बांधल्या. भारतातील सर्वांत मोठी मशिद दिल्ली येथील जामिया मशिद शहाजहानच्या कालावधीत बांधली गेली.

**चित्रकला:**

हुमायूनच्या काळात मोंघल शैलीच्या चित्रकलेस प्रारंभ झाला. पर्शियाचा मीर सय्यद अल्ली, अब्दुस समदर नेरवी याने हस्तचित्रकला अस्तित्वात आणली. अकबराच्या दरबारातील 17 कलाकारांपैकी 13 कलाकार हिंदू होते. ह्यापैकी दासवंत, बसवण्णा, लाला आणि मुकुंद हे प्रसिद्ध चित्रकार होते.

जहांगिराच्या दरबारात उस्ताद मन्सूर आणि अब्दुल हसन हे प्रसिद्ध चित्रकार होते. या कलाकारांनी विशेषतः मोंघल राजे व राण्यांची भैव्य तैलचित्रे काढली.

## मराठा साम्राज्य

17 व्या शतकाच्या दरम्यान दक्षिणेत मराठ्यांच्या साम्राज्यांचा उदय ही महत्वाची ऐतिहासीक घटना होती. या साम्राज्याचा विस्तार उत्तर भारतापर्यंत झाला. 17व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रावर अहमदनगरची निजामशाही विजापूरची आदिलशाही यांचे नियंत्रण होते. या सुलतानांनी स्थानिक मराठ्यांची नेमणूक त्यांच्या सैन्यात केली होती. देशपांडे आणि देशमुख जमीन महमूल गोळा करत. यापैकीच एक शहाजीराजे भोसले यांना विजापूरच्या सुलतानाने पुण्याची जहांगिरदारी दिली होती.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## छत्रपती शिवाजी महाराज:



छत्रपती शिवाजी

मराठा साम्राज्याच्या स्थापनेने भारतीय इतिहासात एका नव्या अध्यायाला प्रारंभ झाला. मराठ्यांनी राष्ट्राचा मान राखण्यासाठी आणि परकीय आक्रमणांपासून देशाचे रक्षण करण्यासाठी मोंघलाशी कट्टर झुंज दिली. छत्रपती शिवाजी महाराज सर्वश्रेष्ठ मराठा सम्राट होते. त्यांनी आपल्या साम्राज्याचा प्रचंड विस्तार केला. त्याच बरोबर उत्तम शासन व्यवस्था अंमलात आणली. महाराष्ट्रातील महान संताच्या शिकवणुकीने प्रभावित होवून हिंदु धर्माच्या रक्षणासाठी त्यांनी 'हिंदवी स्वराज्याची' स्थापना केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म पुणे जिल्हातील शिवनेरी येथे झाला. त्यांचे वडिल शहाजीराजे भोसले हे विजापूरच्या सुलतानाच्या दरबारात सरदार होते. त्यांची आई जिजाऊ या अतिशय धार्मिक, श्रद्धाळू, नितीवान आणि सात्विक होत्या. त्यांनीच आपल्या पूत्रामध्ये धार्मिकता, नैतिकता आणि प्रामाणिकपणाच्या वृत्तीची जोपासना करून शिवाजी महाराजाना स्वराज्य स्थापनेस प्रवृत्त केले. दादोजी कोंडदेव यांनी महाराजांना युद्धशास्त्र आणि शास्त्रात पारंगत केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी शरीर सौष्ठव, युद्धकला, शिकार, तलवारबाजी, घोडेस्वारी ही छात्र कौशल्ये बालवयातच आत्मसात केली.

> **तुम्हाला हे माहित आहे का?**
>
> ***गनिमी कावा:*** *डोंगर, दऱ्या खोऱ्यात, जंगलात बेसावध शत्रूला अचानक हल्ला करून पराभूत करणे म्हणजेच गनिमी कावा.*

बालवयातच महाराजांनी स्वतंत्र साम्राज्य स्थापनेचा ध्यास घेतला होता. म्हणून त्यांनी पुणे हे आपले केंद्र केले व राज्यविस्तारास प्रारंभ केला. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील तरूण मावळ्यांना गोळा करून गनिमी काव्यात तरबेज केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी तोरणा किल्ला, पुरंदरगड, सिंहगड, चाकण किल्ला आणि जावळीचा किल्ला विजापूरच्या सुलतानाकडून जिंकून घेतला. तोरणा किल्ल्याजवळील किल्याचे त्यांनी रायगड असे नामकरण केले. त्यांनी प्रतापगड हा नवा किल्ला बांधला. छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूर सुलतानाच्या विरुद्ध मोहिमा आखल्यामुळे विजापूरच्या सुलतानानी शहाजीराजांना कैदेत टाकले. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी सुलतानाशी तह करून शहाजीराजाना सोडविले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**छत्रपती शिवाजी महाराज आणि मोंघलाचे संबंध:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी मोंघल सुलतान औरंगजेब यांच्याशी बरीच वर्षे झुंज दिली. दक्षिणेतील अनेक शाह्यांचा आणि मराठा साम्राज्याचा नाश करण्यासाठी औरंगजेबाने शाहिस्तेखान आणि जयसिंगाला पाठविले. जयसिंगाने राजांना पराभूत करून पुरंदरचा तह केला. या तहानुसार राजांना 23 किल्ले, वार्षिक 16 लाख उत्पन्न देणारा प्रदेश मोंघलांना द्यावा लागला. आणि मोंघलाशी एकनिष्ठ राहीन असे सांगून संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली 5000 घोडेस्वार दिल्लीला पाठविले. राजांनी गोवळकोड्यांचा कुतुबशहा आणि विजापूरच्या आदिलशहाशी हात मिळवणूक करू नये म्हणून जयसिंगाने राजांना दिल्लीला बोलाविले. औरंगजेबाने राजांचा अपमान करून त्यांना आग्रा येथे पुत्र संभाजीसोबत कैदेत टाकले. पण थोड्याच कालावधीत राजांनी मोठ्या चातुर्याने मिठाईच्या पेटाऱ्याचा वापर करून स्वत:ची सुटका करून घेतली. व राजे रायगडावर परतले. पुढे आपले सैन्य संघटीत करून मोंघलाना

दिलेले सर्व किल्ले परत जिंकले. सा.श. 1674 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजाचा रायगड येथे राज्याभिषेक झाला आणि त्यांना 'छत्रपती' असे म्हटले जावू लागले.

**राज्यकारभार:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी विस्तृत साम्राज्याची राज्यव्यवस्था चोख ठेवली होती. त्यांनी साम्राज्याची विभागणी अनेक प्रातांमध्ये केली होती. सरकारी व्यवहार मराठी व प्राकृत भाषेत चालत असत. राजांना राज्यकारभारात मदत करण्यासाठी अष्टप्रधान मंडळ नेमले होते. याच बरोबर इतर अधिकारी असत. प्रांत, जिल्हे आणि खेडी राज्यकारभाराचे घटक होते.

**महसूल व्यवस्था:**

कर गोळा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या हिताची असलेली रयतवारी पध्दत अस्तित्वात होती. त्यांनी जहागिरी पध्दत नष्ट केली. रोख पैशाच्या स्वरुपात किंवा वस्तु, चौथाई (उत्पदन्नाचा चौथा भाग), सरदेशमुखी (उत्पन्नाचा दहावा भाग) द्यावा लागे.

**न्याय व्यवस्था:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात पारंपरिक न्याय व्यवस्था अस्तित्वात होती. खेड्यांमध्ये ग्राम पंचायतीमार्फत न्यायदान केले जात होते. ब्राह्मण न्यायाधीश स्मृती (धर्मग्रंथाच्या), निती आणि संस्कृतीच्या आधारे अंतिम न्याय देत असे.

**सैन्य व्यवस्था:**

मराठा सैन्यात पायदळ, घोडदळ, हत्तीदळ, तोफखाना हे विभाग अस्तित्वात होते. रायगड, तोरणागड, प्रतापगड, सिंहगड हे महत्वाचे किल्ले होते. किल्लेदार हा किल्यांची व्यवस्था व देखरेख करत असे. सैन्याचे अनेक छोटे छोटे विभाग होते. राजाचे सैन्य गनिमी काव्यात तरबेज होते

**छत्रपती शिवाजी महाराजांचे उत्तराधिकारी:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी राजांनी आपल्या सामर्थ्याने मराठा साम्राज्यावर राज्य केले. औरंगजेबाने मराठा साम्राज्यावर हल्ला करून कपटाने छत्रपती संभाजी राजांना पकडून क्रूरपणे ठार मारले. त्यांची पत्नी आणि मुलगा शाहू यांना पकडण्यात आले. यानंतर मराठी साम्राज्यांची सूत्रे राजारामच्या हाती आली. राजारामाने (संभाजीचे

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

लहान बंधू) मोंघलाशी लढून गुजरात, माळवा, खानदेश, वऱ्हाड, परत मिळविले. 1700 मध्ये राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाई मोहीतेनी आपला दहा वर्षीय पूत्र दूसरा शिवाजी याला गादीवर बसवून प्रतिनिधी म्हणून राज्यकारभार पाहू लागल्या. या दरम्यान त्यांनीही मोंघलाशी संघर्ष सुरू केला. सुरुवातिला मोंघल विजयी झाले, असले तरी नंतर मराठ्यांनी आपले प्रांत परत मिळविले. औरंगजेबाचा वारसदार बहादूरशहा पहिला गादीवर येताच त्यांने छत्रपती संभाजी राजाचा पुत्र शाहू याला मोंघलाच्या कैदेतून मुक्त करून दक्षिणेकडील मोंघल प्रांतात चौथाई आणि सरदेशमुखी कर गोळा करण्याचे अधिकार शाहूला दिले. त्यामुळे ताराबाई आणि शाहूमध्ये पून्हा संघर्ष निर्माण झाला. शाहूने ताराबाईचा पराभव केला. परंतु काही कारणामुळे मराठी साम्राज्याचे नेतृत्व पेशव्याच्या (प्रधानमंत्री) हाती गेले.

## पेशवे

**बाळाजी विश्वनाथ:**

शाहूचा निष्ठावंत सेनापती म्हणून कार्य केल्यामुळे बाळाजींना पेशवे म्हणून नेमण्यात आले. संभाजीचे पूत्र शाहू आणि पत्नी येसूबाई यांची मोंघलाच्या कैदेतून सुटका करण्यात याची महत्वाची भूमिका होती. मोंघल सत्तेतील सय्यद बंधूंशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवून मोंघलानी जिंकलेल्या भागातील जमिनीवर महसूल गोळा केला. मराठी सरदार गायकवाड, भोसले, शिंदे, होळकर यांच्यात आणि पेशव्यांच्यात एकी निर्माण करून मराठी साम्राज्यांची गेलेली पत पुन्हा मिळविली.

**पहिला बाजीराव:**

बाळाजी विश्वनाथच्या मृत्यूनंतर त्याचा थोरला मुलगा पहिला बाजीराव यांची पेशवा म्हणून नियुक्ती झाली. केवळ 19 वर्षांचा बाजीराव अप्रतिम वीर योध्दा होता. उत्तरेकडील मराठी साम्राज्याचा विस्तार करण्याच्या हेतूने गुजरात, माळवा जिंकून चौथाई व सरदेशमुखी वसूल केली. त्यांनी कर्नाटकतील चित्रदुर्ग व श्रीरंगपट्टण ताब्यात घेतले. मोंघलाना मदत करणाऱ्या हैद्राबादच्या निजामाला पहिल्या बाजीरावने भोपाळ जवळील लढाईत पराभूत करून नर्मदा आणि चंबळचा दोआबचा प्रदेश जिंकला. आणि युद्ध भरपाई म्हणून 50 लाख रूपये खंडणी वसूल केली. याबरोबर पोर्तुगिजाकडून साष्टी, वसई आणि सिद्धिकडून जंजिरा किल्ला मिळविला.

पुणे येथून त्यांचा राज्यकारभार चालत असे. याच दरम्यान मराठी सरदार ग्वालहेरचे शिंदे, इंदूरचे होळकर, नागपूरचे भोसले, आणि बडोद्याचे गायकवाड स्वतंत्र होण्याचा

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रयत्न करू लागले. पहिल्या बाजीरावने आपल्या कर्तृत्वाने मराठी साम्राज्यांचे गतवैभव पुन्हा प्राप्त केले म्हणून त्यांना दुसरे शिवाजी महाराज असे म्हटले जाते.

**बाळाजी बाजीराव:**

हे आपल्या वयाच्या 20 व्या वर्षी गादीवर बसले. सदाशिवभाऊ हे त्यांचे मार्गदर्शक होते. त्यांनी नानासाहेबाना मराठ्यांचा गौरव वाढविण्यास प्रोत्साहन दिले. नानासाहेबांनी राज्यांची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासाठी अनेक पावले उचलली. 1742 मध्ये होळकर आणि शिंदेच्या सहाय्याने बुंदलखंडावर ताबा मिळविला. अफगाणीस्तानच्या अहमदशाह अब्दालीने मोंघल प्रदेशावर आक्रमण करून लाहोर, मुलतान आणि काश्मिर ताब्यात घेतले. मोंघल सुलतान सफदरजंग याने मराठ्यांशी मदतीचा तह केला. पण 1761 च्या पानिपतच्या लढाईत अब्दालीने पराक्रमी मराठ्यांना पराभूत केले.

**पहिले माधवराव:**

हे बाळाजी बाजीरावाचे दुसरे पुत्र. वडिलांच्या मृत्यूनंतर यांना गादीवर बसविले गेले. पण वयाने लहान असल्यामुळे त्यांच्या काकानी प्रतिनिधी म्हणून काम पाहिले. तिसऱ्या पानिपतच्या लढाईनंतर माधवरावात आश्चर्यकारक बदल झाले. आणि त्यांनी सैनिकी ताकद वाढवून दक्षिण तसेच उत्तर भारतात आपले वर्चस्व निर्माण केले. पानिपतच्या पराभवानंतर निजामाने याचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा माधवरावानी त्यांना अहमदनगर येथे पराभूत केले. हैदर अलीला पराभूत करून श्रीरंगपट्टण ताब्यात घेतले. हैदर अलीकडून मोठी खंडणी वसूल केली. जो अगोदर शिवाजी महाराजांच्या साम्राज्याचा भाग होता. पहिल्या माधवरावाने उत्तरेकडील राजपूत, जाट आणि रोहिल्यांना पराभूत केले. मोंघल सम्राट शाह आलम दुसरा याला दिल्लीच्या सिंहासनावर पुन्हा बसण्यास मदत केली. अशाप्रकारे पहिल्या माधवरावाने अल्पावधीतच मराठ्यांचे वैभव आणि कीर्ती पुन्हा प्राप्त केली. तिसऱ्या अँग्लो मराठा युद्धानंतर मात्र ब्रिटीशाकडून झालेल्या पराभवानंतर मराठ्यांचे वर्चस्व कमी झाले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. योग्य शब्दासह रिक्त जागा भरा :**

1. अहोम घराण्याचे संस्थापक ____________ .
2. मोंघल घराण्याचे संस्थापक ____________ होते.
3. मोंघलाचा प्रसिद्ध सुलतान ____________ होय.

4. आग्राचा प्रसिद्ध ताजमहाल ___________ यांनी बांधला.

5. दिन-ई-ईलाही या नवीन धर्माची स्थापना केलेला मोंघल सुलतान ________ .

6. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आईचे नांव ___________ .

## II. समुहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

7. अहोम साम्राज्याची प्रमुख कार्ये थोडक्यात लिहा?

8. बाबरांच्या सैनिक कारवायाबद्दल थोडक्यात लिहा?

9. शेरशहाची राज्यव्यवस्था आणि सध्याची राज्य व्यवस्था यांची तुलना करून तुमचा अभिप्राय लिहा.

10. अकबराने कोणकोणते प्रदेश जिंकले?

11. कला आणि शिल्पकलेच्या क्षेत्रातील शहाजंहानचे योगदान काय ते लिहा?

12. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे वर्णन करा.

13. पहिल्या बाजीरावाच्या कार्याचे वर्णन करा.

## III. उपक्रम :

1. भारताच्या नकाशामध्ये अहोम साम्राज्याचे प्रदेश दाखवा?

2. भारताच्या नकाशात अकबराने जिंकलेले प्रदेश दाखवा?

3. छत्रपती शिवाजी महारांजाच्यामध्ये राष्ट्रभक्ती वाढविण्यासाठी आई जिजाऊ यांनी केलेले संस्कार याबद्दल निबंध लिहा.

## IV. प्रकल्प :

1. तुमच्या स्थानिक राजकारभारातील व्यवस्थेविषयी माहिती लिहा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

M4R6L3

प्रकरण-18 वे

# भक्ती पंथ

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *भारत आणि कर्नाटकातील भक्ती पंथाची चळवळ .*
- *महत्वांच्या भक्ती कवींच्या कर्तृत्वाचा परिचय.*
- *भक्तिपंथाचे परिणाम.*

भक्तिमार्गाच्या चळवळीचा विकास हे मध्ययुगीन भारताचे प्रमुख वैशिष्टय आहे. भारताच्या आध्यात्मिक परंपरेमध्ये मुक्ती मिळविण्यासाठी विविध प्रकारच्या मार्गांचा अवलंब केला गेला आहे. यातूनच ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग, कर्ममार्ग, यज्ञयाग इ. धार्मिक आचरणांना प्रसिद्धी मिळाली. यामध्ये भक्तिमार्गाला अनन्यसाधारण असे स्थान आहे. विविध धर्म प्रवर्तकांनी व तत्ववेत्यांनी भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. भक्ती म्हणजे देवावर नितांत श्रद्धा ठेवणे, देवावर भक्ती ठेऊन त्याला शरण जाणे असे सांगितले. त्यांनी लोकांमध्ये बंधुभाव वाढण्यास प्रयत्न केले. सर्वधर्म समान आहेत. या तत्त्वाचे त्यांनी प्रतिपादन केले. देव एकच आहे. राम, कृष्ण व अल्ला ही एकाच देवाची रूपे आहेत. त्यांची आराधना करावी. मुक्ती मिळविण्यासाठी त्यांनी भक्तिमार्ग सुचविला. पावित्र्य, शुद्ध मन व संपूर्ण शरणागती हीच भक्ति मार्गाची मूल तत्वे आहेत. भक्तिपंथाच्या काळात ईस्लाम धर्मात सूफी पंथाचा विकास झाला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**रामानंद (1360-1470):** रामानंद यांचा जन्म प्रयाग येथील एका ब्राम्हण कुटुंबात झाला. ते रामानुजाचार्यांच्या तत्वज्ञानाचे अनुयायी होते. प्रेम व भक्तीवर आधारित वैष्णव धर्माची त्यांनी स्थापना केली. त्यांनी उत्तर भारतात यात्रा करुन राम-सीतेची पूजा प्रचलित केली. वाराणसी ही त्यांची कर्मभूमी होती. त्यांनी जाती-प्रथेला विरोध केला. सर्व धर्मातील लोक त्यांचे अनुयायी होते. कबीर हे त्यांचे प्रसिध्द शिष्य होते.



**रामानंद**

**तुम्हाला हे माहित आहे का?**

***रामानंदानी लोकांना हा अनोखा संदेश दिला:***

*''जाती-पाती पुछो ना कोए हरि को भजे सो हरि का होए।''*

***माणसाची जात कोणी विचारू नका जो देवाला भजतो तो देवाचा असतो.***

**कबीर (1440-1510):** या काळातील उत्तर भारतातील प्रमुख संतापैकी कबीर हे एक होते. ते रामानंदाचे अनुयायी होते. कबीर वाराणसीच्या 'जुलास' नावाच्या विणकर कुटूंबात वाढले. त्यांनी आपल्या जीवनातील बराचसा काळ वाराणसी येथे व्यतीत केला. जातीप्रथा, अनेकेश्वरवाद यांना विरोध केला. हिंदु असो किंवा मुसलमान सगळ्यांचा देव एकच आहे अशी त्यांनी शिकवण दिली. त्यांनी लोकांच्यात धार्मिक सलोखा, संहिष्णुता, एकात्मता आणि बंधुभाव निर्माण करण्यात आपले जीवन व्यतीत केले.



**कबीर**

कबीरांच्या हिंदी भाषेतील काव्य रचनाना 'दोहा' असे म्हटले जाते. आज देखील उत्तर भारतातील हिंदु आणि मुसलमान भक्तीरसांनी भरलेले कबीरांचे दोहे सारख्याच श्रध्देने म्हणताना आढळतात. कबीरांच्या अनुयायांना 'कबीर-पंथीय' असे म्हणत असत. कबीर थोर समाज सुधारक, तत्वज्ञानी, कवी आणि संत होते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**चैतन्य (1486-1533):** भक्तीपंथातील संतापैकी एक महान संत. बंगाल मधील नांदिया येथे ब्राम्हण कुटुंबात जन्म झाला. श्रध्देने जातीभेद नष्ट होतात तर भक्तीने मनुष्य परिशुध्द होतो अशी त्यांची शिकवण होती. त्यांनी कृष्णभक्तीला सुरुवात केली. ते कृष्णाचे गुणगाण करीत असत. कृष्णभक्तीवरील अनेक पदांची त्यांनी रचना केली. त्यांनी जातीभेद दूर करुन समाजात बंधुभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या ''चैतन्य चरितामृत'' या ग्रंथात त्यांनी आपले तत्वज्ञान सांगीतले आहे.



**चैतन्य**

**गुरु नानक (1469-1539):** या कालावधीतील भक्तीमार्गाचे प्रमुख प्रवर्तक गुरु नानक हे होत. गुरु नानकांचा जन्म सध्याच्या पाकिस्तानातील तळवंडी या गावी झाला. गुरु नानक याना लहानपणापासूनच धार्मिक शिक्षण मिळाले होते. देव एकच आहे. मुर्तीपूजा करु नये अशी शिकवण त्यांनी लोकांना दिली. सत्कर्म, शुद्ध आचरण व नितीयुक्त जीवनाला त्यांनी

जास्त महत्त्व दिले. त्यांच्याकडे हिंदू व मुस्लीम या दोन्ही धर्मांचे शिष्य होते. त्यांनी आपल्या अनुयायीना जाती धर्माचा विचार न करता एकत्र बसुन जेवन करायला लावले. त्यांनी लंगर हे सामुदायीक स्वयंपाकघर सुरू केले. त्यांच्या अनुयायांना शीख असे म्हणतात. त्यांची वचने व शिकवणी गुरु ग्रंथ साहेब मध्ये संग्रहीत केली आहेत.


गुरु नानक

**श्रीमंत शंकरदेव आणि माधवदेव:**

आसामच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासात श्रीमंत शंकरदेवाची भूमिका खूप महत्वाची आहे. (श्रीमंत म्हणजे श्रीमंत नसून मानद श्री). भूतकाळातील संस्कृती आणि वारसा यामध्ये नवनवीन शोध लावण्यात त्यांची ख्याती होती. शंकरदेवाचे भागवत् संस्कृत आसामी आणि बृजावली या भाषेत आहे. शंकरदेवानी आसाममध्ये जी भक्ति चळवळ राबवली, त्याचा प्रभाव भारताच्या इतर भागातही पडला. त्यानी धर्म ऐक्य किंवा वैष्णव चळवळ नावाची भक्ती चळवळ सुरु केली असे म्हणतात. कृष्णामध्ये आपण शुद्ध भक्ती शोधली पाहिजे. चांगले गाणे गाऊन आणि ऐकून आपण भक्ती करू शकतो. देवाचा सेवक होण्यासाठी चांगली भावना असली पाहिजे. इतर वैष्णवांप्रमाणे ही चळवळ कृष्णासह राधेची पूजा करत नाही.


शंकरदेव


माधवदेव

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

श्रीमंत श्रीशंकरदेवाने सरनिय पध्दत आपल्या पंथात सुरु केली. (आपल्या चळवळीने दिक्षा देणारी प्रणाली) त्यांनी प्रचलित जातिव्यवस्थेच्या विरोधात लढा दिला. ही चळवळ उभारण्यासाठी त्यांनी सर्व जाती धर्मांच्या लोकांना जोडले. ते म्हणतात धार्मिक उपासना पाळा, कृष्णावर श्रद्धा ठेवा. भक्ती चळवळीतील त्यांचे शिष्य श्री माधवदेव हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. माधवदेव भक्तिचळवळीत खूप लोकप्रिय होते. वैष्णव चळवळीतील दोन संतांचे योगदान, त्यांचा प्रसार आणि लोकप्रियता खूप मोठी आहे.

**मीराबाई (1498-1569) :** मेवाडची राजकन्या मीरा ही देखील भक्तीपंथाच्या चळवळीशी संबधित आहे. तिने विलासी जीवनाचा त्याग केला आणि भगवान श्रीकृष्णाची सर्वात एकनिष्ठ अनुयायी बनली. ती कृष्णालाच आपला पती मानत असे. तिने रचलेल्या कृष्णावरील

किर्तनात कृष्णलिलांचे वर्णन आढळते. आजदेखील उत्तर भारतासह संपूर्ण भारतात मीराबाईंची कृष्णप्रेमाने ओथंबलेली भजने भक्तीभावाने गायली जातात.


मीराबाई

भारताच्या इतर भागात देखील संत संप्रदायाच्या लोकांनी हिंदू-मुसलमान धर्मात एकात्मता/सेतू साधण्याचे कार्य केले. महाराष्ट्रात भीमा नदीच्या काठावर पंढरपूर येथे वारकरी संप्रदायाला सुरुवात झाली. या संतानी भक्तीच्या परिभाषा बदलल्या. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास हे संत त्यापैकी प्रमुख होते. कर्नाटकात कनकदास आणि पुरंदरदास हे धार्मिक चळवळीच्या अग्रस्थानी होते. पुरंदरदासानी आणि कनकदासानी 'मोहनतरंगीणी' या कन्नड महाकाव्याची रचना केली.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**पुरंदरदास (1484 ते 1564) :**

कर्नाटकातील संगीताचे पितामह म्हणुन ओळखल्या जाणाऱ्या पुरंदरदासानी आपल्या किर्तनाच्या माध्यमातून कन्नड साहित्यात मोलाचे योगदान दिले आहे. दास असावा तर पुरंदरदासा सारखा अशी त्यांचे गुरू व्यासराय त्यांची प्रशंसा करीत असत.


पुरंदरदास

पुरंदरदासांनी आपल्या किर्तनातून वैष्णवभक्ती बरोबर. सामाजीक तळमळ, दांभिक भक्तीवर टिका व जिवनतत्वे या विषयी आपले विचार मांडले, त्यांनी जातीयतेचा विरोध केला यज्ञ यागाचा तिरस्कार केला. अंधश्रद्धेचा धिक्कार केला व आत्म संशोधनाला महत्व दिले अंतरंग शुद्ध असल्याशिवाय बहिरंग शुद्ध होत नाही. मन स्वच्छठेवा पाण्यात बसुन ध्यान करणाऱ्या माणसांची त्यांनी बगळ्याशी तुलना केली आहे मना मध्ये दृढभक्ती नसताना शरीर स्वच्छ ठेवून काय उपयोग.

माणसाने जीवनात कठीण प्रसंगी धैर्य सोडू नये मानवीजन्म फार मोठा आहे. या जन्माची हानी होवु देउनका हे जिवनतत्व त्यांनी संगीतले. त्यांचे प्रत्येक किर्तन हे मानवाला ज्ञान दिपा प्रमाने आहे.

**कनक दास (1509 ते 1609) :**



कनक दास

कनक हे बाढ व बंकापूर येथील स्थानिक नेते होते ते युद्धात तरबेज होते. एकदा ते युद्धात जखमी झाले. तेव्हापासुनच त्यांच्यात जीवनाबद्दल विरक्ती निर्माण झाली. त्यांनी सर्व भौतिक सुखाचा त्याग केला व दास मार्गाचा अवलंब केले अशारितीने त्यांना कनकदास म्हणुन ओळखले जावू लागले.

एक भक्तीमार्गातील संत बनून कनकदासांनी समाजातील उच्चनिच हा भेदभाव घालविण्यासाठी प्रयत्न केला. त्यांनी ढोंगी भक्तांचा तिरस्कार केला. खऱ्या भक्ती मार्गानेच आपण देवापर्यंत पोचुशकतो असे ते सांगत. कोणत्याही जातीत जन्मलेला व्यक्ती देवाचा साक्षात्कार प्राप्त करू शकतो असे त्यांचे मत होते. कनकदास एक भक्ती मार्गातील कवी होते. आपल्या किर्तना बरोबरच त्यांनी अनेक कृतींची रचना केली आहे. मोहनतरंगिणी, नळ चरित्र रामधान्य चरित्र व हरिभक्तीसार या पैकी कांही प्रमुख कृती होत्या.

**शिशुनाळ शरीफ (1819 ते 1889) :**



शिशुनाळ शरीफ

इमाम व हूजुमा हे त्यांचे आई वडील होते आजच्या हावेरी जिल्ह्यातील शिग्गावी तालूक्यात 1819 मध्ये त्याचा जन्म झाला. काझीच्या सल्यानुसार त्यांचा वडिलांनी इमाम साहेबांनी आपल्या मुलाचे नाव मोहम्मद शरिफ असे ठेवले.

शरीफ हा पारशी शब्द आहे याचा अर्थ उदात्त ध्येय ठेवून किंवा उत्तम चरित्र्याने समाजाकडून गौरविली जाणारी व्यक्ती असा आहे. नावा प्रमाणेच शरिफ उत्तम चरित्र्यवान होते.

शिशुनाळ शरीफ लहानपणापासुनच इस्लाम. वीरशैव व वैदीक तत्व सिद्धांताने प्रभावित झाले होते. त्रिकाल ज्ञानी गोविंद भट्ट हे त्यांचे गुरु होते. शरीफ यांने शिशुनाळमधील मुलांसाठी गावातील चंद्रेश्वर मंदिरात शाळेची स्थापना केली व त्या द्वारे धार्मीकतेची विशाल मनोभावना मुलांमध्ये रुजविली.

शरिफ सतत लोकांच्या घोळक्यात रहात असत शिशुवाल प्रदेशातील यात्रा, उत्सव, मोहरम सणाच्या ऐतिहासीक गोष्टीचे अनुकरण करून रिवायत या साहित्याची रचना केली.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**सूफी पंथः** पर्शियामधून आलेले सूफी संत भारताच्या अनेक भागात स्थायीक झाले. त्यांना 'पीर' (शिक्षक) असे म्हटले जाते. ते 'सफ' म्हणजे साध्या लोकरीच्या कपड्यापासून बनलेले वस्त्र धारण करीत असत, म्हणून त्यांना सूफी म्हटले जाई. त्यांनी प्रेम आणि भक्तीची शिकवण दिली. या गुणांनी आपण देवाजवळ (अल्लाहा) पोहचू शकतो असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी समाजातील सर्वच घटकांना सारखाच मान मिळाला पाहिजे यावर भर दिला. भक्तीरसाने ओथंबलेले संगीत, नृत्य देवाच्या जवळ घेवून जाते असा त्यांचा विश्वास होता. सूफी संतानी उर्दू आणि हिंदी भाषेत अनेक भजनांची रचना केली. कुतुबनने रचलेल्या 'मृगावती' आणि मलिक मोहम्मद जैसीने लिहिलेल्या 'पद्मावती' या रचनात सूफी तत्वज्ञानातील कल्पना आढळून येतात.

**कांही सुफी संतः**
*मोईन-उ-दीन चिस्ती,*
*बाबा फरीद*
*निजाम-उ-दीन*
*ऑलिया मलिक महामद*
*ख्वाजांबंदे नवाज.*

**भक्तीपंथाचे परिणामः**

हिंदू व मुस्लीम यांच्यामध्ये असलेल्या अंधश्रद्धेचे निवारण करणे व हिंदू-मुस्लीमांमध्ये ऐक्य निर्माण करणे ही भक्तीपंथाची दोन प्रमुख उद्दिष्टे होती. हिंदू समाजातील अनेक उणिवा या सुधारकांनी नाहिशा केल्या. भारतातील प्रादेशीक भाषांचा विकास झाला. तसेच या काळात भारतीय संस्कृतीचाही विकास झाला ही एक अभिमानाचीच गोष्ट आहे.

**तुम्हाला हे माहित आहे का?**

*भक्तीपंथातील संतानी आपल्या रचना बोली भाषेत केल्या. त्यामुळे भारतातील देशी भाषांचा विकास होऊन त्यांच्या साहित्य रचनांची वाढ झाली. यामुळे भारतीय साहित्य व संस्कृतीमध्ये मोलाची भर टाकली गेली. हिदीत सूरदासाचे 'सूरसागर', तुलसीदासाचे 'रामचरितमानस', ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' अशा अनेक संतांची कीर्तने, अभंग अजरामर आहेत.*

## स्वाध्याय

**I. योग्य शब्दासह रिक्त जागा भरा :**

1. भक्ती म्हणजे ____________ होय.
2. ____________ हे रामानंद यांचे प्रसिध्द अनुयायी होते.
3. कबीराच्या अनुयायांना ____________ म्हटले जाते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

4. चैतन्यांच्या तात्विक विचारांचा संग्रह ___________ .

5. रामधान्य चरित्र यांचे लेखक ___________ हे होते.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

6. राम-सितेची पूजा कोणी लोकप्रिय केली. त्यांच्या समाजासाठी कोणत्या सेवा आहेत?

7. शीख कोणाला म्हणतात? त्यांचा पवित्र ग्रंथ कोणता?

8. आसामच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासात श्रीमंत शंकरदेवाची भूमिका महत्वाची आहे. स्पष्ट करा.

9. पुरंदरदासानी भक्तीचे वर्णन कोणत्या शब्दतात केले आहे ?

10. भक्तीमार्गाच्या चळवळीचा परिणाम काय झाला?

**III. उपक्रम :**

1. भक्तीपंथाच्या चळवळीतील सुधारकांचे चरित्र जाणून घ्या.

2. भक्तीपंथातील संतांबद्दल तुमच्या शिक्षकांच्याकडून संपूर्ण माहिती गोळा करा.

**IV. प्रकल्प :**

1. भक्तीपंथातील कोणत्याही एका संताबद्दल प्रकल्प तयार करा.

2. भक्तीपंथातील सुधारकांच्या बद्दल समूहामध्ये प्रकल्प तयार करा.

3. तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने पुरंदरदास व कनकदास यांच्या कीर्तनातील मूल्यावर चर्चा करा.

4. कनकदास व पुरंदरदासांच्या कीर्तनाचा सराव करा.

***

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-19 वे

# युरोप - मध्य युग आणि आधुनिक युग

Q2C3H6

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *मध्ययुगीन सरंजामशाही व्यवस्था.*
- *पुनरुज्जीवनाची कारणे व परिणाम.*
- *भौगोलिक संशोधन आणि परिणाम.*
- *धार्मिक सुधारणांची कारणे व परिणाम.*
- *औद्योगिक क्रांती आणि परिणाम.*

**मध्य युगीन युरोप :**

पाचवे ते पंधरावे शतक युरोपियन मध्ययुग म्हणुन ओळखले जाते रोमन साम्रज्याच्या पतनापासून त्यांची सरजामाशाहीची सुरुवात होऊन इ.स. 1453 मध्ये कॉन्स्टॅनटिनोपलच्या पतनासह समाप्त झाली. रोमन साम्राज्याच्या पतनानंतर युरोपमधील अनेक देशातील राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेत अराजकता माजली. रोमन सम्राट चार्ल मॅग्नेच्या मृत्यूनंतर परिस्थिती आणखीनच बिघडली. याचा परिणाम असा झाला की युरोपच्या बऱ्याच भागात अराजकता (गोंधळ आणि अंदाधुंदी) इतकी माजली की जीवीत व मालमतेला कोणतेच संरक्षण नव्हते. अशा गंभीर परिस्थितीत पश्चिम युरोप मध्ये नवीन राजकीय आणि आर्थिक व्यवस्थतेचा जन्म झाला. ती व्यवस्था म्हणजे- सरंजामशाही होय.

15व्या शतकापर्यंत अनेक घटनांमुळे सरंजामशाहीचे पतन झाले. इंग्लंड, फ्रान्स आणि स्पेन मध्ये सामर्थशाली राज्य घराण्याच्या उदया नंतर सरंजामशाहीची इमारत कोसळली. प्रांतीय भाषेचा विकास, राष्ट्रीय भावना, राज्यांचा निरंकुश शासनाची आकांक्षा, यामुळे तिचा नाश झाला. सोळाव्या शतकात युरोपने नव्या युगात प्रवेश केला होता. युरोपचे आधुनिक युग ही एक प्रमुख घटना बनली. तुर्कानी कॉन्स्टॅटिनोपलचा विजय तसेच वाढता व्यापार यामुळे पुनरुजीवन, भौगोलीक संशोधन, धार्मीक सुधारणा चळवळी आणि औद्योगिक क्रांतीचा विकास झाला.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## पुनरुज्जीवन (The Renaissance) :

Renaissance या शब्दाचा अर्थ पुर्नजन्म किंवा पुनरुज्जीवन असा होतो. हा एक शब्द आहे जो एकत्रीतपणे युरोपच्या मध्ययुगाच्या उत्तरार्धांत झालेल्या सर्व बौद्धिक बदलाचा संदर्भ देतो. 14व्या व 15 व्या शतकात पाश्चात्य युरोपियन कला, वास्तूकला, धर्म, तत्वज्ञान, विज्ञान आणि राजकारणाच्या विकासाचे चिन्ह आहे.

## पुनरुज्जीवनाची कारणे :

1453 मध्ये कॉन्स्टॅन्टिनोपलचे पतन, गुलामगिरीचा अंत, जर्मनीमध्ये गुटेनबर्गच्या मुद्रण यंत्राचा विकास आणि पुनरुज्जीवना-साठी भौगोलिक शोध ही महत्वाची कारणे होती. तसेच विव्दान, कलाकार, शास्त्रज्ञ आणि तत्ववेत्त्यांना युरोपातील राजपुत्र, अभिजात व्यापारी आणि पाद्री यानी दिलेले संरक्षण देखील पुनरुज्जीवन काळात महत्वाचे योगदान आहे.

## पुनरुज्जीवनाची वैशिष्ट्ये :

1. मध्ययुगापेक्षा पुनरुज्जीवन काळातील लोकांच्या दृष्टीकोनात आमूलाग्र बदल घडून आला. जग आणि माणसांबद्दल लोकांचे मत बदलले. यालाच 'मानवतावाद' असे म्हटले जाते. मानवतावादी लोकांना उत्कृष्ट साहित्याबद्दल आसक्ती निर्माण झाली. त्यामुळे मानवी जीवनाशी संबंधित कृतीचे समर्थन करण्यात आले.

2. पुनरुज्जीवन काळातील लेखकांच्या इंग्रजी, इटालियन, जर्मन यासारख्या प्रादेशिक भाषेत निर्माण झालेल्या साहित्य कृती लोकप्रिय झाल्या.

3. लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात बदल घडून आले. शेतीवर अवलंबून असणारे लोक व्यापार व उद्योगधंद्याकडे वळले. सामाजिक संबंधात सुध्दा मुलभूत बदल झाले.

4. पुनरुज्जीवनाचे मुख्य वैशिष्ट म्हणजे लोकांच्या मनात उत्कृष्ट साहित्य, संस्कृती याबद्दल निर्माण झालेली आसक्ती होय. कोणतेही जे उत्कृष्ट व सकस असेल त्याचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती वाढली. यालाच अभिजातवाद (Classicism) म्हणतात.

5. ग्रीक व रोमन मधील विद्वानांचे इटली मध्ये स्थलांतर झाले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## पुनरुज्जीवन काळातील साहित्य :

इटली हे अनेक लेखकांची मातृभूमी होती. फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी व स्पेन यासारख्या देशानी सुध्दा या साहित्य निर्मीतीच्या प्रवाहात आपले उत्तम योगदान दिले. त्याकाळातील साहित्यात धार्मिक विषयाच्या ऐवजी संसारीक बाबी हाताळल्या जाऊ लागल्या. मानवी देह-शरीर वगैरे गोष्टी बद्दल लिहिले जाऊ लागले. साहित्यातील अभिव्यक्तीसाठी लॅटिन भाषे-ऐवजी प्रादेशिक भाषांचा वापर होऊ लागला.

### पेट्रार्क: (इ. स. 1304 ते 1374) :


पेट्रार्क

पेट्रार्कला 'पुनरुज्जीवनाचा जनक' असे म्हणतात. त्यानी सुमारे 200 लॅटिन आणि ग्रीक हस्तलिखितांचा संग्रह केला होता. त्याने 'आफ्रिका' हे प्रसिध्द काव्य लॅटिन भाषेत लिहिले. तो अनेक सुनीत (Sonnets) आणि गीतरचनेसाठी प्रसिध्द होता. त्याच्या काळामध्ये मानवाच्या जीवनामध्ये दिसणाऱ्या सुख दु:खाचे सखोल चिंतन आम्हाला पहायला मिळते. बोकॅशियोने इटालियन भाषेत लिहिलेल्या 100 कथांचा संग्रह 'डेकॉमेरॉन', डान्टेने लिहिलेल्या प्रसिध्द कृती म्हणजे 'डिव्हाईन कॉमेडी', इंग्लंडच्या चॉसरने लिहिलेल्या 'कॅन्टरबरीटेल्स', स्पेनच्या सर्व्हाटिसने लिहिलेले 'डॉन क्विझोट', इंग्लंडच्या थॉमस मूरने रचलेले 'युरोपिया' या पुनरुज्जीवन काळातील इतर साहित्यकृती होत्या. इंग्लंडचा शेक्सपीयर हा श्रेष्ठकवी व नाटककार होता. त्याने प्रसिध्द सुखान्त व दु:खान्त नाटके लिहिली. लंडनमध्ये स्थापन झालेली 'सेंट पॉल शाळा' या नूतन ज्ञानाच्या शिक्षणासाठीच वाहिलेली होती.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

### पुनरुज्जीवन काळातील कला (वास्तुकला आणि शिल्पकला) :


पुनरुज्जीवन काळातील कला

पुनरुज्जीवन काळातील कला ही अत्यंत साधी व वास्तववादी होती. पौराणिक व्यक्ती, देवपुत्र येशू ख्रिस्त व त्याचे शिष्य यांना शिल्पचित्रातून कलाकारांनी मानवी भावभावनांसह सहजतेने साकारल्या.

16 व्या शतकात इटलीमध्ये अनेक चित्रकार होते. मायकेल अॅन्जेलो, लिओनार्दो-द-व्हिन्सी, राफेल, टिटियान हे प्रमुख कलाकार होय.

'मायकेल अँजेलोचे 'अॅडम' आणि 'अंतिम निकाल' (Last Judgement), लिओनार्दो-द-व्हिन्सीचे 'अंतिम भोजन' (Last Supper), आणि मोनालिसा', राफेलचे 'सिस्टाईन मडोन्ना' आणि टिटियानचे 'अझम्पशन ऑफ दि व्हर्जिन' या चित्रकलेच्या क्षेत्रात आजही उत्कृष्ट कलाकृती मानल्या जातात.

**पुनरुज्जीवन काळातील विज्ञान (आधुनिक विज्ञानाचा जन्म) :**

पुनरुज्जीवनाच्या काळातच आधुनिक विज्ञानाचा जन्म झाला. विज्ञानामुळे जुन्या धार्मिक श्रध्दा बाजूला पडल्या आणि नवीन शोध लागले.

माणसाबद्दल जाणून घेण्याच्या प्रवृत्तीमुळे या काळात विज्ञानातील नवीन अविष्कारांचा प्रारंभ झाला. मध्ययुगातील लोक काही प्रश्न न विचारता सर्व गोष्टी स्विकारत होते. गरज व प्रश्न विचारण्याची मनोभावना जशी वाढली तसे वैज्ञानिक संशोधनही वाढले. फ्रॉन्सिस बेकनने जुने वैज्ञानिक निष्कर्ष परिपूर्ण ज्ञानाचे प्रतिनिधित्व करु शकत नाहीत हे जाहीर केले. डिकार्थेने कोणतीही गोष्ट स्विकारण्यापूर्वी आपण प्रश्न विचारले पाहिजे असे प्रतिपादन केले. पोलंडचा कोपर्निकसने ग्रीसच्या टॉलेमीचा भूकेंद्राचा सिध्दांत (Geo-Centric Theory) खोटा ठरवून ग्रहांचा केंद्र बिंदू सूर्य आहे असा सिध्दांत मांडला. पृथ्वी व इतर ग्रह सूर्याभोवती फिरतात असे मत मांडले.

**जोहान्स केपलर :**

केपलर हे जर्मन वैज्ञानिक होत. केपलर याने सर्व ग्रह सूर्याभोवती गोलाकार न फिरता लंबवर्तुळाकार कक्षेत फिरतात हे सिध्द केले.



**केपलर**



**गॅलिलिओ**

**गॅलिलिओः**

**गॅलिलिओने** दुर्बिणीचा शोध लावला. त्याने कोपर्निकसच्या सिध्दांताला पुष्टी दिली. त्यामुळे त्याला रोमला बोलावले आणि त्याला चर्चच्या रोषाला सामोरे जावे लागले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**न्यूटन :**



**न्यूटन**

न्यूटनने गुरुत्वाकर्षण शक्तीचा शोध लावला. आणि अवकाशातील सर्व ग्रहांच्या हालचाली गुरुत्वाकर्षणामुळे नियंत्रित केल्या जातात हे सांगितले.

रसायन शास्त्र, वैद्यकशास्त्र आणि शरीरशास्त्राच्या अभ्यासात लोकांची जास्त उत्सुकता वाढली. त्यामुळे अँड्र्यू व्हॅसालियस यानी मानवी शरीराचे विच्छेदन करुन हाडाचा सांगाडा, स्नायू, मेंदू, पचनेंद्रिये आणि जननेंद्रिये यावर परिणामकारक चिकित्सा करता येते हे सिध्द केले. आणि शरीरशास्त्रावर आधारित वैज्ञानिक ग्रंथ लिहिला.

**पुनरुज्जीवनाचे परिणाम:**

1. पुनरुज्जीवनाच्या काळात लोकांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला जग व माणसाबद्दल मानवतावाद वाढीस लागला.
2. पुनरुज्जीवन जगात विज्ञानाच्या विकासामुळे प्रगतीशील चिंतन वाढले.
3. जगात पुनरुज्जीवन काळात खगोलशास्त्रीय संस्थांच्या ज्ञानाचा प्रसार झाल्यामुळे भौगोलिक प्रदेशांचा शोध लावण्याचा प्रयत्न झाला.
4. वैज्ञानिक शोध, तांत्रिक प्रगती यामुळे उद्योगधंद्यावर त्याचा परिणाम झाला आणि औद्योगिक क्रांती झाली.
5. पुनुरुज्जीवनामुळे धार्मिक सुधारणेची नांदी झाली. कॅथोलिक चर्चमधील अंधश्रद्धा व हुकूमशाही नाहीशी झाली. व्यक्ती स्वातंत्र्याला महत्व मिळाले.

**भौगोलिक संशोधन:**

सोळावे शतक 'भौगोलिक संशोधनाचे युग' म्हणून ओळखले जाते. मध्ययुगाच्या अंतापर्यंत युरोपियनांचे भौगोलिक ज्ञान मर्यादित होते. नंतर युरोपियनांनी जगातील विविध भागात नवीन सागरी मार्ग शोधून काढले. त्यामुळे उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या नवीन खंडांचा शोध लागला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



**दिशादर्शक यंत्र**
समुद्र सफरी करणाऱ्या नाविकांना एखाद्या ठिकाणाचे अंतर व दिशा समजण्यासाठी वापरण्यात येणारे साधन.



**अॅस्ट्रोलॅब यंत्र**
सूर्यग्रह आणि नक्षत्रे याची गती व जमिनी पासूनचे असणारे अंतर आणि वेळ दाखविणारे साधन

**भौगोलिक संशोधनासाठी कारणीभूत घटक:**

> **तुम्हाला हे माहित आहे का?**
> *अमेरिगो वेस्पूसी यांनी अॅमेझान नदीये मुख शोधून त्याला नवीन खंड म्हटले याल अमेरिका म्हणून ओळखले जाऊ लागले.*

1. इ.स. 1453 मध्ये ऑटोमन तुर्कांनी कॉन्स्टॉन्टिनोपल हे शहर काबीज केले. त्यामुळे पूर्व आणि पश्चिम देशांमधील व्यापाराचे नवे मार्ग खुले झाले. भारतातून युरोपात निर्यात होणाऱ्या मसाल्याच्या पदार्थांमुळे तुर्की लोकांना आर्थिक फायदा झाला. त्यामुळे युरोपियनांना भारताकडे येणारा नवीन सागरी मार्ग शोधणे भाग पडले.
2. स्पेन आणि पोर्तुगाल या देशांची सागरी व्यापारात अरबांबरोबर स्पर्धा करण्याची इच्छा होती.
3. ख्रिश्चन धर्मगुरुंना ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी नवीन देश शोधावे असे वाटत होते.
4. पूर्वेकडील देशांकडे समुद्रप्रवास करण्याचे साहस केल्याने युरोपियनांचे कुतूहल अधिक वाढले.
5. नाविकांसाठी होकायंत्र आणि ग्रहोन्नतीमापक किंवा वेधयंत्र (Astrolobe) यासारख्या उपकरणांमुळे समुद्रात दूरवर सफरी करणे सोईचे झाले. उत्तम तक्ते आणि अचूक नकाशे यामुळे खलाशांना मदत झाली.
6. युरोपियनांच्या देशातील लोकांचा असा विश्वास होता की, पुर्वेकडील चीन सारख्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात संपत्ती आहे. चीन बरोबर व्यापार केल्यास तो फायदेशीर होईल असा त्याचा विश्वास होता.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## भूसंशोधनः

मध्ययुगानंतर नवीन भूप्रदेश शोधण्याचे कार्य सुरु करणारे महत्वाचे देश म्हणजे पोर्तुगाल आणि स्पेन. पोर्तुगालचा राजा हेन्री याने अनेक खलाशांना नवीन जलमार्ग शोधण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी आफ्रिकेची लांबलचक किनारपट्टी शोधून काढली. बार्थोलोमियो डायस हा आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत पोहोचला. त्याने त्याला केप ऑफ गुड होप (आशेचे भूशिर) असे नाव दिले. इ. स. 1498 मध्ये वास्को-द-गामा हा आफ्रिकेच्या केप ऑफ गुड होपला वळसा घालून हिंदू महासागर ओलांडून भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील कालिकत येथे पोहोचला आणि भारताकडे येणारा सागरीमार्ग शोधण्याचे युरोपियनांचे स्वप्न साकार झाले.




© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**जगाचा नकाशा (नवीन सागरी मार्ग)**

जिनेव्हा येथील दर्यावर्दी ख्रिस्तोफर कोलंबस स्पेनच्या राजाच्या मदतीने इ.स 1492 मध्ये अॅटलांटिक महासागर पार करून वेस्ट इंडिजच्या (कॅरिबियन) बहामा बेटावर पोहचला.

इ. स. 1500 मध्ये आणखी एक पोर्तुगीज खलाशी कॅब्रल हा ब्राझीलला पोहचला. पोर्तुगीज खलाशी बाल्बोआ हा पनामा समुद्रधुनीजवळ पोहचला आणि त्याने विशाल जलाशय पाहिले, तोच आता पॅसिफिक (प्रशांत) महासागर म्हणून ओळखला जातो.

आणखी एक पोर्तुगीज खलाशी फर्डिनंड मॅगेलान पृथ्वी प्रदक्षिणा करणारा पहिला खलाशी होय. सुमारे पाच महिने समुद्रातून प्रवास करुन इ. स. 1520 मध्ये तो दक्षिण अमेरिकेला पोचला. तेथून तो हिंदू महासागरातून फिलीपाईन्स बेटावर पोहोचला. त्याचे एक जहाज आजच्या इंडोनेशिया बेटाच्या मध्यातून जाऊन केप ऑफ गुड होपच्या मार्गाने स्पेनला परतले.

**भूसंशोधनाचे परिणाम:**

1. नव्याने शोधलेल्या भूमीत वसाहती स्थापन करण्यासाठी युरोपातील देशामध्ये स्पर्धा सुरू झाली. अमेरिका, आफ्रिका आणि आशियातील व्यापारात सामर्थ्य मिळविण्यासाठी स्पर्धा तीव्र झाली. यामुळे त्यांनी जिंकलेल्या देशांतील व्यापारात त्यांना मक्तेदारी मिळण्यास मदत झाली.
2. नवीन वसाहतीमधील कच्चा मालाने युरोपियन देश समृद्ध झाले.
3. युरोपमध्ये भांडवलशाही वाढली आणि औद्योगिक क्रांती सुरू झाली.
4. ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी त्यांच्या धर्माचा प्रसार सर्वत्र केला.
5. वसाहतवाद आणि साम्राज्यवादाच्या वाढीमुळे स्थानिक आणि परदेशी यांच्यात शत्रुत्व निर्माण झाले.
6. उत्तर अमेरीकेने आर्थिक विकासासाठी आफ्रिकन गुलांमाचा उपयोग केला. गुलांमाचा व्यापार अस्थीर करण्यात आला.

**धर्मसुधारणा (Religious Reformation) :**

सोळाव्या शतकात युरोपमध्ये झालेली सर्वात मोठी धार्मिक चळवळ म्हणजे रोमन कॅथॉलिक चर्चच्या एकाधिकारशाहीला आव्हान देण्यासाठी झालेले बंड. यालाच धर्मसुधारणा म्हणतात. चर्च ही मध्ययुगातील सर्वात शक्तिशाली संस्था होती. धर्मसुधारणेंमुळे नव्या युगाची पहाट झाली. मार्टिन ल्यूथरने सुरु केलेल्या धार्मिक चळवळीला 'धर्मसुधारणा' म्हणून ओळखले जाते. या चळवळीमुळे ख्रिश्चन धर्मात 'प्रोटेस्टंट' पंथ निर्माण झाला. या चळवळीला अनेक घटक कारणीभूत ठरले.

1) अनेक ख्रिश्चन धर्मगुरु, पोप हे धर्मनिष्ठ आणि त्यागी जीवन जगायचे सोडून भौतिक सुखात मग्न झाले होते. काहीजण स्वैर आनंद उपभोगण्यासाठी अनैतिक कृत्ये करीत होते. पोपचे राहणीमान राजघराण्यातील इतमामाला शोभेल असे होते. ते धर्माच्या

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुधारणेचा विचार करण्याचे सोडून राजकीय गोष्टीत जास्त रस घेत होते. इटलीचा बोकॅशियो, हॉलंडचा इरॅस्मस आणि इंग्लंडचा जॉन रिक्लिफ यांनी पोपच्या अशा कृत्यांचा धिक्कार केला.

2) पुरोहित वर्गापैकी सर्वजन विव्दान नव्हते. चर्चचा विश्वास, तत्वे यावर टीका करणाऱ्याविरुद्ध वादविवाद करुन जिंकण्याचे सामर्थ्यही त्यांच्या जवळ नव्हते.

3) मध्ययुगात पोप आणि राजे यांच्यात चाललेल्या कलहांमुळे राजांचा स्वाभिमान दुखावला गेला. त्यामुळे पोपचे वर्चस्व कमी होत गेले.

4) राजेशाहीचा विकास होऊन ती बलवान बनली. अनेक राजांना पोपला सन्मान देण्याची इच्छा नव्हती. आपल्या राज्याच्या अंतर्गत व्यवहारात रोमन कॅथॉलिक चर्च किंवा पोपने केलेला हस्तक्षेप राजांना आवडला नाही.

5) युरोपियनांमध्ये पुनरुज्जीवनामुळे वैज्ञानिक दृष्टी व कुतूहल वाढले होते. त्यामुळे धार्मिक गोष्टींच्या बाबतीत ही ते चिकित्सा करु लागले.

6) मूळ ग्रीक भाषेत असलेल्या बायबलचे इतर भाषात भाषांतर होऊन ते छापण्यात आले याला चर्चने विरोध केला.

**मार्टिन ल्यूथर (इ. स. 1483 ते इ. स. 1546) :**


**मार्टिन ल्यूथर**

मार्टिन ल्यूथरने सुरु केलेल्या चळवळीस धर्मसुधारणा असे म्हणतात. मार्टिन ल्यूथरने कॅथॉलिक चर्चच्या शिकवणुकीचा तिरस्कार केला. त्यांनी 1517 मध्ये पापमुक्तीचे परवाने देणाऱ्या चर्चविरुद्ध आपली नापसंती व्यक्त केली. कॅथॉलिक चर्चचे असे मत होते की पापांची शिक्षा कमी करण्याचा अधिकार देवाने पोपला बहाल केला. येशूख्रिस्त व धर्मप्रचारकानी केलेल्या चांगल्या कार्यामुळे त्यांना हा अधिकार प्राप्त झाला आहे. या प्रकारे पापमुक्त होण्यास व्यक्तीला स्वतः सत्कर्मे करावी लागतात. परंतु विविध संदर्भात तसे न करता चर्चना पैसे देऊन क्षमा मागण्याची पद्धत रूढ झाली. क्षमापत्रांची चर्चकडून विक्री केली जात होती. याला मार्टिनने ल्यूथर कडाडून विरोध केला. मार्टिन ल्यूथरच्या अनुयायांना प्रोटेस्टंट असे म्हणतात. जर्मनीच्या लोकसंख्येतील 50% लोक प्रोटेस्टंट बनले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

युरोपमध्ये धार्मिक सुधारणांना नवे वळण मिळाले. धार्मिक वातावरण बिघडले. युरोपमधील बहुसंख्य लोकांनी धार्मिक श्रद्धेमुळे आपल्या प्राणांचा त्याग केला. काही लोकांना तुरुगांत डांबण्यात आले. त्यांची संपत्ती काढून घेतली गेली. प्रबळ कॅथॉलिकांनी आपल्या भागातील प्रोटेस्टंटाना त्रास देण्यास प्रारंभ केला. याला उत्तर म्हणून सरकारचा पाठिंबा असलेल्या भागात प्रोटेस्टंट लोक कॅथॉलिकांना त्रास देऊ लागले. कॅथॉलिक व प्रोटेस्टंट मधील द्वेष व संघर्षाचे हे युद्ध तीस वर्षे चालू होते.

**धर्मसुधारणेचे परिणाम :**

1) धर्मसुधारणेच्या परिणामामुळे ख्रिश्चन धर्माच्या एकतेला मोठा धक्का बसला. ख्रिश्चन धर्माच्या मुख्य तीन शाखा झाल्या. त्या म्हणजे कॅथॉलिक चर्च, आर्थोडॉक्स चर्च आणि प्रोटेस्टंट चर्च.
2) युरोपातील अनेक देशांचे राजे पोपच्या वर्चस्वातून मुक्त झाले.
3) धर्मसुधारणेमुळे राष्ट्रवादांचा उदय झाला.
4) चर्चची जप्त केलेली संपत्ती आर्थिक विकासासाठी वापरण्यात आली.
5) राष्ट्रीय भावना आणखी प्रबळ झाली आणि युरोपच्या राजांनी धार्मिक सहिष्णुतेचा स्विकार केला.
6) या चळवळीमुळे साहित्यक्षेत्राचा विकास झाला आणि युरोपातील लोकांच्या मनावर प्रादेशिक भाषांचा प्रभाव पडला.
7) कॅथॉलिक चर्चमध्ये सुधारणा होऊन तीच पुढे 'प्रतिसुधारणा चळवळ' म्हणून ओळखली जाऊ लागली.

**प्रतिसुधारणा चळवळ (Counter Reformation) :**

प्रोटेस्टंट पंथाचा सगळीकडे प्रभाव पडून त्याचा वेगाने प्रसार झाला. यामुळे जागृत झालेले कॅथॉलिक आपली गेलेली प्रतिष्ठा परत मिळविण्यासाठी आपल्यामध्येच सुधारणा करण्याचा विचार करु लागले. प्रोटेस्टंट वादामुळे लोकांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. या घटनेमुळे रोमन चर्चच्या अस्तित्वावर मोठा आघात झाला. त्याना चर्चच्या हिताचे रक्षण करण्यासाठी काहीतरी करावे लागले. या गरेजेतूनच 'प्रतिसुधारणा चळवळ' सुरु झाली. प्रोटेस्टंटांच्या प्रगतीला खीळ घालणे आणि रोमन चर्चची गेलेली प्रतिष्ठा परत मिळविणे हाच या चळवळीचा उद्देश होता. म्हणजेच चर्चमध्ये आंतरिक सुधारणा करुन सर्व अडचणींवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

या प्रतिसुधारणा चळवळीचा नेता एक स्पॅनिश श्रीमंत गृहस्थ होता. त्याचे नाव 'इग्नेशियस लायोला' होते. त्याने इ. स. 1540 मध्ये 'जीझस सोसायटी' स्थापन केली. रोमन कॅथॉलिक चर्चचा अधिकार आणि गेलेल्या वैभवाची पुन:स्थापना करणे हाच यांचा प्रमुख उद्देश होता. या संस्थेच्या अनुयायांचा उद्देश म्हणजे चांगले शिक्षण व प्रशिक्षण देऊन समाजाच्या सेवेसाठी आपले जीवन समर्पित करणे हा होता.

चर्चच्या नियमांचे उल्लंघन करण्याऱ्यांना चौकशी करुन शिक्षा देण्याच्या उद्देशाने 'इक्विझेशन' ही धार्मिक विचारणा पध्दत इ.स. 1542 पासून अंमलात आली. कॅथॉलिकांना प्रोटेस्टंट पंथ स्विकारण्यापासून परावृत्त करण्यात आले.

## औद्योगिक क्रांती

18 व्या शतकात यंत्रावर आधारीत उद्योगांच्या वाढीमुळे वस्तुंच्या उत्पादनात अद्‌भुतपूर्व वाढ झाली या युगाला औद्योगिक क्रांती म्हणून ओळखले जाते ज्याची सुरूवात इंग्लंडमध्ये झाली.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**औद्योगिक क्रांतीची कारणे:**

1. पुनरूज्जीवनाच्या प्रभावामुळे शक्य झालेल्या वैज्ञानिक शोधामुळे यंत्राची निर्मीती झाली.
2. वसाहतीच्या स्थापनेमुळे व्यापार वाढला आणि तयार वस्तुंची मागाणी वाढली.
3. वसाहतीनी अत्यंत कमी दरात प्रंचड प्रमाणात कच्या मालाचा पूरवठा केला.
4. औद्योगिक कामगार वर्गाचा उदय झाला.
5. भांडवली गुंतवणुकीत मोठी वाढ झाली.
6. इंग्लंडमध्ये राजकिय स्थिरता पसरली.

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात कारखाने व वाहतूक क्षेत्रात क्रांतीकारी बदल घडून आले. इ.स. 1760 ते इ.स. 1830 या काळात औद्योगिक क्षेत्रात झालेल्या बदलांना 'औद्यागिक क्रांती' म्हणतात.

औद्योगिक क्रांतीची सुरुवात प्रथम इंग्लंडमध्ये झाली. त्यानंतर जगातील इतर देशात त्याचा प्रसार झाला. सामान्यत: क्रांती म्हणजे राजकीय क्षेत्रातील जलद व हिंसात्मक मोठा बदल पण इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीमध्ये अशा प्रकारचे जलद व हिंसात्मक बदल झाले नाहीत. यातील बदल सावकाश होत असले तरी व्यापक आणि दूरगामी होते.

इ.स. 1760 पूर्वी इंग्लंड हा कृषिप्रधान देश होता. तरी लोकरी कपडे व सुती वस्त्रोद्योगांचा तेथे विकास झाला होता. जसा व्यापार वाढला तशी तयार कपड्यांची मागणी वाढली, पण मागणीप्रमाणे उत्पादन होत नव्हते. कुशल कारागीर, कच्च्या वस्तूंसाठी जास्त भांडवल घालून उत्पादन घेऊ शकत नव्हते, म्हणून काही श्रीमंत लोकांनी या कुशल कारागीरांना मजूर म्हणून नेमले आणि त्यांना कच्या मालाचा पुरवठा करुन कारखान्यांसारख्या मोठ्या इमारतीत काम करण्यास भाग पाडले. याचेच रुपांतर पुढे कारखान्यांमध्ये झाले. कारखान्यांच्या मालकांनी येथे तयार झालेल्या वस्तूंची विक्री करुन जास्त नफा मिळविला. तरीही कुशल कारागीर व कामगार गरीबच राहिले.



**स्पिनिंग जेनी यंत्र**

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**तुम्हाला हे माहित आहे का?**

1764 मध्ये जेम्स हारग्रीव्हज याने 'स्पिनिंग जेनी' नावाचे सूत कातण्याचे यंत्र शोधून काढले. काही वर्षानंतर रिचर्ड आर्कराईट याने 'स्पिनिंग जेनी' मध्ये सुधारणा केली आणि इ.स. 1769 मध्ये पाणचक्कीवर सूतकताईयंत्र चालविण्याचा प्रयोग यशस्वी केला.

इ.स. 1779 मध्ये सॅम्युअल क्रॉम्प्टनने 'म्यूल' यंत्राचा शोध लावला. जॉन के याने धावत्या धोट्याचा शोध लावला. इ.स. 1785 मध्ये एडमंड कार्टराईटने पॉवरलूम' (बाष्पशक्तीवर चालणारा यंत्रमाघ) चा शोध लावला. यामुळे कमीतकमी वेळात जास्तीत जास्त कापडाचे उत्पादन शक्य झाले.

इ.स. 1793 मध्ये ॲली विटनी याने 'कॉटन जीन' हे यंत्र शोधून काढले. या सर्व शोधांमुळे दोरा तयार करणे, विणणे आणि कापसापासून सरकी वेगळी करणे शिवाय अतिजलद कापड उत्पादन घेणे शक्य झाले.

वाफेच्या इंजिनाचा शोध हा औद्योगिक क्रांतीमध्ये आणखी एक मैलाचा दगड ठरला. इ.स. 1705 मध्ये थॉमस मॅकोमेसने एक वाफेचे यंत्र शोधून काढले. इ.स. 1774 मध्ये जेम्स वॅटने बाष्पशक्तीवर चालणारे इंजिन रेल्वेच्या डब्याला जोडून रस्त्यावर चालविण्याचा प्रयोग केला. त्यानंतर रुळावरुन चालणारे एक स्वयंचलित इंजिन शोधून काढले. इ.स. 1815 मध्ये जॉर्ज स्टीफन्सनने सामान वाहून नेणाऱ्या रेल्वेच्या बोगींचा शोध लावला.

इंग्लंडमधील स्टॉकटन आणि डार्लिंगटन मधील प्रवाशांच्या वाहतुकीसाठी एक रेल्वे सुरु झाली. लिव्हरपूल व मँचेस्टर मधील औद्योगिक उत्पादने वाहून नेण्यासाठीच रेल्वेमार्ग तयार करण्यात आले.

इ.स. 1801 मध्ये अमेरिकेतील विल्यम सिमिंग्टन याने वॅटचे इंजिन एका बोटीला जोडून चालविण्याचा प्रयोग केला. रॉबर्ट फुल्टन याने आणि एका अमेरिकनाने एक बाष्पशक्तीवर चालणारे जहाज तयार केले.

1760 ते 1830 या कालावधीत इंग्लंडमध्ये कापड तयार करण्याच्या उद्योगात मोठ्या प्रमाणात बदल झाले.

**औद्योगिक क्रांतीचे परिणाम:**

उद्योगांमधील अनेक बदलामुळे यंत्राची मागणी वाढली. औद्योगिक क्रांतीनंतर आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. नवीन उद्योग उदयास आले. उत्पादन खर्च कमी झाला. आणि जीवनावश्यक वस्तू कमी किंमतीत उपलब्ध झाल्या. कुटीर उद्योग मोठ्या कारखान्यांशी स्पर्धा करू शकले नाहीत. त्यामुळे गृहउद्योग उद्ध्वस्त झाले. श्रीमंत श्रीमंतच होत गेला आणि गरीब गरीबच राहिला. लोकांना खेड्यातून शहराकडे स्थलांतर करावे लागले. समाजात भांडवलदार वर्गाचा उदय झाल्यामुळे मालक आणि कामगार यांच्यातील संबंध बिघडले आणि वर्ग संघर्ष सुरू झाला.

**चर्चा करा :**
*औद्योगिक क्रांती ही आजच्या आर्थिक विकासाला पूरक आहे. चर्चा करा.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा :**

1. 'पुनरूज्जीवन' म्हणजे __________ .
2. पुनरुज्जीवनाचा जनक __________ याना म्हणतात.
3. मार्टिन ल्युथरच्या अनुयायाना __________ म्हणतात.
4. प्रतिसुधारणा चळवळीचा नेता __________ .
5. 'स्पिनिंग जेनी' यंत्राचा शोध __________ याने लावला.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

6. धर्मसुधारणेचे परिणाम कोणते?
7. भौगोलिक संशोधनासाठी कारणीभूत घटक कोणते ते लिहा.
8. लिओनार्दो-द-व्हिन्सीच्या मुख्य कलाकृती कोणत्या?

9. पुनरुज्जीवन काळातील साहित्याच्या विकासाचे उदाहरणासहित विवरण करा.

10. औद्योगिक क्रांतीचे परिणाम सांगा.

**III. उपक्रम :**

1. पुनरुज्जीवन काळातील वैज्ञानिकांबद्दल तुमच्या शिक्षकांकडून जाणून घ्या.
2. औद्योगिक क्रांतीमध्ये शोध लागलेल्या चित्रांचा संग्रह करा.

**IV. प्रकल्प :**

1. पुनरुज्जीवन काळातील कलाकार व त्यांच्या चित्रांचा संग्रह करुन प्रकल्प तयार करा.
2. शास्त्रज्ञ आणि त्यांचे शोध यांची यादी करा.
3. तुमच्या शाळेतील चित्रकला शिक्षकांबरोबर चर्चा करुन अलिकडील कलाकारांचे जीवन व त्यांचे चरित्र यांचा संग्रह करा.
4. युरोपातील वैज्ञानिकांच्या पूर्वी भारतात होऊन गेलेल्या शास्त्रज्ञांचे नाव व त्यांच्या संशोधनाची यादी करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-20 वे

# क्रांती आणि राष्ट्र-राज्यांचा उदय

L8EZA7

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल:**

- *राष्ट्रीय राजवटीचा उदय आणि विकास.*
- *अमेरिकेच्या स्वातंत्र्य युध्दाची कारणे व परिणाम.*
- *फ्रान्सच्या राज्यक्रांतीची कारणे.*
- *इटली आणि जर्मनीचे एकीकरण.*

आधुनिक युगाची सुरूवात दर्शविणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे राष्ट्रीय प्रभुत्वाचा उदय. सामान्यतः 15 व्या 16 व्या आणि 17 व्या शतकात उदयाला आलेल्या राज्याच्या निर्मितीसाठी तर्कसंगत आधार नव्हते. तेथे सम्राटापासून ते नगर राज्यापर्यंत विविध प्रकारचे लोक होते. तेथे राहणारे लोक एकजिनसी नव्हते. ते वेगवेगळे राष्ट्रीयत्व असणारे होते. वेगवेगळ्या भाषा ते बोलत होते. ते भिन्न भिन्न संस्कृतीचे होते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

सरंजामशाहीच्या ऱ्हासानंतर सरंजामदारांची राजकीय ताकदही कमी झाली. त्यामुळे युरोपातील अनेक राजांनी सरंजामदारांवर नियंत्रण आणून सत्ता आपल्या हाती एकवटली. अनेक राजांचा 'ईश्वरदत्त राजसत्ता'(Divine Rights) यावर विश्वास होता. प्रजेला उत्तर देण्यास ते बांधील नाहीत अशी त्यांची समजूत होती.

मध्यम वर्गाने त्यांच्या हितरक्षणाच्या दृष्टीने राजांना पाठिंबा दिला आणि राष्ट्र - राज्यांचा उदय आणि विकासात महत्वाची भूमिका बजावली. अतिप्रबळ राष्ट्रवाद किंवा देशप्रेम याचे काही चांगले व वाईट परिणामही होते. राष्ट्र-राज्यांमुळे सरंजामशाहीच्या काळातील राजकीय बेबंदशाहीचा अंत झाला. समान संस्कृती असलेले लोक एकाच राजाच्या अधिपत्याखाली एकत्र आले.

प्रखर राष्ट्रवाद किंवा देशप्रेमामुळे राष्ट्राराष्ट्रात संघर्ष व स्पर्धा सुरु झाली. अमेरिका आणि आशिया खंडात व्यापार आणि वसाहतींवर ताबा मिळविण्यासाठी संघर्ष होऊन युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली.

**उत्तर अमेरिकेतील 13 इंग्लिश वसाहती:**

1. न्यू हँपशायर
2. न्यूयॉर्क
3. पेनसिल्वानिया
4. मॅसेच्युसेटस्
5. ऱ्होड आयलँड
6. कॉर्नक्टिंयट
7. न्यू जर्सी
8. डिलावेअर
9. मेरी लँड
10. व्हर्जिनिया
11. उत्तर कॅरोलिना
12. दक्षिण कॅरोलिना
13. जॉर्जिया

## अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द

अमेरिका खंडाचा शोध लागल्यावर युरोपमधल्या अनेक देशांनी तेथे वसाहती स्थापन करण्यास प्रारंभ केला. फ्रान्स, स्पेन, हॉलंड आणि इंग्लंड हे उत्तर अमेरिकेत वसाहती स्थापन करणारे प्रमुख देश होते. उत्तर अमेरिकेच्या अटलांटिका किनारपट्टीला लागून इंग्लंडच्या तेरा वसाहती स्थापन झाल्या. त्यांनाच 'नवीन इंग्लिश वसाहती' म्हणत होते. उत्तर अमेरिकेत वसाहती स्थापन करण्यात इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यात मुख्य स्पर्धा होती. संपूर्ण स्वातंत्र्याच्या प्रबळ इच्छेमुळे अमेरिकेतील तेरा वसाहतींनी आपल्या मायदेशाच्या नियंत्रणातून मुक्त होण्यासाठी बंड केले. हीच ''अमेरिकेची राज्यक्रांती'' होय.

**कारणे:** वसाहतींबद्दल मायदेशाचे धोरण आणि स्वातंत्र्याविषयी वसाहतवाल्यांचे प्रेम, सप्तवार्षिक युध्दाचे परिणाम, नौकानयन कायदा (नेव्हिगेशन अॅक्ट), थॉमस पेन, जॉन अॅडम्स, जॉन एडवर्ड कोक आणि बेंजामिन फ्रॅंकलिन वगैरे लेखकांचा प्रभाव, क्विबेक कायदा, टाऊनशिप ड्यूटी (स्टॅंप ड्यूटी) आणि बोस्टन टी पार्टी वगैरे कारणांमुळे अमेरिकेत क्रांती झाली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**हे तुम्हाला माहित असू दे:**

*सप्तवार्षिक युध्द (इ.स. 1756 ते 1763) हे युध्द फ्रान्स व इंग्लंड यांच्यात झाले. इ.स. 1760 मध्ये नौकानयन कायदा (नेव्हिगेशन अॅक्ट) अंमलात आला. यानुसार इंग्लंडने वसाहतींवर कायदा लादला. उत्तर अमेरिकेत 13 इंग्लिश वसाहती होत्या. त्यानी समुद्रातील व्यापारावर आपली मक्तेदारी निर्माण केली होती. इ.स. 1764 मध्ये अंमलात आलेल्या मोलॅसिस (काकवी) कायद्याने अमेरिकेतील मद्यनिर्मिती करण्याऱ्यांना काकवी पुरविण्याची संधी इंग्लंडला प्राप्त झाली. इ.स. 1774 च्या क्विनेक कायद्यामुळे वसाहत वाल्यांच्यात असंतोष पसरला. इ.स. 1765 मध्ये स्टॅंप अॅक्ट' अंमलात आला. पुढे इ.स. 1767 मध्ये चहा, कागद, काच, रंग वगैरे वस्तूंवर सुध्दा कर लादण्यात आला.*

***बोस्टन टी पार्टी (इ.स. 1773):*** *वसाहतवाल्यांचा विरोध असूनही चहाच्या पेट्यांनी भरलेले ब्रिटनचे जहाज बोस्टन बंदरात पाठविले. त्यामुळे वसाहतवाल्यांना याचा संताप आला. 50 लोकांच्या एका गटाने रेड इंडियन लोकांचा वेष परिधान करुन चहाने भरलेल्या जहाजात प्रवेश केला आणि 340 चहाच्या पेट्या समुद्रात फेकून दिल्या.*

**स्वातंत्र्याची घोषणा:** प्राप्त परिस्थितीविषयी विचार विनिमय करण्यासाठी अमेरिकेच्या तेरा वसाहतींचे प्रतिनिधी इ.स. 1774 मध्ये फिलाडेल्फिया येथे एकत्र आले. त्यांनी त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या मायदेशाच्या प्रयत्नांना सशस्त्र लढ्याच्या रुपात विरोध करण्याचे ठरविले. ब्रिटनच्या राजाने त्यांच्या या कृतीला बंड म्हणून घोषित केले. आणि वसाहतवाल्यांचे बंड दडपण्यासाठी सैन्याची तुकडी पाठविली. वसाहतवाल्यांच्या समोर स्थानिक सैन्याच्या मदतीने ब्रिटीश सैन्याला प्रतिकार करण्यावाचून दुसरा मार्ग उरला नाही. अशा प्रकारे इ.स. 1775 एप्रिल 19 रोजी 'लेक्झिंग्टन' येथे वसाहतवाल्यांच्या एका सैन्याच्या तुकडीने ब्रिटीश सैन्यावर हल्ला चढविला. यालाच 'अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द' म्हणतात. तेंव्हा फिलाडेल्फियाच्या राष्ट्रीय सभेने जॉर्ज वॉशिंग्टनला वसाहतींच्या सैन्याचा सेनापती म्हणून नेमले.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**जॉर्ज वॉशिंग्टन:** तो व्हर्जिनिया येथील एका मळ्याचा मालक होता. त्याने फ्रेंचांच्या विरुध्द झालेल्या सप्तवार्षिक युध्दात प्रमुख भूमिका बजावून एक सेनाधिकारी म्हणून कीर्ती मिळविली होती. त्याने वसाहतींच्या अशिक्षित व बेशिस्त सैनिकांमध्ये धैर्य व उत्साह निर्माण केला आणि ब्रिटीश सैन्याविरुध्द शौर्याने लढण्याची प्रेरणा दिली. इ.स. 1776 जुलै 4 रोजी फिलाडेल्फियाच्या राष्ट्रीय सभेने इतिहासात प्रसिध्द असलेला 'स्वातंत्र्याचा जाहीरनामा' स्विकारला. या जाहीरनाम्याने सर्व तेरा वसाहती आपल्या मायदेशापासून सर्व राजकीय संबंधापासून मुक्त आहेत असे घोषित केले.



**जॉर्ज वॉशिंग्टन**

**युध्द:** इंग्लंड आणि वसाहतवाल्यांमधील हे युध्द सात वर्षे चालले. प्रारंभी वसाहतवाल्यांना माघार घ्यावी लागली. जॉर्ज वॉशिंग्टनला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. पण 'सार्टोग' येथील युध्दात ब्रिटीश सैन्याचा पराभव झाला. फ्रेंच सैन्याच्या

सहाय्याने यॉर्कटाऊन युध्दात जॉर्ज वॉशिंग्टनने ब्रिटीश सैन्याचा संपूर्ण पराभव केला. ब्रिटीश सेनापती कॉर्नवॉलिस आपल्या सैन्यासह शरण आला. अखेर इ.स. 1783 मध्ये झालेल्या पॅरिस येथील तहाने तेरा वसाहतींचे स्वातंत्र्य ग्रेट ब्रिटनने मान्य केले. 4 जुलै रोजी स्वातंत्र्याची घोषणा केल्यामुळे तो दिवस अमेरिकेच्या दृष्टीने महत्वाचा ठरला. आजही 4 जुलै हा दिवस अमेरिकन लोक आपला स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करतात.

इ.स. 1787 मध्ये स्वतंत्र झालेल्या तेरा वसाहतींच्या प्रतिनिधिंनी फिलाडेल्फिया येथे सभा घेतली आणि जॉर्ज वॉशिंग्टनला अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाचा अध्यक्ष म्हणून निवडले. त्यांनी संघराज्याची राज्यघटना तयार केली. ही जगातील प्रथम लिखित घटना (संविधान) ठरली.

**अमेरिकेच्या स्वातंत्र्य युध्दाचे परिणाम:** यामुळे फ्रान्सच्या राज्यक्रांतीस प्रेरणा मिळाली. वसाहतवाल्यांच्या बाजूने लढलेले अनेक फ्रेंच सैनिक नंतर फ्रान्सच्या राज्यक्रांतीचे नेते बनले. त्यामुळे स्पेन आणि पोर्तुगीज वसाहतींना त्यांच्या मायदेशाविरुध्द बंड करुन स्वातंत्र्य मिळविण्याची स्फूर्ती मिळाली. अमेरिकेची संयुक्त संस्थाने' (USA) या नवीन राष्ट्राचा उदय झाला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## फ्रान्सची राज्यक्रांती

फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्देश म्हणजे तेथील निरंकुश राजसत्ता उलथून टाकणे आणि समानता व लोकशाहीवर आधारलेली नवीन सामाजिक व राजकीय व्यवस्था प्रस्थापित करणे. या क्रांतीचा जगातील इतर देशातील राजकीय चळवळीवर खोलवर प्रभाव पडला.

**कारणे:** फ्रान्सच्या राज्यक्रांतीला खालील घटक कारणीभूत ठरले.

> **हे तुम्हाला माहित असू दे:**
> *इतिहासकारांच्या मतानुसार फ्रान्सची क्रांती झाल्यावर युरोपचा इतिहास एक राष्ट्र, एक घटना आणि एका व्यक्तीमध्ये एकवटला गेला. ते राष्ट्र म्हणजे फ्रान्स, ती घटना म्हणजे फ्रेंच क्रांती आणि ती व्यक्ती म्हणजे नेपोलियन.*

**सामाजिक कारणे:** फ्रेंच समाजात फार मोठ्या प्रमाणात विषमता होती. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ही असमानता होती. ही असहनीय व अमानवीय गोष्ट होती. बुध्दिवंतांनी व सामान्य लोकांनी याचा तिरस्कार केला. क्रांतीच्या पूर्वी फ्रान्सच्या समाजात तीन वर्ग होते. त्यांना इस्टेट म्हणत. पहिल्या वर्गात धर्मगुरु (पाद्री), दुसऱ्या वर्गात अमीर (श्रीमंत) उमराव आणि उरलेल्या सर्वसामान्य लोकांचा समावेश तिसऱ्या वर्गात केलेला होता.

पहिल्या दोन वर्गांना विशेषाधिकार होते. आणि ते संख्येने अत्यंत कमी होते. सर्व प्रकारच्या कर भरण्यापासून ते मुक्त होते. शिवाय ते ऐष आरामी जीवन जगत होते.

तिसऱ्या वर्गातील लोक सर्व सोयींपासून वंचित होते. बुद्धीवंत, शेतकरी, कामगार कारागीर याचा समावेश होता. त्याचे उत्पन्न अत्यंत कमी होते. त्याच्यावर कराचा बोजा अधिक होता. त्यांचे जीवन दु:खपूर्ण होते. या सर्व लोकांना समाजात मानाचे स्थान नव्हते. त्यांना राजकीय हक्क नव्हते आणि त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जात असे. त्यांना धार्मिक किंवा राजकीय कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. फ्रान्समधील जनतेत हेच लोक अत्यंत असमाधानी होते. ते लोक जुनी व्यवस्था उलथून टाकण्यासाठी संधीची वाटच पहात होते.

**आर्थिक कारणे:** फ्रान्स हा मूलत: कृषिप्रधान देश होता. जरी शेती पध्दतीमध्ये काही सुधारणा झालेल्या असल्या तरी शेती अजूनही मागासलेली होती. जमिनीपासून मिळणारे उत्पन्न फार कमी होते. शेतकऱ्यांनाच जास्त कष्ट भोगावे लागत होते. दुष्काळ पडणे ही गोष्ट सर्वसामान्य होती. त्यामुळे अन्नासाठी उठाव होत. उद्योगधंद्यावर व्यापारी संघाचे नियंत्रण होते. अंतर्गत अडथळ्यांमुळे आणि अधिकाऱ्यांच्या अतिहस्तक्षेपामुळे त्यांची वाढ खुंटली होती. याचा परिणाम म्हणजे उद्योगात उत्पादन कमी होऊ लागले.

**राजकीय कारणे:** फ्रान्सवर बुर्बान घराण्याची सत्ता होती. 16 वा लुई हा राजा बुध्दिमान परंतु अकार्यक्षम होता. तो व्हर्सेलिस येथील आलिशान राजवाड्यात आपल्या कुटुंबसंहित व राजदरबारी व्यक्तींसह रहात होता. तो सुखी व विलासी जीवन जगत असे. शिवाय तो उधळ्या स्वभावाचा होता. पण सरकारी कामकाजाकडे तो दुर्लक्ष करीत होता. त्याची पत्नी मेरी अन्तोनेत ही ऑस्ट्रियन राजकन्या होती. ती आपल्या सुखभोगावर व सणावर पैसे ऊधळीत असे. लोकांच्या समस्यांबद्दल तिला चिंता नव्हती. ती देशाच्या राज्यकारभारात लुडबुड करीत असे. ती विदेशी असल्याने आणि लोकांच्याबद्दल तिला प्रेम नसल्यामुळे लोक तिचा व्देष करीत. राजाही तिच्यावर नियंत्रण ठेवू शकला नाही आणि परिस्थिती हळूहळू हाताबाहेर गेली. याचा परिणाम म्हणजे ही क्रांती घडून आली.

**फ्रेंच विचारवंतांचा प्रभाव:** प्रसिध्द तत्वचिंतक आणि विव्दान असलेले माँटेस्क्यू, रुसो, व्हॉल्टेअर यांच्या क्रांतीकारी लेखनाच्या प्रभावामुळे लोकांना उत्तेजन मिळाले.

**माँटेस्क्यू:** याने ''स्पिरीट ऑफ लॉज'' या ग्रंथात राजसत्ता ही 'ईश्वरदत्त सत्ता' (Divine right of King) ही गोष्ट निराधार असून त्याला त्याने दोष दिला आणि संविधानात्मक राजसत्तेला पाठिंबा दिला.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**रुसोः** रुसोने आपल्या ''सामाजिक करार'' (Social contract) या ग्रंथात ''माणूस जन्माला येताना मुक्त असतो. परंतु नंतर तो प्रत्येक ठिकाणी बंधनात अडकला जातो'' असा विचार मांडला.

**व्हॉल्टेअरः** त्याने आपल्या लेखनातून फ्रान्समधील रुढी, परंपरा, अस्तित्वात असणाऱ्या संस्था आणि अंधश्रध्दांवर हल्ला चढविला. रोमन कॅथॉलिक चर्चवर त्याने कडाडून टीका केली.


मॉंटेस्क्यू


रुसो


व्हॉल्टेअर

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**अमेरिकन स्वातंत्र्य युध्दाचा प्रभावः** अमेरिकेच्या स्वातंत्र्य युध्दाचा फ्रेंचांवर खोलवर परिणाम झाला. अमेरिकेत इंग्रजांविरुध्द लढलेले फ्रेंच सैनिक आपल्या मायदेशाला परतले. त्यांनी क्रांतीकारी लोकांना आवश्यक बळ व उत्साह देऊन क्रांतीमध्ये महत्वाची भूमिका बजावली.या सर्व घटनांमुळे फ्रान्सच्या राजाला 175 वर्षापासून न बोलावलेली फ्रेंच संसद बोलवावी लागली. या संसदेला 'स्टेटस् जनरल' म्हणत. तिसऱ्या वर्गाच्या सदस्यांनी स्वत:ला 'राष्ट्रीय सभा' म्हणून घोषित केले, आणि इतर इस्टेटमधील लोकांनाही आपल्यामध्ये सामील होण्याचे आवाहन केले.

14 जुलै 1789 रोजी लोकांनी बॅस्टीलच्या राष्ट्रीय तुरुंगावर हल्ला करुन कैद्यांची मुक्तता केली, आणि निरंकुश राजसत्तेचा अंत केला. हळूहळू ही क्रांती देशाच्या इतर भागातही पसरली. राजा केवळ नावापुरताच राहिला. राष्ट्रीय सभाच सर्व कायदे करत होती, आणि आज्ञा सोडत होती. त्यांनी 27 ऑगस्ट 1789 रोजी ''मानव आणि नागरिक हक्कांचा जाहीरनामा'' स्वीकारला. राजसत्ता उलथून टाकली, आणि त्यांनी लोकसत्ताकाची स्थापना केली.

आता क्रांतीने हिंसक स्वरुप धारण केले. जलद सुधारणेची इच्छा असणाऱ्या 'जॅकोबिन' नावाचा क्रांतीकारी गट सत्तेवर आला. क्रांती धोक्यात आहे. या भीतीने 'दहशतीचे राज्य' सुरु झाले. यांचा नेता रॉबेस्पियर हा होता. राजनिष्ठ लोकांना व संशयितांना 'गिलोटीन वर' ठार मारण्यात आले.

**परिणाम:** फ्रेंच क्रांतीमुळे महत्वाचे परिणाम घडून आले. सरंजामशाही पध्दतीचा नाश झाला. धर्मगुरु आणि अमीर उमराव यांना असणारे विशेषाधिकार व सवलती रद्द करण्यात आल्या. श्रीमंतांच्या जमिनी हिसकावून घेतल्या. चर्च हे राज्यांच्या अधिकाराखाली आले. देशभरात एकसूत्री शासन व्यवस्था अंमलात आली. लोकांना स्वातंत्र्य, समानता आणि बंधुभाव या तत्वांची खात्री देण्यात आली.

## एकीकरणाच्या चळवळी

### इटलीचे एकीकरण :

प्राचीन रोमन साम्राज्याचे वैभव पाहिलेल्या इटली देशात एकच भाषा बोलली जात असूनही तो देश फुटून अनेक राज्यात विभागला गेला. इटलीमध्ये सर्वत्र रोमन कॅथॉलिक हा एकच धर्म होता. एकच राजसत्ता मिळवण्याची योग्यता असली तरी अशा प्रकारचे एकीकरण तेथे असाध्य होते.




NOT TO BE REPUBLISHED @KTBS

19 व्या शतकाच्या पूर्वार्धात इटली हे अनेक छोट्या छोट्या राज्यात विभागले गेले होते. त्यामध्ये लोम्बार्डी, व्हेनेशिया, सिसिली, नेपल्स (दोन्ही सिसिलीचे राज्य), पोपचे राज्य, टस्कनी, पार्मा मोदेना ही प्रमुख राज्ये होती. पिडमाँट या राज्यात सार्डिनिया, सॅव्हाय, पिडमाँट व जिनोआ यांचा समावेश होता.

इ.स. 1815 ते 1848 या काळात इटलीच्या पुष्कळ राज्यांमध्ये बंडे झाली. या सर्व बंडांचा उद्देश म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि एकीकरण हेच होते. जोसेफ मॅझिनी, काऊंट काव्हूर आणि गॅरिबाल्डी हे इटलीच्या एकीकरणाचे शिल्पकार होते.


मॅझिनी

मॅझिनी हा थोर क्रांतीकारी विचारवंत व लेखक होता. त्याने आपल्या ग्रंथ लेखनाने इटली, ऑस्ट्रिया, पेपसी व इटलीतील तरुणांवर प्रभाव टाकला. त्याने राष्ट्राचे एकीकरण, स्वातंत्र्य वगैरे क्रांतीकारक कल्पनांमुळे त्यांना प्रेरणा दिली, आणि तत्कालिन राजकीय व्यवस्थेविरुध्द बंड करण्यास उद्युक्त केले. त्याने इ. स. 1830 च्या क्रांतीमध्ये पुढाकार घेऊन तरुण 'इटली' (Young Italy) हा पक्ष स्थापन केला. याचा प्रमुख उद्देश म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य व इटलीचे एकीकरण हा होय.


गॅरिबाल्डी

गॅरिबाल्डी हा एक सैनिक असून तो एक चांगला लढवय्या होता. तो 'यंग इटली' पक्षात सामील झाला आणि अनेकवेळा त्याने क्रांतीचे नेतृत्व केले. त्यानंतर त्याने सशस्त्र स्वयंसेवकांची संघटना स्थापन केली. ती ''रेड शर्टस'' म्हणून ओळखली जाते. तो ऑस्ट्रिया विरुध्दच्या युध्दात सार्डिनियाच्या बाजूने या संघटनेसह सामील झाला. इ.स. 1860 मध्ये सिसिली व नेपल्स राज्यावर त्याने रेड शर्टच्या सहाय्याने जिंकून इटली देशाचे त्वरित एकीकरण केले, आणि तेथील राजाकडे लोकशाही सुधारणांसाठी आग्रह धरला.

इटली देशाच्या एकिकरणात सार्डिनियाचा मुख्यमंत्री काउंट काव्हूर हा प्रमुख होता. तो एक पत्रकार होता. त्याने इटलीतील वाङ्‌मयाच्या पुनरुज्जीवनासाठीच वाहिलेले ''रिसार्जिमेंटो'' हे नियतकालिक सुरु केले. त्याच्या प्रभावशाली लेखनाने त्याने लोकांच्या मनावर आणि राज्यकर्त्यांच्या मनावर चांगलाच प्रभाव टाकला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

इटलीमधून ऑस्ट्रियाला हुसकावून लावण्याचा निर्धार करुन सार्डिनियाला इटलीतील अत्यंत मोठे आणि अत्यंत बलशाली राज्य बनविण्याचे त्याने ठरविले. सार्डिनियाचे मुख्यमंत्रीपद (प्रधानपद) स्वीकारल्यावर लगेच उद्दिष्ट गाठण्यासाठी त्याने कार्य सुरु केले. त्याने राज्यात अनेक सुधारणा अंमलात आणून इटलीला अत्यंत प्रगतीशील राज्य बनविले.

काऊंट काव्हूरने फ्रान्सबरोबर एक गुप्त करार केला. ऑस्ट्रियाला युध्दासाठी प्रवृत्त करुन फ्रान्सच्या सहाय्याने त्याला पराभूत केले आणि लोम्बार्डी सार्डिनियास जोडले. टस्कनी, पार्मा, मोदेना आणि पोपच्या राज्यात क्रांती झाली आणि ते सार्डिनियात विलीन झाले.


**काऊंट काव्हूर**

काऊंट काव्हूरने गुप्तपणे सिसिलीवर आक्रमण करण्यासाठी गॅरिबाल्डीला प्रोत्साहन दिले. इ.स. 1861 मध्ये व्हिक्टर इमॅन्युअल याला इटलीचा राजा म्हणून घोषित केले. इटलीला ऑस्ट्रियाकडून व्हेनेशिया मिळाले. आता रोम मात्र इटलीच्या राज्यापासून बाहेर होते. इ.स. 1870 मध्ये जेव्हा फ्रान्स व प्रशिया यांच्यात युध्द सुरु झाले. तेव्हा फ्रान्सला रोममधून आपले सैन्य माघारी बोलवावे लागले. या संधीचा फायदा घेऊन व्हिक्टर इमॅन्युअलने रोम काबीज केले. रोम ही इटलीची राजधानी झाली आणि इटलीचे एकीकरण पूर्ण झाले.

## जर्मनीचे एकीकरण

19 व्या शतकाच्या प्रारंभी जर्मनी हे अनेक छोट्या छोट्या स्वतंत्र राज्यामध्ये विभागले गेले होते. त्यामध्ये प्रशिया हे सर्वात मोठे व बलशाली राज्य होते. बोर्स्टेंबर्ग, बव्हेरिया, बदेन, सॅक्सनी ही इतर मुख्य राज्ये व बाकी छोटी राज्ये होती. ही छोटी राज्ये बऱ्याचवेळा आपापसात भांडत होती. ती राजकीय दृष्ट्या कमकुवत होती. आर्थिक दृष्ट्या मागासलेली होती. या परिस्थितीमुळे जनतेत असंतोष पसरला होता आणि ते सुधारणेची आशा बाळगून होते.

फ्रेंच राज्यक्रांतीने जर्मनांची राष्ट्र भावना जागृत केली. यामुळे राज्यातील लोकांनी राष्ट्रीय एकीकरण आणि सामाजिक व आर्थिक सुधारणांची मागणी सुरु केली. ऑस्ट्रियाच्या नेतृत्वाखाली जर्मन संघराज्याची निर्मिती झाली होती. परंतु

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पूर्वीचे राजे त्यांचे स्वातंत्र्य आणि अस्तित्वात असलेली राजकीय व सामाजिक व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करीत होते.

जर्मन देशभक्त व राष्ट्रवादी लोकांनी सर्व राज्यात लोकसत्ताक संस्थेसाठी आणि जर्मनीच्या एकीकरणासाठी चळवळ सुरु केली. परंतु ही चळवळ दडपली गेली आणि क्रांतिकारी देशाबाहेर पळून गेले. प्रशियाने या उपक्रमात भाग घेऊन महत्वाची भूमिका बजावली. कारण ते औद्योगिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या संपन्न राज्य होते.



बिस्मार्क

**बिस्मार्क :** ॲटोव्हन बिस्मार्क हा जर्मनीच्या एकीकरणाचा शिल्पकार होता. प्रशियाचा राजा पहिला विल्यम याचा मुख्यमंत्री म्हणजे ॲटोव्हन बिस्मार्क. बिस्मार्क एक सरकारी नोकर असून, जर्मनीचे विधिमंडळ 'डायेट' चा सदस्य होता. तो विदेशात राजनीती तज्ञ म्हणून काम करुन प्रसिध्दीस आला होता. त्यामुळे त्याला ऑस्ट्रियाच्या नेतृत्वाखाली असलेल्या जर्मन संघराज्याच्या कार्यांबद्दल सूक्ष्म माहिती होती. त्याला ऑस्ट्रियाची कमजोरी व बलस्थाने माहित होती. ऑस्ट्रिया, फ्रान्स आणि रशिया या देशात राजदूत म्हणून त्याने काम केले होते. त्यामुळे त्यांचे बलाबल त्याला चांगले माहित होते. जर्मनीच्या एकीकरणासाठी प्रशिया हे एकमेव समर्थराज्य आहे. याची त्याला जाणीव होती आणि प्रशियाच्या राजाच्या नेतृत्वाखाली हे एकीकरण करण्याची त्याची आकांक्षा होती. हा उद्देश त्याला दोन पध्दतीने साध्य करायचा होता. एक म्हणजे ऑस्ट्रियाची जर्मन संघराज्यातून हाकालपट्टी करणे आणि दुसरी म्हणजे जर्मनीमध्ये प्रशियाने आपली ओळख गमावण्यापूर्वी जर्मनीला प्रशियामय करणे, कारण प्रशियाची संस्कृती, परंपरा, शासनयंत्रणा आणि लष्करीबल यांचा पूर्ण जर्मनीमध्ये विस्तार करण्याची त्याची इच्छा होती.

बिस्मार्क हे जाणून होता की जर्मनीच्या समस्या सोडविण्यासाठी ''रक्त आणि लोह'' हे धोरण अवलंबिले पाहिजे. रक्त आणि लोह धोरण म्हणजे युध्दनीती. त्यासाठी त्याने बलाढ्य लष्कर बनविले. त्याचे पुढील ध्येय ऑस्ट्रियाला जर्मन संघराज्यातून बाहेर काढणे हे होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

डेन्मार्कच्या अधिपत्याखाली असलेली दोन छोटी राज्ये स्लेशविग आणि होलस्टन ही मिळविण्याची बिस्मार्कची आकांक्षा होती. कारण तेथे जर्मन लोकांची संख्या अधिक होती. आस्ट्रियाच्या सहाय्याने त्याने डेन्मार्कशी युध्द करुन ती जिंकून घेतली.

त्यानंतर बिस्मार्कने इटलीबरोबर करार करुन ऑस्ट्रिया बरोबरच्या युध्दात त्याचा पाठिंबा मिळविण्याची व्यवस्था केली. सुसज्ज जर्मन फौजांनी ऑस्ट्रियाला पराभूत करुन इ.स. 1866 मध्ये उत्तर जर्मन संघराज्याची' रचना केली. प्रशियाच्या राजाला वंश परंपरेनुसार या संघराज्याचा प्रमुख बनविले गेले.

ऑस्ट्रियाला जर्मन संघराज्यातून हद्दपार केल्यानंतरसुध्दा जर्मनीचे एकीकरण अपूर्णच होते. कारण फ्रान्सच्या ताब्यात असलेली दक्षिणेकडील सोळा जर्मन राज्ये या संघराज्याच्या बाहेर होती. फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन याची जर्मनीला कमकुवत करण्याची योजना होती. जर्मनीचे एकीकरण पूर्ण व्हायचे असेल तर फ्रान्सबरोबरचे युध्द अटळ आहे. याची बिस्मार्कला जाणीव होती. त्याने उत्तम प्रकारे आपले लष्कर सज्ज केले. नेपोलियनने प्रशियावर चढाई करताच दक्षिण जर्मन राज्यांच्या मदतीने बिस्मार्कने त्याचा पराभव केला. त्यामुळे बिस्मार्कला उरलेली राज्ये जर्मन संघराज्यात सामील करणे सोपे झाले. अशा प्रकारे जर्मनीचे एकीकरण पूर्ण झाले. प्रशियाचा पहिला विल्यम याने जर्मन सम्राट हे बिरुद धारण केले. अल्सेस आणि लॉरेन हे प्रांत फ्रान्सकडून प्रशियाला मिळाले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**1. खाली दिलेल्या रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. इंग्लंडने अटलांटिक किनारपट्टीवर स्थापन केलेल्या तेरा वसाहतींना ____________ म्हणत होते.
2. इ.स. 1774 मध्ये तेरा वसाहतींच्या प्रतिनिधींची सभा _______ येथे भरली.
3. अमेरिकेच्या स्वातंत्र्याची घोषणा इ.स. ____________ मध्ये करण्यात आली.
4. स्पिरीट ऑफ लॉज' या ग्रंथाचा कर्ता ____________ .
5. तरुण इटली' हा पक्ष इटलीमध्ये स्थापन करणारा ____________ .
6. रक्त आणि लोह' धोरण अवलंबणारा ____________ .

**2. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

7. अमेरिकेच्या स्वातंत्र्य युध्दाची कारणे सांगा.

8. अमेरिकेच्या स्वातंत्र्य संग्रामाचे महत्व सांगा.

9. फ्रेंच राज्यक्रांतीस आर्थिक घटक कसे कारणीभूत ठरले?

10. इटलीच्या एकीकरणात गॅरिबाल्डीची भूमिका कोणती?

11. जर्मनीच्या एकीकरणाचा शिल्पकार कोण? त्याच्याबद्दल टीप लिहा.

**3. उपक्रम :**

1. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या काळातील विचारवंत लेखकांबद्दल तुमच्या शिक्षकाबरोबर विस्ताराने चर्चा करा.

2. इटलीच्या एकीकरणास कारणीभूत ठरलेल्या घटकांबद्दल तुमच्या शिक्षकांच्या देखरेखीखाली गटचर्चा आयोजित करा.

**4. प्रकल्प :**

1. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या संदर्भात त्यामधील तत्वचिंतकांविषयी त्यांच्या छायाचित्रांचा संग्रह बनवा.

2. इटलीच्या एकीकरणातील सहभागी क्रांतीकारकांच्या विषयी एक प्रकल्प तयार करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-21 वे

# निवडणूक प्रक्रिया

P7J9G6

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *भारतातील निवडणूक आयोग.*
- *निवडणूक प्रक्रिया.*
- *राजकीय पक्ष.*
- *संमिश्र सरकार.*
- *माध्यमे आणि लोकशाही.*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

भारत हे जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारे राष्ट्र आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी मुक्त निःपक्षपाती व निर्दोष निवडणूकांची आवश्यकता असते. मुक्त व स्वतंत्रपणे निवडणूका राबविण्यासाठी भारतीय संविधानाच्या XV व्या भागात 324 ते 329 कलमांमध्ये स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे. या आयोगामध्ये निवडणूक प्रक्रियेबद्दलची संपूर्ण माहिती सविस्तरपणे नमूद केलेली आहे. निवडणूक आयोग ही एक अखिल भारतीय संस्था आहे. केंद्र व राज्य निवडणूका घेण्याची संपूर्ण जबाबदारी या आयोगाची असते. राज्य निवडणूक आयोगाद्वारे स्थानिक संस्थाच्या निवडणूका कलम 243 K व 243ZA अंतर्गत घेतल्या जातात.

**निवडणूक आयोगाची रचना (Structure of Election Commission):**

कलम 324 मध्ये निवडणूक आयोगाच्या रचनेबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. 25 जानेवारी 1950 ला भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना झाली. प्रारंभी फक्त एकच मुख्य निवडणूक आयुक्त होते. 1989 मध्ये घटनेच्या 61 व्या दुरुस्तीनुसार मतदानाचे वय 21 वरून 18 वर आणण्यात आले. यामुळे या आयोगाच्या कामाचा ताण वाढला. यासाठी

मुख्य आयुक्ताव्यतिरिक्त आणखी दोन निवडणूक आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. 1990 मध्ये आयुक्तांची ही दोन्ही पदे रद्द करण्यात आली. परंतु 1993 मध्ये ही दोन्ही पदे पुन्हा निर्माण करण्यात आली. तिन्ही आयुक्तांना समान हक्क प्रदान करण्यात आले आहेत. त्यांच्यामध्ये कांही मतभेद उद्भवले तर बहुमताच्या आधारावर निर्णय घेतले जातात.

राष्ट्रपती निवडणूक आयुक्तांची नेमणूक करतात. त्यांचा कार्यकाल 6 वर्षे अथवा वयाची 65 वर्षे पूर्ण होईपर्यंत म्हणजे दोन्हींपैकी प्रथम संपणारा काल निवृत्तीसाठी ग्राह्य धरला जातो. ते आपल्या इच्छेनुसार केव्हाही आपला राजीनामा राष्ट्रपतीकडे सादर करू शकतात तर असमर्थतता अथवा अप्रामाणिक वर्तनाच्या आधारे त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार संसदेला आहे.

निवडणूक आयोगाद्वारे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, राज्यसभा, लोकसभा, विधान परिषद आणि विधानसभेच्या निवडणूका आयोजित केल्या जातात. या आयोगाला निवडणूकांच्या तारखा जाहीर करणे, निवडणूकांचे निकाल लावणे, तसेच निवडणूक कालामध्ये नियंत्रण ठेवण्याचे संपूर्ण अधिकार असतात. या कालावधीला 'आचारसंहितेचा काळ' (Period of Model Code of Conduct) असे म्हणतात. निवडणूका घेण्यासाठी निवडणूक आयोगाचे स्वतःचे कर्मचारी नसतात यासाठी राष्ट्रपतींच्या अनुमतीने ते सरकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतात.

राज्य निवडणूक आयोगाद्वारे पंचायत स्तरीय तसेच शहरी स्थानिक संस्थांच्या निवडणूका घेतल्या जातात. 243 K आणि ZA या कलमांतर्गत राज्यपाल राज्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक करतात. कर्नाटक राज्यामध्ये कर्नाटक ग्राम स्वराज्य आणि पंचायत कायदा 1993 मधील 308 कलमान्वये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. याद्वारे स्थानिक संस्थांच्या निवडणूका यशस्वीपणे पार पाडल्या जातात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**निवडणूकीची प्रक्रिया:**

**मतदार संघ (Electoral Constituency) :**

निवडणूकीच्या उद्देशासाठी देश आणि राज्याचे लहान-लहान विभाग केलेले असतात. या विभागांना 'मतदार संघ' म्हणतात. लोकसंख्येच्या प्रमाणावरून मतदार संघ ठरवले जातात. मतदार संघ मुख्यता दोन प्रकारचे असतात. एक लोकसभा मतदार संघ आणि दुसरा

विधानसभा मतदार संघ. लोकसभा मतदार संघातून निवडलेले सदस्य हे लोकसभेचे सदस्य असतात. त्यांना संसद सदस्य किंवा खासदार (Members of Parliament or MPs) म्हणतात. त्याप्रमाणे विधानसभा मतदार संघातून निवडलेले सदस्य हे विधानसभेचे सदस्य असतात. त्यांना विधानसभा सदस्य किंवा आमदार (Members of Legislative Assembly or MLAs) म्हणतात. विधान सभेत 106 वी घटना दूरुस्ती विधेयक (नारीशक्ती वदंना) लागु झाल्यानंतर लोकसभा आणि विधान सभेतीलमहिलाना 33% राखीवता ठेवण्यात आली आहे. दोन्ही मतदारसंघात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राखीव जागा असतात. त्यांना 'राखीव मतदारसंघ' म्हणतात.

**मतदार याद्या (Voters List) :**

मतदारांची नावे आणि काही तपशील असलेल्या यादीला 'मतदार यादी' म्हणतात, निवडणूकीपूर्वी निवडणूक आयोग मतदार याद्या तयार करतो. पाच वर्षातून एकदा त्याचे नूतनीकरण होते. या नूतनीकरणावेळी ज्यांची 18 वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांची नांवे मतदार यादीत समाविष्ट केली जातात व मृत्यू झालेल्यांची नांवे मतदार यादीतून काढून टाकली जातात. ही मतदार यादी निवडणूक अधिकाऱ्यांना मतदान करताना मतदार ओळखण्यास मदत करते. 1 जानेवारी, 1 एप्रिल, 1 जुलै व 1 ऑक्टोबर या तारखाना नांवे समाविष्ठ करण्यासाठी निश्चत केल्या आहेत.




**मतदार ओळख फोटो पत्र**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मतदार ओळख पत्र निवडणूक आयोगाकडून खोटी बतावणी करणाऱ्या तोतयापासून संरक्षण मिळावे म्हणून पुरवले जाते. सर्वसाधारण ओळख पटवण्याचा पुरावा म्हणून मतदार ओळख पत्र (The Electoral Photo Identity Card (EPIC)) पुरवले जाते. मतदाराने हे ओळखपत्र निवडणूकीवेळी मतदान केंद्रावर दाखविले पाहिजे. या व्यतिरिक्त पुरावा म्हणून

पॅन कार्ड म्हणजे कायमस्वरूपी खाते क्रमांक (Permanent Acount Number - PAN) जो प्राप्तिकर खात्याकडून मिळालेला आहे, चालक परवाना, पासपोर्ट किंवा सरकारने दिलेला निश्चित ओळख परवाना पुरावा म्हणून दाखवावा लागतो.

**मतदान प्रक्रिया (Election Process):**

**निवडणूक अधिसूचना (Election Notification):** निवडणूक प्रक्रियेची सुरुवात निवडणूक अधिसूचनेपासून सुरू होते. निवडणूकीचे तपशीलवार वेळापत्रक जाहीर केले जाते किंवा सरकारी राज्यपत्राद्वारे जाहीर केले जाते. तसेच रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे यासारख्या इतर माध्यमांमध्ये प्रकाशित किंवा अधिसूचित केले जाते.

**उमेदवारांचे नामांकन (Nomination of the Candidates):** आपली प्रातिनिधिक लोकशाही असल्याने लोकांना आपला प्रतिनिधी निवडण्याचा आणि निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे. निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी काही अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी त्यांच्या नामनिर्देशन पत्रासोबत काही रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा करणे आवश्यक आहे.

राजकीय पक्ष त्यांच्या पक्षाचा प्रतिनिधी म्हणून निवडणूक लढविण्यासाठी उमेदवार निवडतात. त्याला पक्षाचा अधिकृत परवाना देतात. त्याला पक्षाची चिठ्ठी किंवा पार्टी तिकीट म्हणतात. पक्षाचे अधिकृत पत्र मिळालेल्या उमेदवाराला प्रचारात पक्षांचे चिन्ह व पाठिंबा घेऊन प्रचार करण्याचा पर्याय आहे. काहीवेळा उमेदवाराचा पक्ष आणि पक्षाचे अधिकृत पत्र उमेदवाराला मत मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावतात. ज्या उमेदवारांना कोणत्याही पक्षाने मान्यता दिली नाही अशा उमेदवारांना 'अपक्ष उमेदवार' म्हणतात. अशा उमेदवारांना निवडणूक आयोग विविध चिन्हे देतो.

**नामांकनाची छाननी (Scrutiny of Nominations):** अर्ज करण्याची अंतिम मुदत पूर्ण झाल्यावर नियुक्त निवडणूक अधिकारी प्रत्येक उमेदवाराच्या उमेदवारीचे आणि आवश्यक कागदपत्रांचे काटेकोरपणे छाननी करतात. छाननीनंतर पात्र आणि अपात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**नामांकन अर्ज मागे घेणे (Withdrawal of Nomination):** पात्र उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी मागे घेण्याची तारीख निश्चित करून ज्यांची इच्छा असेल ते आपली उमेदवारी मागे घेऊ शकतात हे सूचित केले जाते.

**निवडणूक प्रचार (Election Campaign):** उमेदवारांची अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर निवडणूक प्रचार किंवा मतांसाठी प्रचार सुरू होतो. मतदान दिवसाच्या 48 तास आधी बाहेरील प्रचार थांबला पाहिजेत. या प्रचारादरम्यान राजकीय पक्ष कित्येक धोरणे आणि कार्यक्रम आणि वचने जर आम्हाला सत्ता मिळाली तर पूर्ण करू असे ठासून सांगतात. या आश्वासनांना 'निवडणूकीचा जाहीरनामा' असे म्हणतात. लोकांची सभा घेणे, घरोघरी जाऊन प्रचार करणे, पत्रके, भित्तीपत्रके, चित्रफलक, छोटी पुस्तके, जाहिराती, झेंडे यांचा वापर तसेच लक्षवेधी घोषणा केल्या जातात. प्रत्येक उमेदवाराने 'निवडणूक आचारसंहिता' याचे पालन केलेच पाहिजे.

**मतदान दिवस (Poll Day):** मतदानाचा दिवस म्हणजे ज्या दिवशी मतदार मतदान करणार आहे तो दिवस. या दिवशी मतदारांना मतदानासाठी ठरलेल्या मतदान केंद्रावर जावे लागते. मतदान केंद्रे ही मते टाकण्याची जागा असते. मतदान केंद्रावर प्रशिक्षित निवडणूक अधिकारी नियुक्त केलेले असतात. मतदान केंद्रावर 'मतपत्रिका' (Ballot Papers) पुरवलेल्या असतात. त्या मतपत्रिकांवर सर्व उमेदवारांची नांवे आणि त्यांच्या नावासमोर निवडणूक आयोगाने त्यांना दिलेली निवडणूक चिन्हे छापलेली असतात. ही चिन्हे निरक्षरांना त्यांचा उमेदवार ओळखण्यास व मतदान करण्यास सहाय्य करतात.




**बॅलेट युनिट (BU)** **व्हीव्ही प्याट (VVPAT)** **कंट्रोल युनिट (CU)**

**इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिन (EVM)**

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

अलिकडे मतपत्रिकांच्या ऐवजी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM) उपयोगात आणली जात आहेत. या मशीनवर उमेदवाराच्या नावापुढील पॉवर बटन दाबून मतदार आपले मत नोंदवतो. मतदानाची वेळ संपल्यानंतर मतपेट्या किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे सीलबंद करून मतमोजणी केंद्रावर पाठवल्या जातात. अपंगांसाठी मतदान केंद्रावर मतदानासाठी आवश्यक सूविधा उपलब्धकरून देण्यात आल्या आहेत. दृष्टिहीनंना मतदान करणे सोपे व्हावे या साठी इलेट्रॉनिक मतदार यंत्रावर चिन्हे ब्रेल लिपीमध्ये छापण्यात आली आहेत.

**हे तुम्हाला माहित आहे का?**

**निवडणूक अधीकारी *(RO-Returning Officer)***

- *प्रत्येक मतदार संघात निवडणूक प्रक्रिया व्यवस्थापित करण्यासाठी निवडणूक आयोग एका अधिकाऱ्याची नियुक्ती करतो. त्याला 'निवडणूक निकाल अधिकारी'* (Returning Officer) *म्हणतात. या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली प्रत्येक मतदान केंद्रावर एक मुख्य अधिकारी* (Presiding Officer) *व इतर निवडणूक अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली असते.*

- ***VVPAT - Voter Verifiable Paper Audit Trail:** यंत्र EVM - Electronic Voting Machine या मतयंत्राला जोडलेले असते. मतदाराला आपले मतदान आपण मतदान केलेल्या उमेदवारसच गेले आहे हे दिसते.*

- ***नोटा (NOTA-None of the Above):** निवडणूक प्रक्रियेतील एक प्रमुख अस्त्र म्हणून NOTA ओळखले जाते. या मतांमध्ये मतदानाद्वारे देशाची शासन व्यवस्था बदलण्याची क्षमता आहे. मतदान करणे प्रत्येकाचा हक्क आणि कर्तव्य. नोटाची निवड ही उमेदवाराला मतदान न करता स्वतःचे मतदान कर्तव्य पार पाडण्यासाठी असते. नोटा बटन दाबून मतपत्रिका यादीतील कोणताच उमेदवार पसंत नाही असे मत देता येते.*

- ***सराव मतदान (Mock Poll):** मॉकपोलिंग ही मतदानाच्या दिवसी अधिकृतपणे मतदान सुरू होण्यापूर्वी इलेक्ट्रानिक मतदानयंत्रामध्ये कोणतत्याही मताची नोंदझालेली नाही आणि मतदान यंत्रणा कामकरत असल्याची खात्री करण्याची प्रक्रिया आहे.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**मतमोजणी (Counting):** निवडणूकीनंतर निश्चित केलेल्या तारखेला उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधीसमोर मतमोजणी अधिकारी मतदान केंद्रावर मतांची मोजणी करतात. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामुळे मतमोजणी करणे सध्या फारच सुलभ झाले आहे. काही विशेष परिस्थितीत फेरमतमोजणीस परवानगी दिली जाते. वादाच्या मुद्यावर किंवा काही अनियमितता आढळल्यास उमेदवार न्यायालयात जाऊ शकतो. निवडणूक अधिकारी (Returning Officer) मतमोजणीचा निकाल जाहीर करतो.

**राजकीय पक्ष (Political Parties):** लोकशाहीच्या स्थापनेसाठी राजकीय पक्षांची नितांत आवश्यकता असते. प्रतिनिधी, सरकार आणि जनता यांच्यातील दुव्याचे काम हे राजकीय पक्ष करतात. सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी ध्येयधोरणे ठरवितांना ते महत्त्वाची भूमिका बजावतात. राजकारणात प्रवेश करणा-यांना व नेतृत्व गुणाच्या विकासासाठी हे राजकीय पक्ष म्हणजे शिकवणुकीचे वर्गच आहेत. केंद्रातील कनिष्ठ गृह म्हणजे लोकसभा आणि राज्यातील विधानसभेवर बहुमत मिळवलेला पक्षच अधिकारावर असतो. तो पक्ष सरकार स्थापन करतो त्या पक्षास 'सत्ताधारी पक्ष' Ruling Party म्हणतात. जो पक्ष दुय्यम स्थानी असतो त्यास 'विरोधी पक्ष' Opposition Party म्हणतात. गौणपक्ष किंवा अपक्ष हे स्वेच्छेने सत्ताधारी पक्षास अथवा विरोधी पक्षास पाढींबा देतात.

**राष्ट्रीय राजकीय पक्ष (National Parties):** भारतात पुष्कळ राजकीय पक्ष आहेत. या राजकीय पक्षांचे 'राष्ट्रीय पक्ष' व 'प्रादेशिक पक्ष' असे दोन प्रकार पाडतात. आपल्या देशातील अनेक राज्यात अशा राष्ट्रीय पक्षांच्या शाखा असतात. लोकसभा व विधानसभा त्यांचे प्रतिनिधी असतात. निवडणूक आयोग राजकीय पक्षांना अधिमान्यता देते. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (INC), भारतीय जनता पक्ष (BJP), कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (CPI-M) बहुजन समाज पार्टी (BSP), नॅशनल पिपल्स पार्टी (NPP) आम आदमी पार्टी (AAP) हे काही भारतातील राष्ट्रीय पक्ष आहेत. पक्षचिन्हांद्वारे त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्रादेशिक राजकीय पक्ष:** प्रादेशिक राजकीय पक्षांना राज्य राजकीय पक्ष असेही म्हणतात. विधानसभेच्या निवडणूकीत जे पक्ष आपले प्रतिनिधी बहुसंख्येने पाठवतात अशा पक्षांना राज्य पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष म्हणतात. पुष्कळ राज्यात तेथील प्रादेशिक पक्ष निवडणूकीत बहुमत मिळवून सरकार स्थापन करतात. काही मुख्य प्रादेशिक पक्ष ज्यांनी बहुमत मिळवून सरकार स्थापन केले ते म्हणजे द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक), ऑल इंडिया अण्णा द्रमुख मुन्नेत्र कळघम (AIADMK), आसाम गण परिषद, तेलगू देशम, शिवसेना, जनता दल (सेक्युलर) आणि समाजवादी पक्ष. प्रादेशिक पक्षांना त्यांचे निवडणूक चिन्ह असते.

प्रादेशिक पक्ष संसदेत सुध्दा प्रतिनिधित्व करू शकतात. केंद्रात अथवा राज्यात जर एखादा पक्ष स्पष्ट बहुमत मिळवू शकला नाही तर अशा वेळेस हे प्रादेशिक पक्ष महत्त्वाची भूमिका पार पाडतात. हे आपणास केंद्र व राज्य सरकारांमध्ये दिसून येते.

**संमिश्र सरकार:** निरनिराळ्या पक्षांचे मिळून बनलेले सरकार. सत्ता मिळविण्यासाठी अनेक राजकीय पक्ष निवडणूकीत सहभागी होतात. जर त्यांना बहुमत मिळाले तर ते सरकार स्थापन करतात. बऱ्याच वेळेस कोणताही एक पक्ष आवश्यक बहुमत मिळवू न शकल्यामुळे सरकार स्थापन करू शकत नाही. त्याला 'त्रिशंकू संसद', 'त्रिशंकू विधानसभा' (Hung - Parliament or Hung Assembly) म्हणतात. अशा परिस्थितीत काही राजकीय पक्ष एकत्र येतात, मैत्री करतात आणि आवश्यक बहुमत निर्माण करून सरकार स्थापन करतात. अशा मैत्रीला 'निवडणूकीनंतरची मैत्री' म्हणतात. कांही वेळा एक किंवा दोन पक्ष निवडणूकीपूर्वी एकत्र येऊन मैत्री करतात. या प्रकाराला 'निवडणूक पूर्व युती' म्हणतात. जेव्हा निरनिराळे पक्ष एकत्र येऊन अशा प्रकारचे सरकार स्थापन करतात. तेव्हा त्या सरकारला 'युती सरकार' 'निरनिराळ्या पक्षांनी मिळून बनविलेले सरकार' असे म्हणतात. अशा युती सरकारमधील राजकीय पक्ष सत्ता मिळविण्यासाठी मंत्रीमंडळ स्थापन करतात. काही वेळेस हे पक्ष सत्तेत प्रत्यक्ष सहभागी न होता, बाहेरून पाठिंबा देतात अशा पाठिंब्याला बाह्य समर्थन म्हणतात. 1989 पासून लोकसभा व काही राज्यांच्या विधानसभेत अशी सरकारे असणे सामान्य झाले आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**लोकमत:** सामान्य माणसाशी संबंधित असणाऱ्या एखाद्या विशेष गोष्टीविषयी दृष्टिकोन व्यक्त करणे म्हणजे लोकमत होय. बहुसंख्य किंवा राजकारण्यांचे ते मत असत नाही. लोकमताचा आदर करून सरकार धोरण आखते, कायदे बनवते. वेळोवेळी वादाचे मुद्दे बदलले की लोकमत ही बदलते. सर्व घटनाविषयी लोक जागरूक असले पाहिजेत आणि त्यांनी आपली मते कोणतीही भीड न ठेवता आणि पूर्वग्रहदूषित न होता मांडली पाहिजेत. लोकमताचा प्रभाव सरकार, राजकीय पक्षावर पडतो. लोकमत प्रसारित करण्यासाठी रेडिओ, टेलिव्हिजन, वर्तमानपत्रे, नियतकालिके, वेबसाईट आणि इतर माध्यमांचा उपयोग होतो.

**प्रसार माध्यमे आणि लोकशाही :**

प्रसार माध्यमे दैनंदिन घडामोडींची माहिती देतात. सरकारच्या योजना आणि धोरणे लोकांना समजण्यासाठी याचा उपयोग होतो. सरकारच्या कार्याची माहितीसुद्धा जनतेला पुरविली जाते. महत्त्वाच्या बाबींविषयी लोकांचा दृष्टिकोन काय आहे हे सरकारला समजते. लोक आपल्याला भेडसावणाऱ्या प्रश्नांचा जाब लोकप्रतिनिधींना प्रसार माध्यमांद्वारे विचारू शकतात. प्रसारमाध्यमांनी विश्वासूपणे सत्याची बाजू घेऊन पूर्वग्रहदूषित वृत्ती सोडून माहिती पुरवली पाहिजे. दुसरीकडे, प्रसारमाध्यमांनी विशिष्ट गोष्टीवर संयमाने माहिती पुरवली पाहिजे. त्यात क्षोभकारक वृत्ती आणता कामा नये. एकता, निधर्मीवाद, लोकशाही या तत्त्वांच्या विरोधात किंवा हानिकारक मत प्रसारमाध्यमांनी प्रदर्शित करू नये.

छपाई माध्यमात वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांचा समावेश होतो. वर्तमान पत्रांचा नोंदीने अधिकारी कचेरी (Registrar of News Papers) वर्तमानपत्रे आणि नियतकालिके यांची नोंद असलीच पाहिजे. वर्तमानपत्रांची गुणवत्ता आणि माध्यम स्वातंत्र्याचे संरक्षण जपले जावे यासाठी भारतील प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली आहे.

प्रसारमध्यामांच्या क्षेत्रात, टेलिव्हिजन, रेडिओ, इंटरनेट इत्यादी सारखी ईलेक्ट्रॉनिक माध्यमेसुद्धा आज सक्रिय आहेत. 1962 च्या प्रसारण संकेत क्रमांक (ब्रॉडकास्टिंग कोड) नुसार याचे कार्य चालते. कित्येक बाबीवर अनेक प्रसंगी एकमेकांशी संबंध ठेवून चर्चा

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

करता यावी यासाठी लोकांना, अधिकाऱ्यांना आणि नेत्यांना मदत होते. त्यांच्यासाठी हे अर्थपूर्ण व्यासपीठ आहे.

**हे तुम्हाला माहित आहे का ?**

1. **कर्नाटकराज्य मतदान आयोग:** 73 आणि 74 व्या घटना दुरुस्तीनुसार 1992 च्या अनुबंधानुसार 243 K व 243 ZA अनुबंध पंचायत राज्य संस्था आणि शहरी स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणूका घेण्यासाठी कर्नाटक राज्य आयोगाची स्थापना दिनांक 26.05.1993 रोजी करण्यात आली ही एक घटनात्मक संस्था आहे ज्याचे मुख्यालय बेंगळूर येथे आहे.

2. **राष्ट्रीय मतदार दिन (NVD - National Voters day):** भारतीय राष्ट्रीय मतदान दिवस 25 जानेवारी 2011 पासून साजरा करण्यात आला आहे.

3. **स्वीप (SVEEP - Systematic Voters education and electoral participation):** हा भारतीय निवडणूक आयोगाने 2009 मध्ये पद्धतशीर मतदान शिक्षण आणि निवडणूक सहभागासाठी राबविलेला एक कार्यक्रम आहे.

4. **राजकिय पक्षांच्या नावांचे संक्षिप्तरूप (Abbrevations):**

   *INC - Indian National Congress*

   *BJP - Bhartiya Janata Party*

   *CPIM - Communist Party of India (Marxist)*

   *BSP - Bahujan Samaj Party*

   *AAP - Aam Aadmi Party*

   *AIADMK- All India Anna Dravida Munnetra Kazhagam*

   *DMK - Dravida Munnetra Kazhagam.*

   *BRS - Bharat Rashtra Samithi.*

   *YSRCP - Yuvajana Sramika Rythu Congress Party.*

**विषेश सुचना:** 25 जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिना निमत्य माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धामध्ये सहभाग घेण्यास उद्युक्त करणे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**1. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. मतदानाचा प्रचार मतदान दिवसाच्या ____________ तास आधी थांबवला पाहिजे.
2. राजकीय पक्षांना ____________ ची मान्यता असावी लागते.
3. वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्य संरक्षणासाठी ____________ ही संस्था कार्यरत आहे.

**2. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :**

4. मतदार यादी बद्दल थोडक्यात स्पष्टीकरण द्या.
5. निवडणूक प्रक्रियेत कोणकोणते टप्पे आहेत ?
6. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी हे सरकार व जनता याच्यांतील दुवा असतात-कसे ते स्पष्ट करा.
7. संमिश्र सरकार यावर थोडक्यात टिपा लिहा.
8. सध्या भारतात कोणते राष्ट्रीय राजकिय पक्ष अस्तीत्वात आहेत ?

**3. उपक्रम :**

1. निवडणूक प्रक्रियेत कोणकोणते टप्पे आहेत ?
2. निवडणूक आयोगाच्या कार्याची यादी तयार करा.
3. 'नोटा' ची सुविधा लोकशाहीला पुरक कि मारक चर्चा करा.

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्रकरण-22 वे

# देशाची संरक्षण व्यवस्था

W5V6T2

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *संरक्षण व्यवस्थेचे विविध विभाग आणि त्यांच्या जबाबदाऱ्या.*
- *संरक्षण दलातील हुद्दे आणि संरक्षण दलातील विविध विभागांचे प्रमुख*
- *राष्ट्र संरक्षणासाठी संरक्षण विभागाचे योगदान.*
- *सेनादला व्यतिरिक्त दुय्यम दर्जाची संरक्षण व्यवस्था.*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

तुम्हाला माहितच आहे की, आपल्या देशावर परकियांचे राज्य होते. संघर्ष, विरोध, त्याग आणि बलिदानानंतर 15 ऑगस्ट 1947 ला आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त झाले. म्हणूनच आपले सर्वांचे प्राथमिक कर्तव्य आहे की, पुन्हा आपला देश कोणत्याही परकीय अंमलाखाली येवू नये. यासाठीच आपली सेनादले इतकी सक्षम बनविली पाहिजे की, इतराच्या आक्रमणापासून आपले संरक्षण होऊन आपले सार्वभौमत्व कायम अबाधित राखले जाईल.

भारताला 15,200 कि. मी. भूसीमा व 7,516.5 कि. मी. जलसीमा लाभलेली आहे. 6100 कि.मी. फक्त भारताची जल सीम आहे. पाकिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, बांगला देश, म्यानमार आणि श्रीलंका हे आपले सीमावर्ती देश आहेत. इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडिया, थायलंड, व्हिएतनाम आणि मालदीव हे सागरी संपर्क असलेले शेजारी देश आहेत. जरी आपण शांततापूर्ण सहजीवनाचे तत्व अवलंबले तरी शेजारील राष्ट्रे मात्र गप्प नाहीत. भारताने सामोपचाराने, चर्चा वाटाघाटी आणि करारांच्या माध्यमातून सर्व समस्या शांततापूर्वक सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असला तरी, त्यात आपल्याला फारसे यश आलेले नाही. त्यामुळे आपण आपल्या राष्ट्राचे रक्षण केले पाहिजे. यासाठी आपल्या संरक्षण व्यवस्थेला अनन्य साधारण महत्व आहे.

**संरक्षणदलांचे संघटनः** भारतीय संरक्षण व्यवस्थेचे तीन विभाग आहेत. भूदल (Army), नौदल (Navy) आणि वायूदल (Air Force). राष्ट्रपती हे तिन्ही दलांचे सर्वोच्च प्रमुख (सरसेनापती) असतात. भूदलाच्या प्रमुखाला जनरल, नौदलाच्या प्रमुखाला ॲडमिरल आणि वायूदलाच्या प्रमुखाला एअर चीफ मार्शल असे म्हणतात. संरक्षण विभागाच्या समन्वयासाठी 2001 मध्ये तिन्हीं दलांसाठी एकत्रित एकच अधिकाऱ्याची म्हणजेच.

**चिफ ऑफ डिफेन्स स्टाफ (CDS):** भारताच्या लष्कराशी संबंधीत बाबीवर देशांच्या राजकिय नेतृत्वाला उच्च दर्जाचा सल्ला देण्यासाठी चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ या पदाची निर्मीती 2019 मध्ये करण्यात आली यापदावर नियुक्त केलेली व्यक्ती ही संरक्षण मंत्र्याची प्रमुख लष्करी सल्लागार असतो जनरल बिपिन रावत यांची भारताचे पहिले चिफ ऑफ डिफेन्स स्टाफ म्हणून नियुक्ती करण्यात आली.

**संरक्षण खाते (Ministery of Defence):** संरक्षन मंत्रालय हे भारताच्या संपूर्ण संरक्षण व्यवस्थेसाठी जबाबदार आहे त्यांचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. त्यांचे नेतृत्व संरक्षण मंत्री करतात. सरदार बलदेव सिंग हे भारतांचे पहिले सरंक्षन मंत्री होते.

संरक्षण खात्याचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. यांचे चार विभाग आहेत.

1) संरक्षण विभाग, 2) संरक्षण उत्पादन विभाग, 3) संरक्षण संशोधन आणि अभिवृध्दी विभाग, 4) निवृत्त सेना कल्याण विभाग, 5) लष्करी व्यवस्थापक विभाग.

## भारतीय भूसेना (Indian Army):

भारतीय भूदलाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. सर्वोच्च प्रमुखाला जनरल कमांडर इन् चीफ म्हणतात. लेफ्टनंट जनरल, कमांडर, मेजर जनरल, ब्रिगेडिअर, लष्करी सचीव, लष्करी अभियंते इ. अधिकारी लष्कर प्रमुखांच्या अखत्यारित काम करतात. भूदलाचे तीन विभाग आहेत- पायदळ, घोडदळ, तोफखाना, रणगाडे व तोफांचा समावेश आहे. सुलभ प्रशासन व्यवस्थेसाठी भूदलाचे 7 विभाग करण्यात आले आहेत. ते विभाग आणि त्यांची कमांडस क्षेत्र (झोन) आणि सबयेरिया (उप क्षेत्रा) मध्ये विभागले आहे, एक लेफ्टंनन जनरल एका कमांडचे नेतृत्व करतो, एक मेजर जनरल एका क्षेत्राचे नेतृत्व करतो आणि ब्रिगेडियर सब येरीयांचे नेतृत्व करतो.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

### भारतीय सैन्याचे 7 कमांड

| क्र.नं. | विभागचे नांव | ठिकांण व राज्य |
|---|---|---|
| 1. | पश्चिम कमांड | चांदी मंदीर, (हरियाणा) |
| 2. | पूर्व कमांड | कोलकत्ता (प. बंगाल) |
| 3. | उत्तर कमांड | उधमपूर (काश्मीर) |
| 4. | दक्षिण कमांड | पुणे (महाराष्ट्र) |
| 5. | केंद्र कमांड | लखनौ (उत्तरप्रदेश) |
| 6. | प्रशिक्षण कमांड | महू (मध्यप्रदेश) |
| 7. | वायव्य कमांड | जयपूर (राजस्थान) |



भूसेना

या विभागांचे आणखीन प्रादेशिक विभाग आणि प्रादेशिक उपविभाग असे् विभाजन केले आहे. लेफ्टनंट जनरल हा प्रादेशिक विभागाचा प्रमुख असतो तर ब्रिगेडियर हा प्रादेशिक उपविभागाचा प्रमुख असतो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**भुदलाची प्रशिक्षण केंद्रे**

| क्र.सं. | प्रशिक्षण केंद्र | ठिकाण आणि राज्य |
|---|---|---|
| 1. | राष्ट्रीय संरक्षण अकादमी | खडकवास (पुणे) - महाराष्ट्र |
| 2. | संरक्षण सेवा कर्मचारी महाविद्यालय | वेलिंग्टन - तामिळनाडू |
| 3. | इंडियन मिलीटरी अकादमी | डेहराडून - उत्तराखंड |
| 4. | संरक्षण व्यवस्थापन महाविद्यालय | सिकंदराबाद - तेलंगना |
| 5. | राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालय | नवी - दिल्ली |
| 6. | अधिकारी प्रशिक्षण अकादमी | चेन्नई - तामिळनाडू |

भूदलामध्ये एकूण 12,37,117 सैनिक आणि 9,60,000 राखीव सैनिक आहेत.
15 जानेवारी - भारतीय सेना दिवस

भूदलाचे मुख्य कार्य म्हणजे देशाच्या भूप्रदेशाचे संरक्षण आणि परकीय आक्रमणापासून देशाचे रक्षण करणे. आपल्या देशाच्या संरक्षण खात्यावर देशाच्या भौगोलिक, राजकीय, सामाजिक आणि तांत्रिकदृष्ट्या देशाचे संरक्षण करणे ही महत्वाची

जबाबदारी आहे. याव्यतिरिक्त भारताच्या विस्तृत सीमाप्रदेशाचे रक्षण आणि नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाणे इ. कामे देखील भूदलाला करावी लागतात. देशाच्या सीमांचे रक्षण करण्याबरोबरच भूसेना आपतकालिन कार्यात मदत करते.

**भूसेनेचे मानवतावादी उपक्रम:** भूकंप, पुर, दुष्काळ, भूस्खलन, वादळ, ढगफुटी इत्यादी नैसर्गिक आपत्तींच्या परिस्थितीत मानवतावादी कर्तव्ये पार पाडतात. लष्कर केवळ तांत्रिकदृष्टया प्रगत नाही तर त्यांचाकडे हेरगिरी यंत्रणाही आहे.

## भारतीय नाविक दल (Indian Navy):

जगातील सर्वात मोठी किनारपट्टी लाभलेल्या कांही देशापैकी भारत हा एक देश आहे. म्हणूनच अंदमान-निकोबार आणि लक्षद्वीप या बेटासहीत विस्तीर्ण किनारपट्टीचे 7516.60 कि.मी. आहे व बेटे वगळता 6100 कि.मी. लांबीची किणारपट्टी लाभलेली आहे. याचे रक्षण करण्यासाठी भारताला सक्षम आणि सुसज्ज नौदलाची गरज आहे. नौदलाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. राष्ट्रपती हे या दलाचे सर्वोच्च प्रमुख असून ॲडमिरल हा नौदलाचा प्रमुख असतो. त्याच्या सोबत व्हाईस ॲडमिरल, रिअर ॲडमिरल, कमांडर कॅप्टन, लेप्टनंट कमांडर, लेप्टनंट आणि सब-लेप्टनंट कार्यरत असतात.

या व्यतिरिक्त नौदलाचे दोन संघटित दले (Fleet) फ्लीट आहेत.

1. पश्चिम फ्लीट 2. पूर्व फ्लीट

**उपक्रम**

*माजी सैनिका कडून संरक्षण दलाविषयी अधिक माहिती मिळवा.*

भारताचे नाविक दल मोठे असून त्याचा विस्तार करण्याच्या हेतूने विशाखापट्टणम् येथे हिंदुस्तान जहाज बांधणी कारखाना स्थापन केला आहे. या व्यतिरिक्त गोवा व कोलकत्ता येथे जहाज बांधणीचे कार्य चालते. याच ठिकाणी जहाज, पाणबुडी, छोट्या नौकांची निर्मिती केली जाते.



**आय. एन्. एस्. विराट**

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

### भारतातील जहाजबांधनी केंद्रे

| क्र.सं. | जहाज बांधनी केंद्राचे नांव | ठिकाण आणि राज्य |
|---|---|---|
| 1. | हिंदूस्थान शिपयार्ड लिमिटेड | विशाखापट्टनम् - आंध्रप्रदेश |
| 2. | मजगांव डॉकयार्ड लिमिटेड | मुंबई - महाराष्ट्र |
| 3. | गार्डन रिच शिप बिल्डर्स आणि इंजिनियर लिमिटेड | कोलकत्ता - पश्चिम बंगाल |
| 4. | कोचिन शिपयार्ड | कोची - केरला |
| 5. | गोवा शिपयार्ड | वास्को-द-गामा - गोवा |

**भारतीय नौदलाच्या युद्ध नौका:**

भारतीय नौदलाकडे फ्रीगेट्स म्हणजेच युध्दनौका - आय. एन. एस निलगिरी, हिमगिरी, देवगिरी, तारागिरी, विंधगिरी, चक्रधारी (मार्च 2012 मध्ये समाविष्ट करण्यात आलेली नौका) तसेच भारतीय बनावटीच्या INS गोदावरी, निरिक्षण करणाऱ्या नौका, तटरक्षक दल (कोस्टलगार्ड) इत्यादी नौकादलामध्ये समाविष्ठ केलेले आहेत. अलिकडेच रॅकेटने (क्षेपणास्त्र) सुसज्ज असलेले INS विभूती या जहाजाची बांधणी करण्यात आली. या सगळ्यामुळे भारत जगातील अत्याधुनिक युद्धनौकाने सुसज्ज 7 व्या क्रमांकाचा देश ठरतो.

### भारतीय नौदलाची प्रशिक्षण केंद्रे

| क्र.सं. | प्रशिक्षण केंद्राचे नांव | ठिकाण आणि राज्य |
|---|---|---|
| 1. | भारतीय नौदल आकादमी | विजमल - केरल |
| 2. | आय. एन. एस्. शातवाहन | विशाखापट्टणम् - आंध्रप्रदेश |
| 3. | आय. एन. एस्. चिल्का | चिल्का - ओडिसा |
| 4. | आय. एन. एस्. शिवाजी | लोणावळा - महाराष्ट्र |
| **भारतीय नौदल दिन 4 डिसेंबर** | | |

## भारतीय वायुसेना :

भारतीय वायुसेना हे अत्याधुनीक, सुसज्ज, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि विमानवाहू जहाजांनी युक्त असे दल आहे. यामध्ये उत्तम संरक्षणाची साधने, दळणवळणाचे अत्याधुनीक

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

जाळे, अत्याधुनिक गुप्तहेर तंत्रज्ञान, शत्रूशी सामना करण्याची आणि देशाचे संरक्षण करण्याची क्षमता असणारी पुरेशी लढावू विमाने, हेलिकॉप्टर्स आणि शत्रूवर जोरदार मारा करणारी विमाने यांचा समावेश आहे.

भारतीय वायुसेना युध्दकाळात तसेच शांततेच्या काळात अत्यंत परिणामकारक आणि शौर्याने कार्य करते. देशातंगर्त सुरक्षितता, स्थैर्य, शातंता राखण्यात यशस्वी झाली आहे. वायुसेनेचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. वायुसेनेच्या प्रमुखाला एअर चीफ मार्शल असे म्हटले जाते. भारतीय वायू दलाचे कामकाज पाच ऑपरेशनल कमांड्स, दोन फंक्शनल कमांड मार्फत पाहिले जाते. ते पुढील प्रमाणे आहेत.



**वायुसेना**

**ऑपरेशनल कमांड (Operational Commands)**

| क्र.सं. | कमांडचे नांव | ठिकाण आणि राज्य |
|---|---|---|
| 1. | पश्चिम कमांड | नवी दिल्ली |
| 2. | पूर्व कमांड | शिलाँग (मेघालय) |
| 3. | केंद्र कमांड | प्रयागराज, (उत्तर प्रदेश) |
| 4. | उत्तर पश्चिम (वायव्य) कमांड | गांधीनगर, (गुजरात) |
| 5. | दक्षिण कमांड | तिरुअनंतपूरम (केरळ) |

**फंक्शनल कमांड (Functional commands):**

| क्र.सं. | कमांडचे नांव | ठिकाण आणि राज्य |
|---|---|---|
| 1. | ट्रेनिंग कमांड | बेंगळुरु (कर्नाटक) |
| 2. | मेंटेनन्स कमांड | नागपूर (महाराष्ट्र) |

## भारतीय वायुसेना प्रशिक्षण केंद्रे

| क्र.सं. | प्रशिक्षण केंद्राचे नांव | ठिकाण आणि राज्य |
|---|---|---|
| 1. | हवाई दल अकादमी | दुंडीघाट - हैद्राबाद |
| 2. | प्रथम लढावू प्रशिक्षण केंद्र | प्रयागराज - उत्तरप्रदेश |
| 3. | एअरमन ट्रैनिंगस्कूल | सांबरा बेळगांवी - कर्नाटक |
| 4. | एअर फोर्स टेक्निकल कॉलेज | जालहळ्ळि - कर्नाटक |
| 5. | कॉलेज ऑफ एअर वॉरफेअर | सिकंदराबाद - तेलंगाना |

*भारतीय वायू सेनेत जग्वार, राफेल यासारखी आधुनिक युद्ध विमाने आहेत. वायूसेनेत 1,00,000 सैनिक, आणि 1330 युद्ध विमाने आहेत. आपल्याला आपल्या बलाढय वायुसेनेविषयी अभिमान असावा.*

बेंगळूर आणि हैद्राबाद ही वायुसेनेला प्रशिक्षण देणारी दोन मुख्य केंद्रे आहेत. ज्यांची वायूदलामध्ये निवड झालेली असते, त्यांना उड्डाणाचे प्रशिक्षण दुंडीघाट येथील विशेष विमान उड्डान प्रशिक्षण केंद्रात दिले जाते. त्याचप्रमाणे प्रशासन आणि तंत्रज्ञानाची प्रशिक्षण केंद्रे बेंगळूर आणि कोईमतूर येथे आहेत. आज आपल्या वायूसेनेत 1000 पेक्षा जास्त विमाने आणि हेलिकॉप्टर्स आहेत. कॅनबेरा, हंटर, अजीत, किरण, मीग 21, मीग 23, मीग 25, मीग 29, मीग 27, मिराज - 2000, SU-30 MKI तेजस ही प्रमुख विमाने आहेत.

***8 अॅक्टोबर भारतीय वायू सेना दिन***

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## तिन्ही दलाचे विविध हुद्दे

| | | |
|---|---|---|
| 1. भूदल | 2. नौदल | 3. वायूदल |
| a) जनरल | a) अॅडमिरल | a) एअर चीफ मार्शल |
| b) लेफ्टनंट जनरल | b) व्हाईस अॅडमिरल | b) एअर मार्शल |
| c) मेजर जनरल | c) रिअर अॅडमिरल | c) एअर व्हाईस मार्शल |
| d) ब्रिगेडियर | d) कमाडोर | d) एअर कमांडर |
| e) कर्नल | e) कॅप्टन | e) ग्रुप कमांडर |
| f) लेफ्टनंट कर्नल | f) कमांडर | f) विंग कमांडर |
| g) मेजर | g) लेफ्टनंट कमांडर | g) स्कॉड्रन लीडर |
| h) कॅप्टन | h) लेफ्टनंट | h) फ्लाईट लेफ्टनंट |
| i) लेफ्टनंट | i) सब लेफ्टनंट | i) फ्लाईंग ऑफिसर |

**सेनादलातील भरती:** ज्यांना संरक्षण दलामध्ये काम करण्याची इच्छा असते, त्यांच्यामध्ये सेवाभाव, देशप्रेम, आत्मबलिदानाची तयारी, तसेच देशातील विविध संस्कृतीची जाण मिळवून घेण्याची वृत्ती इत्यादी गुण असावे लागतात. देशाचा कोणताही नागरिक त्यांचा धर्म, जात, वर्ग, जमात इत्यादी बाबी विचारात न घेता सेनादलात भरती होऊ शकतो. परंतु शारीरिक क्षमता, मानसिक आरोग्य, शिक्षण आणि तंत्रज्ञान इत्यादी बाबतीत कांही अटींची पूर्तता करावी लागते. जेव्हा सेनादलातील कनिष्ठ पदांची भरती येते, तेंव्हा राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशातील पुरुषांची गुणवत्तेनुसार निवड केली जाते The Recraitable Male Population (RMP). वायूदलामध्ये पात्र उमेदवारांची संपूर्ण देशभरातून नोंदणी आणि निवड प्रक्रियेतून करण्यात येते. ही भर्ती केंद्रीय वायू सैनिक मंडळाकडून (CASB-Central Airman Selection Board) कडून केली जाते. खलाशांची भर्ती नेव्हल रिक्रूटमेंट ऑर्गनाझेशन मार्फत (NRO) केली जाते. ही जबाबदारी नौदल मुख्यालयातील ह्यूमन रिसोर्स प्रोजेक्ट व डायरेक्टरची असते. तिन्ही दलातील स्त्री उमेदवारांची निवड महिला विशेष योजनेद्वारे (Women Special Entry Scheme- WSES) द्वारे केली जाते. सर्वोच्च न्यायालयच्या निर्देशानुसार महिलांना सशस्त्र दलाच्या सर्व शाखामध्ये आपतकालीन सेवेऐवजी (14 वर्षापर्यंत मर्यादीत) दिर्घ कालीन सेवेची परवानगी देण्यात आली आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**अग्निपथ योजना:** अग्निपथ योजना ही भारतातील तरुणांना सशस्त्र दलात सेवा करण्यास सक्षम बनवणारी योजना आहे. ही योजना 2022 मध्ये सुरू झाली 17 ½ ते 21 वर्षे वयोगटातील युवक अग्निपथ योजने अंतर्गत अर्ज करून व सर्व चाचण्या पूर्ण करून सशस्त्र दलात सामील होऊ शकतात. त्यांना अग्निपथ म्हणून ओळखले जाते ते 4 वर्षे सशस्त्र दलात सेवा देऊ शकतात.

**राष्ट्रीय संरक्षण अकादमी आणि नौदल अकादमी परिक्षा:** केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) ही परिक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते हि परिक्षा देण्यासाठी 12 वी किंवा तत्सम पात्रता असणे आवश्यक आहे. ही परिक्षा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आणि राष्ट्रीय नौदल अकादमीमध्ये प्रवेश देते. या परिक्षेत उत्तीर्ण होणारे उमेदवार अकादमीमध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेले असतात. लष्कर, हवाईदल, नौदलातील अधिकारी पदावर थेट नेमनुक होते.

**संरक्षण उत्पादने:** संरक्षण उत्पादनाचे दोन विभाग आहेत. 1. संरक्षण खात्यामार्फत चालविली जाणारी संस्था. 2. पब्लिक सेक्टरव्दारे चालविले जाणारे कारखाने त्यापैकी पहिल्या प्रकारच्या उत्पादनात - दारुगोळा, रणगाडे, शस्त्रे इत्यादि, तर दुसऱ्या प्रकारामध्ये जहाजे, विमाने, बुल्डोझर, रॉकेट्स (अग्नीबाण) पाणबुडी इ. उत्पादन केले जाते.

**आपले संरक्षण:**

**हे तुम्हाला माहित असू द्या:**
*सार्वजनिक क्षेत्रातील (Public sector) कारखाने*
*BEL- भारत इलेक्ट्रॉनीक्स लिमीटेड 1954.*
*HAL- हिंदुस्तान एरोनॉटीक्स लिमिटेड 1964.*
*BEML- भारत अर्थमुव्हर्स लिमिटेड 1964.*
*BDL- भारत डायनॅमिक्स लिमिटेड 1970.*

**पूर्वतयारी तसेच संशोधन आणि विकास:** आज आपल्या संरक्षण दलांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. उदाहणार्थ - दहशतवाद, नक्षलवादी हल्ले इत्यादि, त्यामुळेच आपल्या जवानांना डोळ्यात तेल घालून अहोरात्र आपल्या देशाच्या सीमेचे रक्षण करावे लागते. आपले भूदल हे जगातील चौथ्या क्रमांकाचे मोठे भूदल असून नौदल व वायुदलालांचा जगात पाचवा क्रमांक लागतो.

आपले नौदल सक्षम बनविण्यासाठी कर्नाटकातील कारवार येथे 'सीबर्ड नाविक तळ' (Seabird Naval base) सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर 1958 साली DRDO (Defence Research and Development Organization) ची स्थापना केली गेली. याद्वारे पृथ्वी, आकाश, त्रिशूल, नाग, अग्नी-1,2,3,4,5, (19 एप्रिल 2012 रोजी अग्नी 5 हे रॉकेट (अग्नीबाण) सोडण्यात आले. ज्याची क्षमता 5000 कि.मी. होती) या सारख्या विकसित व अत्याधुनिक रॉकेट्सची निर्मिती केली गेली. पाणबुडी (Sub marine), अँटिसबमरीन यांच्या सहाय्याने आज भारत अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि इतर खास देशांच्या रांगेत जावून बसला आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील कारगील युध्दात बोफोर्स तोफांचा वापर अत्यंत परिणामकारकरित्या करण्यात आला. पोखरण येथील अणुचाचणीनंतर भारत अणूहल्यांना (Nuclear attacks) तोंड देण्यासाठी सक्षम ठरला आहे. या बरोबर देशाच्या विविध भागात 55 संरक्षण प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आली. म्हणूनच आपण आपल्या सेनादलाप्रमाणेच आपणही आपल्या देशासाठी जीवन समर्पित करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**हे तुम्हाला माहित असू द्याः**

*कारगीलयुध्द 1999: मे, जून 1999 मध्ये हे युध्द कारगील येथे भारत व पाकिस्तान यांच्यात झाले. 16 मे 1999 रोजी पाक दहशतवाद्यानी काश्मीर येथील उंच डोगराळ पर्वतभागावर हवाई हल्ला केला. हे युध्द द्रास, कारगील व बटालीक येथे झाले. ते तीन आठवडे चालले. त्या तिन्ही ठिकाणांवर पाकीस्तानने ताबा मिळविला. यासाठी भारताने 'ऑपरेशन विजय' ही मोहिम सुरु केली आणि पाकिस्तानवर हल्ला केला. सुरुवातीला भारतीय सेनेला माघार घ्यावी लागली. परंतू नंतर बोफोर्स तोफांचा वापर करुन भारताने पुन्हा हल्ला चढविला आणि 14 जून रोजी पाकीस्तानने लाजीरवाणी माघार घेतली. जरी हे युध्द किरकोळ असले तरी त्यांने साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेतले. भारतासारख्या शांतताप्रिय राष्ट्रावर हल्ला केल्यामुळे सर्व देशांनी पाकिस्तानला अतिक्रमण करणारे असभ्य (असंस्कृत) राष्ट्र ठरविले. या युध्दामुळे भारतींयामध्ये राष्ट्रभक्तीची उत्कट भावना जागृत झाली.*

*या युध्दात सुमारे 30,000 भारतीय जवानांचा सहभाग होता. तसेच 5000 पाकिस्तानी जवानांचा सहभाग होता. भारतीय वायूदलाने ऑपरेशन सेफड (safed) सागर' या मोहिमेद्वारे भारतीय सैन्याला उत्तेजन दिले. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात भारतीय सेनेने अंतिम हल्यास प्रारंभ केला. पाकिस्तानी सैन्याने द्रास हा टापू सोडल्याबरोबर दिनांक 26 जूलै रोजी हे युध्द संपले. ज्यादिवशी भारताने पाकिस्तानला पराभूत केले तो दिवस 'कारगील विजय दिवस' म्हणून भारतात साजरा केला जातो. दरवर्षी 26 जुलै रोजी हा दिवस संपूर्ण भारतभर साजरा केला जातो.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**दुय्यम सुरक्षा व्यवस्था (Para military Forces) :**

सैन्य दलाव्यतिरिक्त कांही इतर संघटना आहेत. ज्यांना दुय्यम दर्जा दिला जातो. त्या खालील प्रमाणे

1. प्रादेशिक सेना (Territorial Army)
2. राष्ट्रीय छात्र सेना (N. C. C.)
3. किनारपट्टीवरील तटरक्षक दल (Coastal Guard)
4. सीमा सुरक्षा दल (Border Security Force)
5. नागरी संरक्षण (Civil Defence)
6. गृह रक्षक दल (Home Guards)
7. रेड क्रॉस सोसायटी (Red Cross)

**प्रादेशिक सेना (Territorial Army):** हे एक अंशकालीन स्वयंसेवादल आहे. ही सेवा नैसर्गिक आपत्ती यासारख्या अत्यंत निकडीच्या वेळीच वापरतात. संसदेच्या कायद्यानुसार 1949 मध्ये याची स्थापना झाली होती. यामधील जवान हे व्यावसायिक जवान नसून असे नागरिक असतात की, जे संरक्षक दलात काम करण्यास उत्सुक असतात.त्यांना त्यांच्या फावल्या वेळेत लष्करी प्रशिक्षण दिले जाते. 18 ते 42 वयोगटातील ज्या व्यक्ती आधीच नोकरीत असतात त्या व्यक्ती, यामध्ये दाखल होण्यास पात्र ठरतात. दरवर्षी नोव्हेंबर महिन्यातील तिसरा शनिवार हा दिवस 'प्रादेशिक सेना दिवस' (टेरिटोरियल आर्मी डे) म्हणून साजरा केला जातो.



**राष्ट्रीय छात्र सेना (N. C. C.):** ही मुख्यत: देशाची युवा संघटना आहे. 1948 मध्ये याची स्थापना झाली. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी या संघटनेत भाग घेऊ शकतात. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्व, मैत्री, सेवाभाव यासारखे गुण विकसित करणे हाच या संघटनेचा मुख्य उद्देश आहे. हे एक शिस्तबद्ध व प्रशिक्षित युवादल आहे. आणिबाणी प्रसंगी हे दल देशाच्या मदतीस धावून येते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**छात्रसेनेमध्ये दोन गट असतात :**

1. महाविद्यालयीन स्तरावर ज्येष्ठ गट (Senior Unit)
2. शालेय स्तरावर कनिष्ठ गट (Junior Unit) या छात्रांना अनेक सवलती दिल्या जातात.
    a) ज्यांनी N. C. C. प्रशिक्षण घेतलेले असेल त्याना सेनादलात सहजपणे प्रवेश मिळतो.
    b) ज्या छात्रांना प्रशिक्षणात उच्च श्रेणी प्राप्त होते. त्यांच्यासाठी व्यावसायीक महाविद्यालयात कांही जागा राखीव ठेवल्या जातात.

- या छात्रांना शस्त्रास्त्रे हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते.
- प्रशिक्षणादरम्यान छात्र दूरची रपेट (Hiking), दूरचा खडतर प्रवास (Trekking), विमानोड्डान (Gliding), गिर्यारोहण (Climbing), जलपर्यटन (Sailing) इत्यादी साहसी कृत्ये करतात.

- ज्या विद्यार्थ्यांनी N. C. C. चे प्रशिक्षण घेतले आहे, असे विद्यार्थी सैनिकी शाळेत प्रवेश घेऊ शकतात.

**भारतीय तटरक्षक दल** (Indian Coast Guard)**:** हे निमलष्करी दल असून दुय्यम संरक्षण दलातील अत्यंत महत्वाचे दल आहे. याची स्थापना 1978 मध्ये करण्यात आली. हे दल देशाच्या जल सीमेच्या हितसंबधाचे रक्षण करते. हे दल देशाच्या 7,516.5 कि. मी. किनारपट्टीचे रक्षण करते. तटरक्षक दलाच्या नौकांना 'पुठार', 'विक्रम', 'विजय', 'वीर' अशी नावे दिली आहेत. या नौका तस्करी, आणि बेकायदा समुद्री व्यापार रोखतात. नवी दिल्ली येथे मुख्यालय असून डायरेक्टर जनरल हे त्याचे प्रमुख असतात. मुंबई, चेन्नई, गांधीनगर आणि पोर्ट ब्लेअर (श्रीविजयपुरम्) (अंदमान आणि निकोबार) या चार ठिकाणी या चार दलाची प्रादेशीक मुख्यालये आहेत.

**उपक्रम:** *तुमच्या शाळेच्या छात्रसेना व स्काऊट मध्ये सहभागी होऊन त्याबद्दल अधिक माहिती मिळवा.*

*आपल्या तटरक्षक दलामध्ये 1402 अत्याधुनिक जहाजे आणि 381 विमाने व 60 हेलिकाप्टर्स आहेत. या दलात 12,585 सैनिक तैनात आहेत.*

**1 फेबुवारी-भारतीय तटरक्षक दिन.**

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**सीमा सुरक्षा दल (बॉर्डर सेक्युरिटी फोर्स):** या दलाची स्थापना 1965 मध्ये झाली. 15200 कि.मी. विस्तृत पसरलेल्या सीमारेषेवर या दलातील जवान डोळ्यात तेल घालून रक्षण करतात. याचे प्रशिक्षण केंद्र बेंगळूर येथील यलहंका येथे आहे. सीमा सुरक्षा दलाला सीमारेषेचे उल्लंघन, परकीयांचा बेकायदेशीर प्रवेश आणि तस्करी रोखण्यास उल्लेखनीय यश आले आहे. जेंव्हा देशाची अंतर्गत सुरक्षा धोक्यात असते. त्यावेळी आसाम रायफल्सचे जवान, इंडो तिबेटियन बॉर्डर पोलीस (ITBP), केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF), राष्ट्रीय सुरक्षा दल (NSG) दहशतवादाला आळा घालण्यासाठी तैनात केलेले दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF), रेल्वे संरक्षण दल (RPF) इत्यादी दले सीमा सुरक्षा दलाला मदत करतात.

**नागरी संरक्षण** (**Civil Defence**)**:** नागरिकांच्या जीवाचे रक्षण करणे हा या दलाचा मुख्य हेतू होय. मालमत्तेचे नुकसान कमी करणे आणि औद्योगिक उत्पादनांच्या बाबतीतील गैरव्यवहार रोखणे या करिता हे दल कार्यरत असते. ही एक स्वयंसेवी संघटना आहे. ही

संघटना 22 विभाग किंवा शहरांकरिता मर्यादीत आहे. सध्या 13 लाख 'ग्राहक रक्षण स्वयंसेवक' कार्यरत असून त्यापैकी 6.64 लाख प्रशिक्षित आहेत.

**गृहरक्षकदल (होमगार्ड्स):** हे एक स्वयंसेवी दल आहे. याची स्थापना 1946 मध्ये झाली. जातीय दंगलींवर अंकुश ठेवण्यासाठी, निवडणूकीच्या काळात समाजामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्थानीक पोलीसांना या दलाची अत्यंत महत्वाची मदत होते. हे दल कांही राज्ये व केंद्रशासीत प्रदेशामध्ये असते. 1962 च्या भारत-चीन युध्दात गृहरक्षक दलातील स्वयंसेवक गणवेश परिधान करुन भारतीय जवानांसोबत चीनविरुध्द आवेषाने लढले. सध्या भारतात सुमारे 5,73,793 गृहरक्षक दलाचे स्वयंसेवक कार्यरत आहेत.

**भारतीय रेडक्रॉस सोसायटी (Indian Red Cross Society):** ही एक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्था आहे. 1920 मध्ये भारतामध्ये संसदेच्या मसूद्याव्दारे 'इंडियन रेडक्रॉस' संघटनेची स्थापना झाली. हा मसूदा 1992 साली दुरुस्त करण्यात येवून 1994 मध्ये त्याचे कायद्यात रुपांतर झाले.

**8 मे जागतिक रेडक्रॉस दिवस**

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

भारतीय रेडक्रॉस ही संघटना ही एक मानवतावादी स्वयंसेवी संघटना असून. राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशात मिळून 700 शाखा आहेत. याचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. भारताचे राष्ट्रपती हे या संघटनेचे अध्यक्ष असतात. तर सेक्रेटरी जनरल हे प्रशासकीय अधिकारी असतात. राष्ट्रपती 6 सदस्यांची नियुक्ती करतात तर इतर 12 सदस्य हे राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशांकडून निवडले जातात. रेडक्रॉस संघटना नैसर्गिक आपत्ती, आणिबाणीच्या कालावधीत जनतेला आपली अमूल्य सेवा देतात. कोणताही भेदभाव न करता ही संस्था आजारी आणि युध्दातील जखमीना निस्वार्थ सेवा देते. ही संस्था 7 मूलभूत तत्वांना महत्व देते. 1. मानवता 2. निःपक्षपातीपणा 3. तटस्थता 4. स्वातंत्र्य 5. स्वयंसेवा 6. एकता 7. आंतरराष्ट्रीय हित.

भारतीय सशस्त्र दलातील सैनिकांनी दिले जाणारे शौर्य पुस्कार भारतीय नौदल आणि इतर दलातीलातील सदस्याना सन्मान आणि प्रोत्साहन देण्यासाठी शौर्य पुरस्कार दिले जातात.

**युद्धातील शौर्य पुरस्कार:**

(1) परमवीर चक्र (2) महावीर चक्र (3) वीर चक्र.

**शांती शौर्य पुरस्कार:**

(1) अशोक चक्र (2) कीर्ती चक्र (3) शौर्य चक्र.

**राष्ट्रीय सुरक्षा रक्षक (NSG - National Security Guard):** *दहशतवाद्यांच्या गंभीर कृत्यांना रोखण्यासाठी हे आपत्कालीन दल आहे. ही संघटना 22.09.1986 रोजी अस्तित्वात आली. 'सर्वत्र सर्वोत्तम सुरक्षा (सार्वत्रिक सुरक्षा) हे या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे.*

**विशेष सुरक्षा दल (SPG - Special Protection Group):** *भारताच्या वर्तमान आणि माजी पंतप्रधानांना आणि त्यांच्या जवळच्या कुटूंबातील सदस्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी 1985 मध्ये या दलाची स्थापना करण्यात आली होती. 'शौर्यम् समर्पणम् सुरक्षाम्' (शौर्य भक्ती आणि संरक्षण) हे या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे.*

**सेनादले आणि आंतरराष्ट्रीय शांतता:** आपली सेनादले ही केवळ आपल्या देशाचीच सेवा करतात असे नसून परदेशातही शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्वत:ला गुंतवून घेतात आणि म्हणूनच ती आदरास पात्र ठरलेली आहेत. आपल्या सैनिकांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या (UNO) देखरेखीखाली गाझा, कोरिया, कांगो, श्रीलंका आणि इतर देशात शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य केले आहे. आपल्या सैनिकांच्या मदतीमुळेच बांग्लादेश स्वतंत्र होवू शकला.

अशाप्रकारे आपली सेनादले युध्द आणि शांततेच्या काळात आपल्या देशासाठी कार्य करतात. नैसर्गिक आपत्ती उदा. महापूर, दुष्काळ, भूकंप, दरड कोसळणे, वादळ यासारख्या आपत्तीच्या काळात अमूल्य सेवा देतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**हे तुम्हाला माहित असू द्या:**

**केंद्रीय पोलीस दले:**

CAPF - Central Armed Police Forces

1) AR - Assam Rifles
2) BSF - Border Security Force)
3) CISF - Central Industrial Security Force)
4) CRPF - Central Reserve Police Force
5) ITBP - Indo Tibetan Border Police
6) NSG - National Security Guard
7) SSB - Sashastra Seema Bal

**29 में अंतर राष्ट्रीय शांती दिवस**

### हे तुम्हाला माहित असू द्याः

1) लष्कर, वायुदल, नौदल, आणि भारतीय तटरक्षक दल हे केंद्रीय संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीत येतात.

2) केंद्रीय सशस्त्र पोलीसदल हे प्रशासकिय दृष्या केंद्रीयगृह मंत्रालयाच्या अखत्यारित येतात.

3) A.R - भारत आणि म्यानमार यांच्या सिमेचे रक्षण करतात.

4) B.S.F - भारत आणि पाकिस्तान व भारत आणि बांगलादेश यांच्या सिमेचे रक्षण करतात.

5) ITBP - भारत आणि चीनमधील सिमेचे रक्षण करतात.

6) S.S.B - भारत आणि नेपाळ व भारत आणि भूतान यांच्या मधील सिमेचे रक्षण करनात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्दनी भरा.**

1. आपल्या तिन्ही सेनादलांचे प्रमुख ____________ हे असतात.
2. भूसेनेच्या प्रमुखाला ____________ म्हणतात.
3. संरक्षण मंत्रीमंडळाचे मुख्यालय ____________ येथे आहे.
4. हिंदुस्थान जहाज बांधणी कारखाना ____________ येथे आहे.
5. सीमासुरक्षा दलाचे प्रशिक्षण केंद्र ____________ येथे आहे.
6. भारतीय रेडक्रॉस संघटनेची स्थापना ____________ मध्ये झाली.

**II. समूहात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

7. संरक्षण मंत्रालयातील चार विभाग कोणते?
8. भारतीय वायुसेनेच्या रचनेचे वर्णन करा.
9. भूसेनेचे कमांडस् कोणकोणते आहेत?
10. भारतीय वायुदलाच्या कार्याचे वर्णन करा.

11. भूसेनेत भरती होण्यासाठी कोणत्या गुणवत्तेची आवश्यकता आहे?

12. NCC चे उद्देश कोणते? त्याचे फायदे कोणते ते लिहा.

13. संरक्षण दलातील डिफेन्स स्टाफची माहीती लिहा.

**III. उपक्रम**

1. संरक्षण दीलातील डिफेण्स स्टाफ माहीती लिहा.
2. तुमच्या शहरातील रेड क्राँस सोसायटीच्या शाखेला भेट देऊन त्याच्या कार्याविषयी माहिती घेऊन अहवाल तयार करा.
3. शाळेत माझी सैनिकाला आमंत्रित करून त्याचे अनुभव जाणून घ्या.

**IV. प्रकल्प**

1. सेना दलाची चित्रे गोळा करून त्यांचे शाळेत प्रदर्शन करा.
2. शाळेत रेड क्रॉस सोसायटीची शाखा सुरू करून त्याद्वारे गरजूंना मदत करा.
3. अग्निबाण (Rockets) आणि लढाऊ विमानांची चित्रे गोळा करा.

***

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-23 वे

# राष्ट्रीय एकात्मता

M6U8Z9

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *राष्ट्रीयत्वाचा अर्थ*
- *आपल्या देशात विविधतेत एकता निर्माण करणारे घटक*
- *राष्ट्रीय एकात्मतेला पोषक किंवा सक्षम करणारे घटक*

**राष्ट्रीयत्व :**

राष्ट्रीयत्व हा शब्द 'नेशन' या शब्दापासून बनला आहे. राष्ट्रीयत्वाचे निर्णायक घटक:

1. ज्या लोकांना त्यांची राहण्याची जमीन त्यांची मातृभूमी वाटते.
2. लोकांमध्ये बंधूत्वाची भावना आणि राष्ट्रांच्या सुख-दुःखात लोकांचा सहभाग अशा लोकांना राष्ट्रप्रेम म्हणतात आणि अशा भावनेला राष्ट्रीयत्व म्हणतात.

प्राचीन काळापासून भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना दिसून येते राष्ट्रीयत्वांच्या भावनेने लोकांना विशेषतः परकीय आक्रमणाविरुद्ध लढ्यास प्रेरित केले. जसे भारतीयांचा ब्रिटीशांविरुद्धचा लढा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



दर वर्षी 26 जानेवारी रोजी नवी दिल्लीच्या राजपथावर प्रजासताक दिनाची परेड हा आपल्या देशाची भावना व्यक्त करणारा एक भव्य दिव्य देखावा असतो.

**राष्ट्रीय एकात्मता :**

राष्ट्रीय एकात्मता अशा परिस्थितीला सूचित करते जिथे देशातील सर्व लोक, वंश, धर्म, संस्कृती आणि भाषा यांच्या संदर्भात भिन्नता असली तरी ते एक आहेत असे वाटते. सशक्त राष्ट्राच्या उभारणीसाठी लोकांमध्ये अशी एकतेची भावना असणे आवश्यक आहे.

भारत हा विशाल देश आहे. या देशात सुमारे अनेक भाषा आणि बोली भाषा बोलल्या जातात. यापैकी 22 भाषांना आपल्या संविधानाने 8 व्या अनुसूचीनुसार राष्ट्रीय भाषा म्हणून मान्यता दिली आहे. प्रत्येक नागरिकाला आपली मातृभाषा शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. त्यासाठी अनेक सोयीसुविधा ते जिथे राहतात तिथे उपलब्ध करून दिल्या जातात. प्रत्येक नागरिकाला व्यक्तीस्वातंत्र्य आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या इच्छेनुसार कोणताही धर्म व पंथ आचरण्याचे स्वातंत्र्य आहे. (उदा. हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, शीख आणि पारशी) हे आपल्या देशाचे अद्वितीय वैशिष्ट्य आहे. त्याच प्रमाणे वेष, आहार, सामाजिक पद्धती, संभाषणाच्या पद्धती यामध्ये विविधता असुनही आम्ही एक आहोत ही भावना आहे. प्रत्येक नागरिकाला वेष, भाषण व आहार पसंतीचे स्वातंत्र्य आहे. भौगोलिकदृष्ट्या विविधता, नैसर्गिक भिन्नता असूनही राजकीय दृष्टीने आपण एक आहोत. तसेच आपण एकाच राज्यघटनेचे पालन करतो.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

**विविधतेतून एकता:** विविध पैलूमध्ये सर्व भिन्नता असूनही भारत एकतेच्या पायावर उभा आहे. भौगोलिक, सामाजिक, भाषा, परंपरा, राजकीय, धार्मिक, वांशिक आणि सांस्कृतिक भिन्नता असली तरी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारतीयांच्या जीवन पद्धतीत एकात्मतेचे घटक आहेत. एकसमान प्रशासकीय व्यवस्था, दळणवळणाची प्रभावी साधने, आधुनिक शिक्षण पद्धती, आरोग्य, कायदेपद्धत यामुळे एकतेची भावना वृद्धिंगत होण्यास मदत झाली.

**विविधतेमध्ये एकतेला पोषक असे घटक:**

**भौगोलिक एकता:** उत्तरेला हिमालय, पूर्वेकडे बंगालचा उपसागर, दक्षिणेकडे हिंदू महासागर, पश्चिमेकडे अरबी समुद्र. यामुळे भारत इतर जगापासून निसर्गतःच अलग आहे. म्हणूनच तो एकसंघ आहे. वंदे मातरम् व राष्ट्रगीतामुळे ही एकतेची भावना आणखीनच वाढते.

**राजकीय एकता:** प्राचीन कालापासून भारत एकसंघ आहे. आपल्या राज्यघटनेनुसार सर्व राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना समान कायदा आहे. संघीय न्यायव्यवस्था, एकच शिक्षण पद्धती, मजबूत केंद्र सरकारचे शासन यामुळे राजकीय एकता साधली गेली आहे.

भारतीय म्हणून राजकीय ओळख तसेच शिक्षण, आरोग्य, कायदे, संपर्क माध्यमे यासारखी क्षेत्रे ही सामान्य मानके आहेत. यामुळे आपण सारे एक आहोत ही भावना वाढीस लागते.

**धार्मिक एकता:** भारतात हिंदू, बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन, इस्लाम, पारशी असे अनेक धर्माचे लोक आहेत. सर्व धर्माचे लोक आपापल्या धर्माचे आचरण निर्भयपणे करू शकतात. आपापल्या धर्माचे सण, समारंभ साजरे करतात. इतर धर्माचे लोक सहभागी झाल्यामुळे एकता वाढीस लागते. भारतात परधर्मसहिष्णुता आहे. दुसऱ्या धर्माचा आदर करतात.

**भाषिक एकता:** भारत विविध भाषांची भूमी आहे. अनेक भाषांची उत्पत्ती संस्कृत भाषेतून झाली आहे. प्रत्येक राज्याची स्वतःची भाषा आणि साहित्य आहे. एका भाषेचे लोक दुसरी भाषा बोलणाऱ्या लोकांचा आदर करतात.

यामुळे भाषा बांधव्य वाढीस लागते. त्याबरोबरच एकतेची भावनाही आपोआपच वाढते.

**सांस्कृतिक एकता:** विविध वंश आणि धर्म असूनही सांस्कृतिक एकता भारतात सर्वत्र आढळून येते. प्रत्येक राज्य व प्रदेशाची स्वतःची अशी एक संस्कृती असते. त्यामुळे त्यांचे राहणीमान, आचार-विचार, आहार-विहार, वेशभूषा यामध्ये भिन्नता असते. असे असूनही लोकांमध्ये शांतता व एकता नांदते.

**राष्ट्रीय एकात्मतेला सहाय्यक घटक:**

**धर्मनिरपेक्षता (Secularism):** भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. धर्मविरोधी नाही. याचा अर्थ प्रत्येक नागरिकाला त्याच्या इच्छेनुसार कोणताही धर्म आचरण्याचे स्वातंत्र्य आहे. आपल्या राज्यघटनेनुसार सर्व धर्म समान आहेत. भारताने कोणत्याही एका विशिष्ट धर्माला राष्ट्रीय धर्माचा दर्जा दिलेला नाही. सर्वधर्म समभावामुळे आणि परधर्म सहिष्णुतेमुळेच एकतेला पुष्टी मिळते.

**लोकशाही:** भारत एक लोकशाही राष्ट्र आहे आणि सर्व नागरिक कायद्यासमोर समान आहेत. मूलभूत हक्क आणि राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे सर्व नागरिक समान आहेत यावर भर देतात. धर्म, जात, भाषा, संस्कृती या आधारावर लोकांमध्ये भेदभाव करता येत नाही, हा नियम राज्यघटनेत अंतर्भूत करण्यात आला आहे. ही वस्तुस्थिती आपल्या देशाला एकात्मक बनवते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**राष्ट्रीय सण:** स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, गांधी जयंती हे राष्ट्रीय सण सर्व लोक एकत्र येऊन साजरे करतात. धर्म, जात, वंश, भाषा व भेद विसरून उत्साहाने हे सण केले जातात. हे सण राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लावण्याकरिता अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

**आमची राष्ट्रीय चिन्हे:** राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, राजमुद्रा ही भारताची प्रमुख बोधचिन्हे असून राष्ट्रीय प्राणी, राष्ट्रीय फूल व राष्ट्रीय पक्षी ही भारताची इतर मानचिन्हे आहेत व ती एकतेची प्रतीके आहेत. ही चिन्हे आम्ही सर्व एकाच राष्ट्रांचे असल्याचे ओळखण्यास सहाय्य करतात. आणीबाणीच्या काळात किंवा देशाला धोका असताना, देशाच्या बिकट परिस्थितीत लोकांमध्ये ऐक्य निर्माण करण्यास ही चिन्हे पूरक ठरतात.



राजमुद्रा


राष्ट्रीय पक्षी - मोर


राष्ट्रीय फूल - कमळ


राष्ट्रीय प्राणी - वाघ

KTBS NOT TO BE REPUBLISHED

**परस्परावलंबन (परस्परसहकार्य):** केंद्र आणि राज्य सरकारे राष्ट्राची समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकत्र काम करतात. केंद्र व राज्य सरकारांच्या नियोजनामुळे देशाचा आर्थिक विकास होतो. केंद्र व राज्य सरकारचा मुख्य उद्देश 'देशाचा विकास' हाच असतो. उदाहरणार्थ पंजाबमध्ये पिकवलेला गहू तामिळनाडूमध्ये विकला जातो. गुजरातमध्ये पिकवलेला कापूस बिहारमध्ये विकला जातो. त्यामुळे कोणताही प्रदेश दुसऱ्या प्रदेशावर अवलंबून असतो. कोणीही पूर्णपणे स्वयंपूर्ण नाही, हा पैलू देखील आपण सर्व एकाच राष्ट्राचे आहोत हे सुचित करतो.

> **उपक्रम:** तुमच्या शाळेतील राष्ट्रीय भावना वाढवू शकतील अशा पारीस्थितीवर एकटिप लिहा.

वर उल्लेख केलेल्या घटकांबरोबरच दळणवळण व प्रसार माध्यमे, नैसर्गिक वैशिष्ट्ये, विविध संस्कृती, प्रादेशिकता, पंथ आणि भाषा यामुळेही संपूर्ण राष्ट्रातील लोकांमध्ये एकतेची भावना वाढते.

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा.**

1. 'प्रजासत्ताक दिन' हा ___________ सण आहे.
2. भारताने अनुसूचीनुसार भाषा म्हणून मान्यता दिलेल्या भाषांची संख्या ___________ आहे.
3. आपला राष्ट्रीय प्राणी ___________ आहे.
4. आपला राष्ट्रीय पक्षी ___________ आहे.

**II. वर्ग मित्रांशी चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

5. राष्ट्रीयत्व म्हणजे काय?
6. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे काय?
7. विविधतेत एकता निर्माण करणारे घटक कोणते?
8. राष्ट्रीय एकात्मतेला सहाय्य करणारे घटक कोणते?

**III. उपक्रम**

1. 'विविधतेत एकता' ही भावना दर्शविणारी चित्रे काढा आणि तुमच्या शाळेत लावा.
2. तुमच्या भागामध्ये विविध धर्मांमध्ये कोणकोणते सण साजरे केले जातात याबद्दलची माहिती गोळा करून लिहा.

**IV. प्रकल्प**

1. राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असे फोटो संग्रहित करा.
2. राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहित करणारी पुस्तके गोळा करा.
3. तुमच्या शाळेतील प्रजासत्ताक दिनाबंदल माहीती लिहा.

***

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-24 वे

# आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचा परिचय

Z3G3P5

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल.**

- *आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास*
- *अंतरराष्ट्रीय संबंधाची व्याख्या*
- *आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप आणि व्याप्ती*
- *आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासाचे महत्व*

**परिचय:** समकालीन जगात 195 सार्वभौम राष्ट्रे आहेत ही राष्ट्रे पूर्णपणे स्वतंत्र असली तरी ती स्वयंपूर्ण राष्ट्रे नाहीत, त्यांचे प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती किंवा राष्ट्र असो तेथील लोंकाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी दुसऱ्या राष्ट्रांशी संपर्क साधणे. अत्यावश्यक आहे. या सारख्या अत्यावश्य गोष्टीशी आंतरराष्ट्रीय संबधाचा अभ्यास केला आहे.

**अर्थ आणि व्याख्या:** राष्ट्र आणि राज्यांमधील आंतरराष्ट्रीय संबंधाचा शाब्दिक अर्थ- आंतरराष्ट्रीय हा शब्द प्रथम जेरामी बेथम यानी 1789 मध्ये प्रकाशीत केलेल्या 'नैतिक आणि कायदाचा सिध्दांत' या पुस्तकात वापरला होता. (Principles of Morals and Legislation) कांही विद्वानानी आंतरराष्ट्रीय संबंधांचा अर्थ समजुन घेण्यास खालील व्याख्या केल्या आहेत.

**क्वीन्सी राईट:** आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे विविध गट, राजे, राष्ट्रे, सरकार, लोक, प्रदेश, संघ आणि संबंध, धर्म, संस्कृतीक आणि औद्योगीक संघटना यांच्यातील संघटनाचा अभ्यास.

**ह्यांस जे मार्गोंथो:** यांनी आंतरराष्ट्रीय संबंधाना आंतरराष्ट्रीय राजकारण म्हटले अंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्रे आणि त्याचा वापर यांच्यातील सत्ता संघर्ष होय.

**स्वरूप:** आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे स्वताःचे स्वरूप आहे ते खालील प्रमाणे.

**1. बदलते स्वरूप:** आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप राजकारणात जागतिक जे घडले आहे ते गतीमान आहे आणि पुढे काय घडले यांचे अचुक विश्लेषण आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**2. अंतर विषय सामुग्री:** आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यास इतर सामाजीक विज्ञाना प्रमाणे अंतर विद्याशाखीय आहे. त्याचा प्रभाव आणि इतर सामाजीक विज्ञानाचा प्रभाव आहे.

**3. राष्ट्र-राज्य हे प्राथमिक घटक आहेत:** आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासामध्ये राष्ट्रामधील संबंधाच्या रक्षणासाठी राज्याचे वर्तन हे प्रेरक शक्ती असते त्या मुळे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात राष्ट्र राज्य हे प्राथमिक घटक आणले जातात.

**4. राष्ट्रीय हित आणि राष्ट्रीय शक्ती हे मुलभूत घटक आहे:** राष्ट्रीय हिताचे रक्षण हे राज्याचे मुख्य उद्दीष्ट आहे. हे ध्येय लक्षात घेऊन राष्ट्रे इतर राष्ट्राशी संबंध विकसीत करतात तसेच एखाद्या राष्ट्राचे स्थान आणि त्या राष्ट्राचे हित साधण्यात महत्वाची भूमीका असते.

**5. सत्तेसाठी संघर्ष:** हंस जे. मार्गाथो यांच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे सत्ता किंवा सत्तेसाठी संघर्ष ज्या देशाकडे अधिक शक्ती आहे. ते आपले हित पूर्ण करण्यासाठी इतर देशांवर प्रभाव टाकतात.

**6. राष्ट्रामधील परस्पर संवाद आणि अभिप्राय:** संध्याच्या जगात कोणतेही राष्ट्र परीपूर्ण किंवा स्वावलंबी नाही. प्रत्येक राष्ट्र कोणत्या ना कोणत्या प्रकारे दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून असते म्हणून त्यांनी आपापल्या हिताचे रक्षण करणासाठी परस्पर संवाद आणि अभिप्राय यात गुंतणे अत्यावश्यक आहे.

**7. सिद्धांत निर्मीतीसाठी प्रायोगीक आणि विश्लेषनांत्मक पद्धतीचा वापर:** ज्ञानाच्या सर्व शाखांच्या अभ्यासासाठी सिद्धांत हे आधार आहेत त्या नुसार आतंरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात सिद्धांत देखील आधार आहेत. हे सिद्धांत प्रायोगिक स्वरूपाचे आहे विशेषता आंतरराष्ट्रीय संबंध अभ्यासकांनी त्यांचा अभ्यास वैज्ञानिक करण्यासाठी प्रायोगीक आणि विश्लेषनात्मक पद्धती व्यापरल्या आहेत.

**8. अधिकृत आणि गैर अधिकृत संस्थेची भुमीका:** मान्यता प्राप्त आणि मान्यता नसलेल्या संस्था या सारखा आंतरराष्ट्रीय संबंध संस्थाच्या अभ्यासावर प्रभाव टाकत आहेत. त्या पैकी विश्व संस्था (UNO), जागतिक बँक (Wold Bank) आंतरराष्ट्रीयनाणे

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

नीधी (IMF) इत्यादी अधिकृत संस्था आहेत. हिंसक संघटना या बेकायदेशीर (गैर अधिकृत) संघटना आहेत. ज्या जागतिक शांतता आणि सुरक्षिततेला धोका निर्माण करतात या दोन्ही संस्थांचा जागतिक राजकारणावर स्वंतःचा प्रभाव आहे.

**व्याप्ती:** आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाला स्वतःची व्याप्ती आहे.

**1. आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास:** आंतरराष्ट्रीय संबधांचा अभ्यास करण्याची व्याप्ती विस्तृत आहे. त्यामध्ये मूळ विषयाचा अंतर भाव होतो. अर्थात प्राकृतिक स्वरूपाचे महत्व आणि आंतरराष्ट्रीय संबधाचा विकास.

**2. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास:** आंतरराष्ट्रीय स्तरावर शक्ती एकत्र करण्यासाठी विविध देशामधील सहकार्य, संघर्ष, वाटाघाटी, समन्वय, या सारख्या पैलुंचा समावेश होतो. ते कसे आणि का कोठे टिकले? त्याचे परीणाम काय आहेत? सल्ला मसलत आणि संशोधन करण्यासाठी त्याची व्याप्ती या सारख्या समस्यावर मदत करतात.

**3. आंतरराष्ट्रीय भुमिकेचा अभ्यास:** आंतरराष्ट्रीय आणि आंतर सरकारी संस्थाचे विविध प्रकार आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात त्याचा प्रभाव वाढत आहे. उदा: आंतरराष्ट्रीय आंतरशासकिय संस्था जसे की रेडक्रॉस, जागतिक व्यापारी संघटना, जागतीक आरोग्य संघटना, जागतीक बँक यांचा अभ्यास केला जातो.

**4. परराष्ट्र धोरण:** विविध देशाची परराष्ट्र धोरणे हा आंतरराष्ट्रीय संबंधाचा पाया असतो. ते संबंधित देशाची आकांशा, उद्दीष्टे आणि उपलब्धता व्यक्त करतात. म्हणुनच परराष्ट्र धोरण हा देखील आंतरराष्ट्रीय संबंधाचा अविभाज्य भाग आहे.

**5. युद्ध आणि शांतता:** राष्ट्र आणि राज्यामधील संघर्ष व युद्धाची कारणे आणि परीनामाचा पद्धतशीर अभ्यास येथे केला जातो.

**6. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या विचाराची निर्मीती आणि प्रसार:** आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचा मुख्य उद्देश देश आणि संघर्ष यांच्यात शांतता प्रस्थापित करणे हा आहे. जागतिक शांतता, सुरक्षा आणि समृध्दी सुधारणारे विचार तयार करणे आणि प्रसारीत करणे हे देखील त्यांच्या शुध्द दृष्टीकोणाखाली येतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**7. राष्ट्रीय शक्तीकेंद्राचा अभ्यास:** आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे राष्ट्राच्या हितामधील संघर्षाचा अभ्यास. राष्ट्राच्या रक्षणासाठी त्या देशाच्या शक्तीचा प्रभाव महत्वाची भूमिका बजावतो, म्हणूनच देशाला शक्ती देणाऱ्या या शक्ती केंद्राचा अभ्यास हा आंतरराष्ट्रीय संबधांचा अभ्यास आहे.

**महत्व:** आंतरराष्ट्रीय संबंधाना स्वताःचे महत्व आहे. पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाचा पद्धतशीर अभ्यास सुरू झाला. अमेरीका, ब्रिटन, आणि स्वीडन या सारख्या देशातील विद्यापिठांमध्ये हा अभ्यास सुरु झाला याची जाणीव 1919 मध्ये ब्रिटन मधील वुड्रो विल्सन चेअर यांनी करून दिली. ब्रिटन येथील वेल्स विद्यापिठाचे पहिले अध्यक्ष एकार्त जिम (Ekrath Jim) तसेच 1919 मध्ये वॉशिंग्टन यु.एस.ए. मधील जॉर्जटन विद्यापिठातील माजी राजदूत एडमंड ए वाल्श यांनी परराष्ट्र सेवेशी संबंधीत शिक्षण देण्यासाठी त्यांच्यानावाने स्कूल ऑफ फॉरेन सर्विस स्कूलची स्थापना केली.

अशा प्रकारे 100 वर्षाहुन अधिक काळाच्या इतिहासासह आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास फुलला आहे. ते जगातील सर्वनागरीकांचे उज्वल भविष्य ठरवत आहे. म्हणुनच त्याचे महत्व लक्षात घेणे आवश्यक आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे महत्व:

**1. जागतिक राजकरणाच्या वास्तविक स्वरूपाची ओळख करून देणे:** जागतिक राजकारण विविध राष्ट्र आणि संघटना यांच्यातील वास्तविक शक्ती संबंधाची गतीशिलता संमजून घेण्यास मदत करते. वेगवेगळ्या देशाच्या क्रिया आणि प्रतिक्रिया संबंधीत देशाच्या धोरणात्मक नीतीवर अवलंबुन असतात, म्हणून आंतरराष्ट्रीय संबंध जागतिक राजकरणाची वास्तविकता लक्षात घेण्यास मदत करतात.

**2. राष्ट्रीयहित लक्षात घेण्यास मदत करते:** राष्ट्रीयहित आंतरराष्ट्रीय संबंधाची मूळ प्रेरणा आहे. त्यांचा स्वभाव अंतर्गत संबंधाचे स्वरूप ठरविते या हिताच्या पूर्ततेसाठी सर्व राष्ट्रे आपापले संबंध विकसीत करतात.

**3. जगासमोरील प्रमुख आव्हानाविषयी ज्ञान देते:** भुक, कुपोषण, दारिद्रय, रोग, बेरोजगारी, संघर्ष, युध्द, दहशतवाद, हवामानबद्दल आणि जैविक समस्या या सारख्या जगासमोरील प्रमुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास हा आधार आहे.

**4. जागतिक चेतना जागृत करते:** जरी देशामध्ये विविध हितसंबंध आणि जागतीक मतभेद असले तरी शेवटी आपण सर्व मानव आहोत. अशा भावना जागतिक शांततेत योगदान देतात आणि स्वता:मध्ये चैतन्य जागृत करतात. या बाबतीत आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**5. परराष्ट्र धोरणाचे महत्व कायम ठेवते:** परराष्ट्र धोरणाचा अभ्यास हा अंतराराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचा भाग आहे. या अनुषंगाने जागतिक शांततेसाठी देशामधील चांगले संबंध अत्यंत आवश्यक आहेत आणि त्यासाठी परराष्ट्र धोरणाचे ज्ञान महत्वाचे आहे.

**6. आंतरराष्ट्रीय संघटनेचे महत्व जाणून घेण्यास मदत होते:** मानवी जीवनासाठी विविध आंतरराष्ट्रीय संघटनानी सुसुत्रता आणण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत. त्या जागतिक शांततेसाठी काम करत आहेत. उदा:- संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक, युनेस्को, युनिसेफ इत्यादी आंतरराष्ट्रीय संस्था सर्व समावेशक आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. आंतरराष्ट्रीय संबधाच्या अभ्यासाला आंतरराष्ट्रीय धोरण असे ______ यांनी म्हटले.
2. वुड्रो विल्सन चेअर विद्यापीठ ______ येथे सुरु केले.
3. ______ यांनी आंतरराष्ट्रीय हा शब्द पहिलांदाच वापरला.

**II. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

4. आंतरराष्ट्रीय संबधाचा अभ्यास म्हणजे काय?
5. आंतरराष्ट्रीय संबंधाचा पध्दतशीर अभ्यास केंव्हा सुरू झाल?
6. वेल्स विद्यापीठात सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय संबंधाचा पध्दतशीर अभ्यासासाठी वुड्रो विल्सन चेअरचे पहिले अध्यक्ष कोण होते?
7. आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप स्पष्ट करा.
8. आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्व काय आहे?

**III. उपक्रम.**

1. आंतरराष्ट्रीय संबंधामधील परस्परावलंबनाचे महत्व वर्गात चर्चा करा.
2. शिक्षकांच्या मदतीने जागतिक शांतता देणाऱ्या घटकांचीयादी करा.
3. विंड्रो विल्सनच्या जीवनाबद्दल आणि यशाबद्दल जाणून घ्या.
4. आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास करणाऱ्या सामग्रीची यादी करा.

**IV. प्रकल्प.**

1. आंतरराष्ट्रीय संबंध सुधारण्यासाठी विविध देशांचा नेत्यांमध्ये बैठक आणि विचारंची देवाणदेवाण करण्याच्या महत्वावर चर्चा करा.
2. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या विकासासाठी कौटिल्याचे अर्थशास्त्र कसे उपयुक्त आहे हे शिक्षकांच्या मदतीने शोधा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-25 वे

# सामाजिकिकरण आणि कौटुंबिक नाते संबंध

G3K1Q1

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल:**
- सामाजिकिकरणाचा अर्थ आणि महत्व.
- व्यक्तीवर सामाजिकिकरणाचा प्रभाव.
- सामाजिकिकरणाच्या प्रतिनिधीची ओळख.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**सामाजिकिकरण:**

मानव हा समाजशील प्राणी आहे. मानवी शिशू इतर प्राण्याप्रमाणेच जन्माला येतो. त्यानंतर त्याची वाढ समाजशील जीवासारखी होते. मुलांच्या जन्मानंतर त्याच्या वाढीची प्रक्रिया आणि हळूहळू त्यांचे समाजशील व्यक्तींमध्ये रूपांतर होण्याच्या प्रक्रियेला सामाजिकिकरण असे म्हणता येईल.

सामाजिकिकरण है वैश्विक अथवा सार्वत्रिक आहे. सामाजिकिकरण ही सतत चालणारी एक प्रक्रिया आहे. इतर प्राणी मात्र त्यांच्या मुळ प्रवृत्तीनुसारच वागत असतात. त्यांच्यात वागण्याची नवीन काहीतरी शिकण्याची फारशी पात्रता नसते. पण मानवाची प्रवृत्ती वेगळी असते. त्याची नैसर्गिक प्रवृत्ती घेऊन तो जन्माला आलेला असतो. जिच्यामुळे तो सभोवतालच्या वातावरणाचे निरीक्षण करत करत शिकत असतो. म्हणजेच सभोवतालचे वातावरण आणि संस्कृतीचा त्याच्यावर फार मोठा प्रभाव पडतो. उपजतच शिकण्याच्या नैसर्गिक कुवतीनुसार तो परिस्थीतीनुरूप जगण्यास शिकतो. कोणत्याही परिस्थितीनुसार स्वतः मध्ये बदल आणि तडजोड करण्याची क्षमता त्याच्यामध्ये असते. मनुष्य प्राणी समाजातील प्रचलित संप्रदाय चालीरीती, रुढी, परंपरा, नैतिकमूल्ये, याला अनुसरून तो सामाजीक वर्तणूक करतो आणि हे सगळे सामाजिकिकरणामुळे शक्य आहे. म्हणूनच सामाजिकिकरण हा मानवाचा विशिष्ट गुणधर्म (attribute) आहे.

बालकाच्या जन्मानंतर लगेचच ते समाजात भाग घेण्याच्या स्थितीत नसते. आणि त्यांच्या मनातील इच्छा जाणूण घेण्यास किंवा समजण्यास आपण असमर्थ असतो. मुल आपल्या शरिरावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवण्यास उत्सूक नसल्याचे दिसून येते.

याचाच अर्थ असा होतो की, मुलाला आपल्या इच्छा, गरजा प्रकट करण्याचे ज्ञान नाही. नवीन वातावरणाबद्दल त्याच्या स्वतःच्या काही कल्पना असत नाहीत. हळूहळू मुलाचे नातेसंबध विकसित होऊन, त्यांच्यात शिकण्याची प्रक्रिया सुरु होते. समाजामध्ये भाग घेऊन आवश्यक तो बोध आणि सामर्थ्य प्राप्त करून घेणाऱ्या प्रक्रियेला सामाजिकिकरण असे म्हणतात. सामाजिकिकरणातून ज्या गोष्टीचे ज्ञान प्राप्त करून घेतले जाते तिला संस्कृती (Culture) म्हटली जाते.

**सामाजिकिकरणाचे महत्व आणि कार्य:**

1. मानवाला समाजशील होण्यास सहाय्यक ठरते.
2. व्यक्तीमत्वाचा विकास होतो.
3. जीवनात शिस्त लागते.
4. वेगवेगळी जीवनावश्यक कौशल्ये आणि ज्ञान प्राप्त होते.
5. योग्य आकांक्षा विकसित करण्यास मदत करते.
6. समाजातील भेदभाव (अंतर) कमी केले जाते.
7. उज्वल भविष्याला आकार निर्माण करण्याची संधी मिळते.
8. संस्कृती, परंपरा सतत पुढे जपण्यासाठी सहाय्य होते.
9. सामाजिक व्यवस्था सुरक्षित राखली जाते.

**सामाजिकिकरणाचे प्रतिनिधी अथवा परिणाम करणारे घटक** - सामाजिकिकरणावर परिणाम करणारे मुख्य घटक (वर्ग) दोन प्रकारचे आहेत. वय, अनुभव, आणि माणाने मोठे असणारे म्हणजेच वडिलधाऱ्यांचा प्रभाव प्रथम दिसुन येतो. समवयस्क किंवा मित्र मैत्रिणींचा वर्ग हा दुसरा प्रभाव पडणारा घटक आहे. पहिल्या गटात आई, वडील, शिक्षक, वडीलधारे सदस्य, ज्येष्ठ किंवा अधिकारी वर्ग येतो. दुसऱ्या गटात समवयस्क, मित्र मैत्रिणी, खेळातील सवंगडी इ.येतात. वस्तुस्थिती आणि निरिक्षणावर आधारीत सामाजिकिकरणावर प्रभाव पाडणारे प्रतिनिधी म्हणून पुढील घटकांना पाहिले जाते.

**उपक्रम :**

*तुमचे कुटुंब डोळ्यासमोर ठेवून तुमची आजी, आजोबा, आई-वडिल, चुलत व सख्खी भांवडे, काका, वहिनी हे पारपाडत असलेल्या कर्तव्यांची यादी तयार करा.*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**1. कुटुंब:** मुलाच्या सामाजिकिकरणात कुटुंबाची भूमीका फारमोठी असते. माता- पिता मुलांशी घनिष्ठ किंवा रक्ताच्या नात्याने बांधलेले असतात. आई ही मुलाची पहिली गुरु असते. आणि घर हे त्यांची पहिली शाळा असते. पालकांची वर्तणूक संस्कृती, परस्पर प्रतिक्रीया, शिष्टाचार इ. मुलावर फार मोठे प्रभाव पाडतात.

प्रेम,काळजी, देखभाल, दयाळूपणा, करुणा, सहकार्य, नैतिक मूल्ये, सहनशीलता या सर्वाचा बालकांच्या वाढीवर आणि त्यांच्या मानसिकतेवर फार मोठा प्रभाव पडतो, आणि हे सर्व गुण घेतच बालकाच्या व्यक्तीमत्वाचा विकास होत जातो. कुटुंबाकडून त्याच्या कृतीला मिळणारे उत्तेजन, कौतूक, परस्पर प्रतिक्रिया या गोष्टी बालकाच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडतात. बालपणातच चुकीला मिळालेली योग्य शिक्षा ही व्यक्तीला योग्य मार्गावर चालण्यास फायदेशीर ठरते. पालक वयाने अनुभवाने मोठे असतात. त्यामुळे मुले आज्ञाधारक बनतात. परस्पर स्नेहाचा समंजस वागणुकीचा प्रेमळपणाचा मुलाच्यावर परिणाम होतो. सामाजिकिकरणाने मुलाचे व्यक्तिमत्व कळी फुलल्याप्रमाणे फुलत जाऊन विकसीत होते.

**2. समवयस्क:** हे देखील सामाजिकिकरणासाठी हातभार लावणारे मुख्य घटक आहेत. वर्गमित्रमैत्रीनी, खेळातील सवंगडी किंवा मित्र यामध्ये मोडतात. सहकार्य आणि परस्परांना समजून घेण्याची वृत्ती,तडजोड या गोष्टी या नात्याचा आधार असतात. समवयस्क समुहातील सदस्य एकाच वयाचे असल्याने पालक किंवा शिक्षकांकडून ज्या गोष्टी शिकू शकत नाहीत, त्या या सदस्याकडून शिकवल्या जातात. सामाजिक दृष्टीकोनातून हे ज्ञान आवश्यक असते.

**3. धर्म:** सामाजिकिकरणाच्या प्रक्रियेत धर्माची भूमिका महत्वाची असते. सामाजिक जीवनाचा पाया दृढ करण्याचे कार्य धर्म करतो. धर्मामध्ये नैतिकतेच्या मार्गावरून जीवन व्यतीत करण्याचे शिक्षण दिले जाते. धार्मिक श्रद्धा, पालक, नातेवाईक व ज्येष्ठ यांच्या सोबतीने धार्मिक स्थळाला दिलेली भेट (तिर्थयात्रा) यांचे मुले निरीक्षण करतात. सणवार, यात्रा, धार्मिक सण या कार्यक्रमात सहभागी झाल्यामूळे दानशुरपणा, सेवाभाव, समाजसेवेची वृत्ती इ. गोष्टी विकसीत होतात. ज्याची समाजाला उपयोग आणि गरज असते. त्या बऱ्याच गोष्टी धर्म शिकवितो.

**4. शाळा:** मुलांचा सामाजिकिकरणात शाळेचे पात्र खूपच महत्वाचे आहे. शाळेत मुले फक्त शिक्षणाने प्रभावित होत नाही तर शिक्षक व सोबतच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव खूप

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मोठा असतो. मुलांचा दृष्टीकोन वर्तणूक,चारित्र, ज्ञानप्राप्ती हे सगळे शिक्षणाने प्रभावित होऊन घडत जाते. त्यांच्यातील अंतर्गत सामर्थ्य विकसित होऊन जीवन विशाल आणि समृद्ध बनते. या वयातील सामाजिकरणात शिक्षकांची भुमिका फार महत्वाची असते. शिक्षकांची मुलांशी वागणूक, प्रेमळ स्वभाव, सहृदयता, समानता यांची अभिव्यक्ती, शिक्षकांनी शिकविलेली नैतिक मूल्ये यामुळे, मुलांच्यात आत्मविश्वास, प्रेम, धैर्य इ. सद्गुण विकसीत होतात. शिक्षकांनी शालेय व शालाबाहय (अभ्यास व अभ्यासेंतर) रचनात्मक कार्यक्रमात मुलांना भाग घेण्यास उत्तेजन दिले पाहिजे. शालेय पाठयक्रम म्हणजे फक्त नोकरी मिळण्याचे साधन न होता, तिथे व्यवसायाभिमुख शिक्षण, शारिरीक शिक्षण,जीवन कौशल्ये,लैंगीक शिक्षण इ. देखील शालेय अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत केली पाहिजे. या सगळयामुळे सामाजिकिकरण दृढ करणे साध्य होते.



**विचार करा :**
*बालकांच्या सामाजिकिकरणत शिक्षकांचे कार्य कोणते.*

**5. प्रसारमाध्यमे:** आधुनिक समाजामध्ये प्रसारमाध्यमे सामाजिकिकरणामध्ये मुख्य भूमिका प्रभाविरीत्या पार पाडतात. प्रभाविपणे सादर केलेली जाहिरात, कथा, कादंबऱ्या, कविता, नाटके, भित्तीपत्रके, रेडिओवरील कार्यक्रम, थोरांचे सुविचार यांचा दैनिक जीवनात खूप प्रभाव पडतो. दूरदर्शन, चित्रपट, नाटक, वृत्तपत्रे, रेडिओ ही प्रसार माध्यमे साहित्याचा उपयोग आणि सादरीकरण प्रभावीपणे करून सामाजिकिकरणास मदत करतात. याच बरोबर शैक्षणिक दृष्टीकोनातून महत्वाचे कार्यक्रम नवीन स्थळे, शोध, संशोधन याबद्दल माहिती देत व्यक्तिच्या विकासाला सहाय्यक ठरतात.

**6. शेजारी:** आपल्या आजूबाजुला राहणाऱ्या लोकांना शेजारी म्हणतात. समाजातील सगळी वैशिष्ट्ये असलेला छोटा समूह म्हणजे शेजारी होय. लोकांचे परस्परांशी स्नेहाचे आणि आत्मियतेचे संबंध असतात. एकमेकांना सर्वतोपरी सहाय्य करतात. शहरी आणि ग्रामीण भागातील शेजाऱ्यांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये वेगवेगळी असतात. ग्रामीण भागात शेजार धर्म हा खुप जवळकीचा असतो. जणू काही एका कुटुंबातील सदस्यंच असल्याचे कुटुंबातील सदस्यांप्रमाणे ते एकमेकांची सुख - दुःखे वाटतात. परस्पराना मदत करण्याची आणि एकमेकांची जबाबदारी घेण्याची वृती लक्षणीय असते. सण, समारंभ, जत्रा किंवा लग्नांच्या प्रसंगी शेजारी कोणत्याही

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्रसंगी आम्ही आहोत ना मदत करायला' अशा भावनेने शेजारी इथे आढळून येतात. पण शहरी भागात अशा प्रकारचा शेजारधर्म अपेक्षित करता येत नाही. कारण शहरी भागातील लोक स्वतःचा एकांत जपताना दिसून येतात. स्वतःची वेगळी ओळख ठेवण्याकडे कल दिसून येतो. शहरी भागातील लोक बरेचसे आत्मकेंद्रीत दिसून येतात.

**विचार करा :**

*तुमच्या शेजाऱ्यासोबतच्या तुमच्या घरगुती संबंधांचे - वर्णन करा*

**लिंग आणि सामाजिकिकरण:**

आतापर्यंतच्या अभ्यासानुसार सामाजिकिकरण हे मानवाला अत्यंत आवश्यक आहे. कारण मानव हा सामाजिक प्राणी आहे. पण सामाजिकिकरणाची प्रक्रिया प्रत्येक कुटुंबात वेगवेगळी असू शकते. वडिलधाऱ्यांचे, पालकांचे, जन्म दात्याचे आचार-विचार शैक्षणिक दर्जा, आवडीनिवडी, विश्वास यांचा सामाजिकिकरणावर फार प्रभाव दिसून येतो. याच कारणामुळे कळत-नकळत वडिलधारी माणसे कुटुंबातील मुला-मुलींना वेगवेगळी सामाजिक बंधने वेळोवेळी शिकवीत असतात. उदाहरणार्थ: मुलगा घरात उशीरा आला तर सहजपणे आता आलास काय? असं विचारले जाते. तर मुलीला मात्र हाच प्रश्न ''एवढा का उशीर केलीस? संध्याकाळच्या आत घरात यावयास पाहिजे, अशा कडक शब्दात विचारले जाते. विशेषतः भारतात मुलींच्याकडून स्वंयपाक घरात मदत करणे अपेक्षित असते. पण मुलांना मात्र मोकळीक असते. खेळणी घेतानाही हा फरक दिसतो. मुलींना बाहुली दिली जाते, तर मुलांना क्रिकेट बॅट अशाप्रकारे व्यक्तीच्या लिंगानुसार सामाजिकीकरण्याची प्रक्रिया चालू असते.

**उपक्रम :**

*विशेष कार्य केलेल्या स्त्रियांबद्दल माहिती मिळवा.*

अलिकडच्या काळात आधुनिक समाजामध्ये स्त्रियांच्या स्थानामध्ये लक्षणीय बदल होतात. हे स्थान वेळोवेळी आणि देशानुसार बदलत आहे. भारतामध्ये राष्ट्रीयत्व आणि लोकशाहीबद्दल जागरूकता निर्माण झाल्यामुळे आणि नवीन अर्थव्यवस्था आणि आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे स्त्रीला स्वातंत्र्य मिळून तिच्या स्थानमानाला एक वेगळा दृष्टिकोन प्राप्त झाला आहे. कधी- काळी फक्त पुरुषांना प्राप्त होणारे हुद्दे आज स्त्रियानाही प्राप्त झाले आहेत. असे असले तरी देखील लिंग भेदावर आधारित कामाची विभागणी आजही अस्तित्वात आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अलीकडे स्त्रियांना सर्व क्षेत्रात उदाहरणार्थ-खाणकाम, लोखंडी कारखाने, बोगदा खोदणे, समुद्राच्या तळातील संपत्ती काढणे, औषधे, वैद्यकीय संशोधन क्षेत्र, उद्योगधंदे, संरक्षण विभाग, यासारख्या क्षेत्रात देखील स्त्रियांनी आपली मक्तेदारी निर्माण केली आहे.

स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना समान संधी, मोफत शिक्षण आर्थिक मदत देण्याबद्दल सरकारने निर्णय घेतला आहे. स्त्रियांच्या शिक्षणासाठी आणि आर्थिक विकासासाठी अनेक योजना हाती घेतल्या आहेत.

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. मानव प्राण्याला समाजशिल प्राणी बनविण्याच्या प्रक्रियेला ___________ म्हणतात.
2. आई ही मुलाची पहिली ___________ असते.
3. ___________ मुळे बालकांची मने कळीप्रमाणे हळूवार विकसित होतात.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

4. सामाजिकिकरणामध्ये समवयस्कांच्या भूमिकेबद्दल चर्चा करा.
5. कौटुंबिक वातावरणात मुले कोणती मूल्ये शिकतात?
6. सामाजिकिकरणात धर्माची भूमिका काय असते?
7. सामाजिकिकरणाचे महत्व काय?
8. सामाजिकिकरणाच्या प्रक्रियेत शिक्षक कोणती भूमिका निभावतात?
9. आधुनिक समाजात प्रसारमाध्यमे सामाजिकीकरणास कशा प्रकारे सहाय्य करतात?

**III. कृती :**

1. समाजाच्या निर्मितीमध्ये प्रसार माध्यमांची भूमिका या विषयावर निबंध स्पर्धाचे आयोजन करा.
2. सामाजिकिकरणाच्या संबंधित वृत्तपत्रातील लेख गोळा करा.

**IV. प्रकल्प :**

1. विविध क्षेत्रात उत्तुंग कार्य केलेल्या कर्नाटकातील महिलांची माहिती गोळा करा.

***

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## प्रकरण-26 वे

V9I2H6

# समुदाय

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *समुदाय या शब्दाचा अर्थ.*
- *शहर शब्दाचा अर्थ आणि शहरी समुदायाची वैशिष्ट्ये.*
- *औद्योगिकरणाचा शहरीकरणाशी संबंध.*
- *ग्रामीण आणि आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये.*

**समुदायाचा अर्थः** विशिष्ट भौगोलिक क्षेत्रामध्ये सामान्य नियम आणि कायदे, मुल्य आणि समान ओळख असलेल्या लोकांच्या समुहाला समुदाय म्हणतात. हे एक सामाजिक ऐक्य आहे.

**समुदायः**

माणूस एकटा राहू शकत नाही. कारण तो समाजशिल प्राणी आहे. तो किंवा ती राहणाऱ्या समूहातील सदस्यांबरोबर वेगवेगळे संबंध प्रस्थापित केलेले असतात. कायम राहणाऱ्या प्रदेशातील किंवा विशिष्ट प्रदेशातील सदस्यासोबत राहण्याने त्यांच्यात सामाजिक ओढ व कळकळ वाढते. त्यापासून त्याला किंवा तिला सामान्यपणे जगण्याची परिकल्पना येते. अशा रीतीने विशिष्ट सामाजिक प्रदेशात सामान्यपणे जीवन जगण्याची परिकल्पनाच 'समुदाय' किंवा 'समाज' म्हणून घेते.

**समुदायांची लक्षणेः** 1) लोकांचा समूह 2) मर्यादीत विशिष्ठ क्षेत्र 3) एकतेची भावना 4) जीवनाचा सामान्य दृष्टीकोन 5) कायद्याने प्रस्तावित नाहीत.

**नगर म्हणजे काय ?**



शहर

नगर म्हणजे आकाराने लोकसंख्येची घनता जास्त असलेला आणि सामाजिक वैविध्यता असलेला लोकांच्या विशिष्ट प्रदेशातील कायमचे वस्तीस्थान. 2011 च्या जनगणनेनुसार नगर समुदाय म्हटल्या जाणाऱ्या प्रदेशात पुढील घटक अंतर्भूत केलेले आहेत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. कमीत कमी 50,000 लोकसंख्या असणारा प्रदेश.
2. एका चौरस कि.मी. क्षेत्रात 1,000 अशी लोकसंख्येची घनता असणारा प्रदेश.
3. जास्तीत जास्त लोक कृषीत्तर व्यवसायात व्यस्त असतात.
4. नागरिकांना आवश्यक सोई सुविधा उपलब्ध असतात.
5. नगर समुदायाला शहर, नगर आणि महानगर या नावाने ओळखले जाते.

**नगराची लक्षणे:**

1. सामाजिक वैविध्यता दिसते
2. अनभिज्ञता (अपरिचीतता)
3. समाजात जास्तीत जास्त देवाण घेवाण नसते (आत्मकेंद्रीपणा)
4. वैयक्तिकता (गुप्तता) सुखासिनता याला महत्व
5. संघ, संघटनांचा विकास
6. छोटी किंवा विभक्त कुटुंब
7. सामाजिक परिवर्तनाचा तीव्र वेग.

**उपक्रम :**
*तुम्ही रहात असलेल्या ठिकाणापासून जवळचे शहर आणि खेडे यातील फरक (लोकसंख्या विस्तार आणि सोयीसुविधा) जाणून घ्या.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**औद्योगिकरण आणि शहरीकरण:**

औद्योगिकरण म्हणजे वस्तूंची वाहतूक आणि सेवांचे उत्पादन यांचा वापर तंत्रज्ञानात होणाऱ्या बदलांची प्रक्रिया. स्पष्टपणे म्हटले तर उत्पादक उद्योगधंद्याची वाढ सुचविण्यासाठी औद्योगिकरण हा शब्द वापरतात.

**तुम्ही हे तयार करा :**
*तुमच्या जिल्ह्यातील मोठ्या उद्योगधंधांची यादी तयार करून तेथे उत्पादित होणाऱ्या वस्तूंची नांवे लिहा.*

ब्रिटिशांच्या साम्राज्य विस्ताराच्या धोरणापासून ते पहिल्या जागतिक महायुद्धापर्यंत त्यांनी भारतात उद्योग धंदे स्थापन केले नाहीत. त्यानंतर उद्योगधंदे स्थापन केल्यामुळे कुटीरोद्योगांचा नाश झाला. ग्रामीण भागातील लोकांना शहरात आणि औद्योगिक केंद्रात बोलावण्यात आले. खेड्यातून आलेल्या लोकांनी औद्योगिक शहरात आश्रय घेतला व तिथे मिळालेल्या नोकरीच्या संधी स्वीकारल्या. व्यवसायिक वृत्तीच्या चालनेतून दुसऱ्या लोकांना

आकर्षित करून घेण्यात आले. रेल्वे व बस सुविधा सर्वांना एकत्र करण्यास कारणीभूत ठरली. औद्योगिकरणामुळे आमचे सामाजिक वातावरण बदलले. शहरांची निर्मिती झाली.



**उद्योगधंदे**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**ग्रामीण समुदाय आणि त्याची लक्षणे:**

ग्रामीण समुदाय हा भारतीय समाजाचा आधारस्तंभ आहे. याचे मूळ खेडे आहे. भारतीय संस्कृती आणि इतिहासाच्या विकासामध्ये खेड्यांना महत्त्वाचे स्थान आहे. मर्यादित क्षेत्रात आढळून येणारे सामाजिक जीवन किंवा पूर्ण संघटनेला समुदाय असे म्हटले जाते. साधे जीवन जगणाऱ्या मर्यादित भूप्रदेशामध्ये राहणाऱ्या लोकांच्या समुदायाला 'खेडे' असे म्हणतात. 'खेडे' अथवा 'ग्राम' ही कल्पना केवळ कृषी उद्योग करणारे असे नव्हे तर साध्या जीवनाची एक पद्धत अनुसरुण राहणाऱ्या कमी लोकांचा लहान समुदाय म्हणजे खेडे होय.

> **उपक्रम**
>
> *तुम्ही राहात असलेल्या ठिकाणाच्या आजूबाजूच्या समाज बांधवांच्या बद्दल जाणून घ्या.*

**ग्रामीण समाजाची लक्षणे:**

जनसंख्येची घनता विस्तार आणि जीवन शैली इत्यादी विषयांमध्ये एक खेडे दुसऱ्या खेड्यापेक्षा वेगळे असते. समुद्रकिनारे आणि घाट प्रदेशातील खेडी वेगवेगळी असतात. वाळवंट

किंवा दुर्गम भागातील खेड्यातील लोकांचे जीवनमान यात फरक दिसून येतो. अनेक फरक असताना देखील आपण ग्रामीण समाजाच्या लक्षणांची सुची खालील प्रमाणे करू शकतो.

1. छोटा समुदाय
2. आत्मियतेचे संबंध
3. सामाजिक ऐक्य
4. अनौपचारिक नियंत्रण
5. अविभक्त कुटुंबांना प्राधान्य
6. कृषिप्रधान
7. निसर्गाचा प्रभाव
8. शेजाऱ्यांचा प्रभाव
9. सरळता किंवा साधेपणा
10. अतिशय धार्मिक व श्रद्धाळू
11. सांप्रदायिक दृष्टिकोन
12. व्यापकतेने दिसून येणारी जातीव्यवस्था
13. निरक्षरता आणि गरीबी



**खेडे ग्रामीण समाज**

**तुम्हाला हे माहित असूद्या**

*तुमच्या गावात होण्याऱ्या जत्रांच्या आधारे ग्रामीण समाजाची लक्षणे जाणून घ्या. व कृती तयार करा.*

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**ग्राम समुदायातील समस्या:**

1. कृषी समस्या
2. कुटिरोद्योगांची समस्या
3. निरक्षरता दारिद्र्य् निरुद्योगाच्या समस्या
4. आरोग्य सुविधाची कमतरता
5. नागरी सुविधांची कमतरता.

## आदिवासी समुदाय आणि त्यांची लक्षणे:

नागरी समुदायापासून दूर, दुर्गम जंगली भाग, डोंगर दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशात राहणाऱ्या समाजाला 'आदिवासी' समाज म्हणतात. जगातल्या काही राष्ट्रात यांची संख्या अधिक आहे. जगात सर्वात जास्त आदिवासी समुदाय (संख्या) असणाऱ्या राष्ट्रात आफ्रिकेनंतर भारताचे दुसरे स्थान आहे. मानवी जीवन शास्त्राच्या शब्दकोशात 'आदिवासी' म्हणजे सामान्यपणे एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारे, ज्यांची भाषा संस्कृती सामाजिक जीवन नागरी जीवनापेक्षा वेगळे असते. अशा लोकांच्या सामाजिक संघटना म्हणजे आदिवासी होय. भारतात राहणारे लोक निग्रो, मंगोलियन आणि मेडीटेरेयन या तीन प्रवर्गातील आहेत.

### आदिवासी समुदायाची लक्षणे:


आदिवासी जमात

1. सामान्य भूप्रदेश
2. कुटुंब / कुटुंब समूह
3. आपलेपणा
4. सामान्य भाषा
5. सरलता आणि स्वावलंबन
6. सामान्य धर्म
7. सामान्य संस्कृती
8. सामान्य नावे
9. एकीची दृढभावना
10. निरक्षरता किंवा अज्ञान

भारताच्या आदिवासी समाजाचे भौगोलिक घटकानुसार तीन विभाग केले आहेत.

**1. ईशान्य भागातील आदिवासी:** हे मंगोलियन वंशातील आदिवासी नागालँड, मेघालय, अरुणाचल प्रदेश, आसाम, त्रिपुरा, मणीपूर या राज्यात आढळून येतात. हे चिनी-तिबेटी भाषेचे मिश्रण असलेली भाषा बोलतात. गुरंग, लिंबी, लेपा, आला, मिगी, गारो, खासी, चकमा, नागा, सेना, कचारी हे काही आदिवासी समाज आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**2. मध्य भारतातील आदिवासी:** कृष्णा नदीच्या उत्तरेकडे गंगा नदीच्या दक्षिण भागात येणाऱ्या पर्वत आणि दऱ्या खोऱ्यामध्ये काही आदिवासी समाज आहेत. या प्रदेशात संथाल, मुंदा, गोंडा, भिल्ल, ओरान, बैगा, खारिया, खोंड, कोल, भूमी, सावरू इत्यादी आदिवासी समाज राहत आहेत. इतर आदिवासीच्या तुलनेत या समाजाची अभिवृद्धी झालेली आहे.

**3. दक्षिणेकडील आदिवासी समाज:** कृष्णा नदीच्या दक्षिणेला आणि कन्याकुमारीच्या उत्तरेकडील प्रदेशात आदिवासी समाज वसलेला आहे. आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू इ. राज्यातील भागात हा समाज आढळतो. सोलिग, थेरव, कोरा चेंचू, पणीय, काडा, सिद्धी, मध गोळा करणारे इत्यादी आदिवासी लोक आढळतात.

याव्यतिरिक्त अंदमान आणि निकोबार बेटावर राहणाऱ्या आदिवासींचा चौथा समाज आहे. जावा, ओंगे, सेंथीनली हे आदिवासी अंदमान व निकोबार बेटावर वसती करून आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

1. विशिष्ट प्रदेशात सामाजिक जीवन जगण्याची परिकल्पना म्हणजे ____________ .
2. भारतीय जीवनाचा आधारस्तंभ ____________ हा समुदाय आहे.
3. ईशान्य भागातील आदिवासी ____________ या वंशातील आहेत.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

4. नगर म्हणजे काय?
5. औद्योगिकरण काय सुचविते?
6. खेडे म्हणजे काय?
7. मानव शास्त्राच्या शब्दकोशानुसार 'आदिवासी' या शब्दाचा अर्थ काय होतो?
8. नगराची लक्षणे कोणती?

9. ग्रामीण समुदायाची लक्षणे कोणती?

10. ग्रामीण समुदायाच्या समस्या कोणत्या?

11. आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये लक्षणे कोणती?

12. भारतीय आदिवासी समाजाचे विभाग कोणते?

**III. उपक्रम**

1. नगर आणि ग्रामीण भागातील सोयी गैरसोयींची चर्चा करा.

2. तुमच्या आसपास राहणाऱ्या आदिवासी जीवनाच्या बद्दल माहिती संग्रहित करा.

**IV. प्रकल्प**

1. तुमच्या गावात शहरात ज्या सोयी सुविधांचा अभाव आहे त्यांचे निवारण करण्यासाठी ग्रामपंचायत किंवा नगरपालिका सदस्या कडून माहिती घ्या.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

भूगोलशास्त्र

प्रकरण-27 वे

# कर्नाटकातील खनिज संपत्ती

F8S7P1

> **या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**
> - *कर्नाटकात उपलब्ध असलेली खनिजे आणि त्यांचे महत्व.*
> - *कर्नाटकातील प्रमुख खनिजे, उपलब्धता आणि उत्पादन.*

एखाद्या प्रदेशाला, राज्याला किंवा देशाला आर्थिकदृष्ट्या पुढे जाण्यासाठी तिथे मिळणारी प्रचंड खनिज संपत्ती ही आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. कर्नाटक राज्यात विविध प्रकारच्या खनिज संपत्ती आहेत. त्यापैकी कच्चे लोखंड, सोने, मँगनीज़, चुनखडी, तांबे, बॉक्साईट, अ‍ॅस्बेस्टॉस, अभ्रक, क्रोमाइट आणि ग्रॅनाईट ही महत्त्वाची खनिजे आहेत. त्यातील महत्त्वाच्या खनिजा बद्दल अभ्यास करूया.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कच्चे लोखंड** (Iron ore)

याचा वापर लोह आणि पोलाद उद्योगात कच्चामाल म्हणून केला जातो. कर्नाटकात मॅग्नेटाइट आणि हेमेटाईट प्रकारच्या अनेक लोह खाणी आहेत. कच्च्या लोखंड उत्पादनात कर्नाटक देशात दुसऱ्या स्थानावर आहे. राज्यात 75 लोखंडाच्या खाणी चालू स्थितीत आहेत. येथील लोखंड उत्तम प्रतीचे असून त्यामध्ये 63% मॅग्नेटाइट आणि इतर हेमेटाइट प्रकारचे आहे.

**उपलब्धता :** कर्नाटकात कच्च्या लोखंडाची उपलब्धता मुख्यतः बळ्ळारी, विजयनगर चिक्कमंगळूरू, बागलकोट, चित्रदुर्ग, तुमकुर, शिमोगा, दक्षिण कॅनरा, उत्तर कॅनरा आणि गदग जिल्हात आहे. बळ्ळारी जिल्ह्यात अमाप साठे असून त्याचा प्रथम क्रमांक लागतो. विजयनगर जिल्ह्यातील होस्पेट आणि सोंडूर भागात आढळतात. दोनी मलाई, विभूतिगुड्ड, बेळगाव, कुमारस्वामी टेकड्या तिम्मप्पागुड्डी, देवाद्रि पर्वतरांगा, रामदुर्ग टेकड्या या ठिकाणी लोह उत्पादन केले जाते.

> **उपक्रम**
>
> *तुमच्या जिल्ह्यात आढळणाऱ्या खनिजाची याची यादी करा.*

चिक्कमगळूरू जिल्ह्याचा यात दुसरा क्रमांक लागतो. बाबाबुडनगिरी पर्वत (इनाम दत्तात्रेय पीठ), केम्मनगुंडी, कुद्रेमुख, गंगामूळ, कलहत्तगिरी आणि जेनसुरी टेकड्यांमध्ये कच्चे लोखंड उपलब्ध आहे. त्यामुळे जैववैविध्याचे रक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तेथील खाणखोदकाम बंद करण्याचा आदेश दिला. चित्रदुर्ग जिल्ह्यातील होसदुर्ग, सासल, बागलकोटचे अमीनगड, तुमकुर जिल्ह्यातील चिक्कनायकनहळ्ळी, हुलियारु, शिमोगा जिल्ह्यातील कुमसी शंकरगुड्ड सिद्धरहळ्ळी इत्यादी ठिकाणी कच्चा लोखंडाचे साठे आढळतात.

राज्यात उत्पादित होणारे लोह खनिज भद्रावती, विश्वेश्वरय्य स्टील फॅक्टरी आणि बळ्ळारी जवळील जिंदाल विजयनगर स्टील आणि पोलाद कारखाना येथे पाठविले जाते. शिल्लक कच्च्या लोखंडाची निर्यात केली जाते.

**मँगनीज़ :** मँगनीज़ धातू प्रामुख्याने गाळाच्या आणि रूपांतरित खडकांमध्ये ऑक्सोडाईटज्ड् स्वरूपात आढळतात. याचा उपयोग लोखंडाला टणकपणा येण्यासाठी मिश्रधातू म्हणून केला जातो याचा अन्य उपयोग रसायने, विद्युत प्रकल्प, रासायनिक खते, कॅलिको प्रिंटिंग आणि रंग उद्योगात केला जातो. म्हणून याला 'बहुउद्देशीय खनिज' असे म्हणतात.

**विभागणी :** कर्नाटकात मँगनीज़च्या खाणी पुष्कळ असून देशाच्या उत्पादनाच्या 27% उत्पादन येथे आढळते. मँगनीज़च्या उत्पादनात देखील ओरिसा नंतर कर्नाटकाचा दुसरा क्रमांक लागतो. राज्यातील मँगनीज़चे साठे केवळ लोहखनिज प्रदेशात आढळतात. बळ्ळारी जिल्हातील सोंडूर हे ठिकाण मँगनीज निर्मितीसाठी महत्त्वाचे आहे. राज्याच्या एकूण उत्पादनाच्या 90% उत्पादन येथे केले जाते. तसेच इतर प्रमुख केंद्र शिमोगा जिल्ह्यातील कुमसी, शंकरगुड्ड आणि होसहळ्ळी, चित्रदुर्ग जिल्हातील सादरहळ्ळी, तुमकूर

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

जिल्ह्यातील चिक्कनायकनहळ्ळी, उत्तर कॅनरा जिल्ह्यातील शिर्शी तालुका, सुपा, लोंढा आणि धारवाड, विजापूर आणि चिक्कमंगळूरू जिल्हा येथे इतर मुख्य खाणी आहेत. राज्यातील मॅगनिज उत्पादनाचा बहुताशः भाग जपान, चीन आणि अन्य देशांना निर्यात केला जातो.

**बॉक्साईट :** याचा वापर अॅल्युमिनीयमच्या उत्पादनात केला जातो. सिमेंटचे उत्पादन स्टील आणि विद्युत वापर यांच्या निर्मितीसाठी बॉक्साइटचा वापर केला जातो. याची मागणी सतत वाढत आहे.

**विभागणी :** कर्नाटकातील बॉक्साइटच्या खाणी बेळगाव, चिक्कमंगळूरू चित्रदुर्ग, दक्षिण कन्नड आणि उडपी जिल्ह्यात आढळून येतात. बेळगाव जिल्हा बॉक्साइट निर्मितीमध्ये अग्रेसर आहे. बेळगाव आणि खानापूर तालुक्यात बॉक्साइटच्या खाणी आहेत. येथील इंडियन अॅल्युमिनियम कंपनी (इंडाल-बेळगाव) बेळगाव या कारखान्यात या खनिजाचा वापर केला जात आहे. अलीकडे वाढत्या मागणीमुळे याच्या उत्पादनातही वाढ झाली आहे.

**सोने:** सोने हा दुर्मिळ चकाकणारा आणि दीर्घकाळ टिकणारा धातु आहे. याचा वापर दागिने आणि घडयाळांच्या निर्मितीमध्ये केला जातो. सोन्याचा वापर आणि मागणी सतत दुपटीने वाढत असल्यामुळे त्याची किंमत गगनाला भिडली आहे.

भारतात सुवर्ण उत्पादनात कर्नाटकाचा पहिला क्रमांक आहे. देशाच्या एकूण उत्पादनाच्या ८०% उत्पादन कर्नाटकात घेतले जाते. यासाठी कर्नाटकाला 'सुवर्णभूमी' म्हटले जाते. फार पूर्वीपासूनच येथे सोन्याचे उत्पादन होते. इ.स.1880 मध्ये जॉन टेलर यानी सोन्याच्या खाणीची सुरुवात केली. यामुळे कोलार गोल्ड फील्डची (KGF) 1885 मध्ये स्थापना झाली. येथे चार प्रमुख खाणी आहेत. त्या म्हणजे नंदीदुर्ग, उरीगांव, चँपीयन रीफ आणि म्हैसूर माईन्स होय. यामधील चँपीयन रीफ अत्यंत खोल (3217 मी.) आहे. फार पूर्वीपासून सततच्या उपश्यामुळे सोन्याच्या साठा संपण्याच्या मार्गावर आहे.

सध्या रायचूर जिल्ह्यातील हट्टी येथे सर्वात मोठी सोन्याची खाण आहे. येथे सोन्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जात आहे. तुमकुर जिल्ह्यातील बेल्लार आणि शिराजवळील अजंनहळ्ळी येथेही सोन्याचे उत्पादन केले जाते. मुळगुंद, गदग जिल्ह्यातील कप्पटगुड्ड आणि हासन जिल्ह्यातील केंपिनकोटे ही सोन्याच्या साठ्यांची इतर ठिकाणे आहेत.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. कुद्रेमुख येथे ___________ हे खनिज आढळते.
2. उत्तम दर्जाचे कच्चे लोखंड ___________ येथे आढळते.
3. बळ्ळारी जिल्ह्यातील ___________ खाणी आढळतात.
4. ___________ हा धातू बॉक्साईटपासून तयार होतो.
5. ___________ ही सर्वात खोल सोन्याची खाण आहे.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

6. कर्नाटकाला 'सुवर्णभूमी' असे का म्हटले जाते?
7. कर्नाटकामध्ये मिळणारी प्रमुख खनिजे कोणती?
8. मिश्र धातू म्हणून कोणत्या धातूचा वापर केला जातो?
9. कर्नाटकाच्या कोणत्या भागात कच्चे लोखंड आढळते?
10. बॉक्साईट उत्पादन करणारे प्रमुख जिल्हे कोणते?
11. कर्नाटकातील प्रमुख सोन्याच्या खाणी कोणत्या?

**III. जोड्या जुळवा :**

| अ | ब |
|---|---|
| i. मँगनीज़ | a) ॲल्युमिनियम |
| ii. हट्टी | b) भारतीय ॲल्युमिनियम कंपनी |
| iii. बॉक्साईट | c) K.G.F |
| iv. बेळगांवी | d) कर्नाटकातील सर्वात मोठी सोण्याची खाण |
| | e) बहुउद्देशीय खनिज |

**IV. उपक्रम :**

1. कर्नाटकात आढळणाऱ्या खनिजाचे नमुने गोळा करून त्यांची माहिती लिहा.
2. कर्नाटकाच्या नकाशात खनिजांची उपलब्धता दर्शविणारी ठिकाणे दाखवा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-28 वे

# कर्नाटकातील वाहतूक व्यवस्था

Y8N9N5

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *कर्नाटकातील वाहतूकीच्या माध्यमाचे महत्व*
- *रस्ते वाहतूक प्रकार आणि महत्त्वाचे महामार्ग*
- *रेल्वेचे महत्व आणि महत्वाचे रेल्वे मार्ग*
- *जल आणि हवाई वाहतूक.*

वस्तू, सेवा व प्रवाशांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याच्या व्यवस्थेला 'वाहतूक' असे म्हणतात. वाहतूक ही शेती उद्योग आणि वाणिज्य विकासाची जीवनरेखा आहे.




कर्नाटक ही विभिन्न साधनसंपत्तीची भूमी आहे. मुख्यत: कर्नाटक हे कृषिप्रधान राज्य आहे. अन्नधान्य आणि इतर कृषी उत्पादने, खाणीतील खनिजे. कारखाण्यात तयार झालेली विविध उत्पादने बाजारपेठा पर्यंत पोहचविणे, लोकांची ने-आण करणे शिवाय अनेक कारणांसाठी विविध वाहतूक व्यवस्थांची गरज आहे. कर्नाटकामध्ये विकसित रस्ते, रेल्वे मार्ग, जलमार्ग आणि हवाई वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**रस्तेवाहतूक :**

**महत्व:** कर्नाटकातील बहुतांश जनता ग्रामीण भागात राहते. त्यामुळे खेड्यातून नगरांना जोडणाऱ्या रस्त्यांचे महत्त्व खूप आहे. रस्ते सहज आणि कमी खर्चात तयार होऊ शकतात. राज्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात मालांची व माणसांची ने आण कमी श्रमात, सुलभतेने होऊ शकते. राज्यातील कृषीव्यवसाय, उद्योग, खनिज उद्योग, व्यापार आणि वाणिज्य यांचा विकास निश्चितपणे रस्त्यांच्या विकासावरच अवलंबून आहे.

## रस्ते वाहतुकीचा विकास

कर्नाटकात फार प्राचिन काळापासून रस्ते वाहतूक केली जाते. राजामहाराजानी आणि व्यवस्थापन आणि संरक्षणाच्या हेतूने रस्त्यांची निर्मिती केली होती. पूर्वीच्या काळी प्रवासी निवासालये (निवास आणि पाण्याची सोय), विश्रांती स्थानके, उपवने आणि धर्मशाळा होत्या. किनारपट्या अंतर्गत भागांना जोडणारे रस्ते तयार केले होते.

पण स्वातंत्र्यपूर्व काळात कर्नाटकात रस्त्यांचा विकास झाला नव्हता. बेंगळूरु आणि जुने म्हैसूर प्रांतातील जिल्हा केंद्रांना जोडणारे रस्ते होते. परंतु ते सुव्यवस्थित नव्हते. स्वातंत्र्यानंतर विशाल म्हैसूर राज्याची स्थापना झाली. त्यानंतर 1961 ला एकूण 43,182 कि. मी. रस्त्यांची निर्मिती झाली. सध्या रस्त्यांची एकूण लांबी 332743.15 कि. मी. आहे. त्यामधे 35.70% पक्के रस्ते तर 64.30% कच्चे रस्ते आहेत. आता रस्त्यांचा दर्जा वाढू लागल्याचे दिसून येत आहे.

> **उपक्रम :**
> *तुमच्या जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग हे ज्या तालुक्यातून जातात त्यांची यादी करा.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**रस्त्यांचे प्रकार :**

भारतातील इतर राज्याप्रमाणे कर्नाटकातील रस्त्यांची विभागणी चार प्रकारात केली आहे. ते म्हणजे

1. राष्ट्रीय महामार्ग
2. राज्य महामार्ग
3. जिल्हा मार्ग
4. ग्रामीण रस्ते

1. **राष्ट्रीय महामार्ग (National Highway):** महत्वाची शहरे, राज्याच्या राजधान्या आणि विमानतळांना जोडणाऱ्या मार्गांना राष्ट्रीय महामार्ग म्हटले जाते. ते दुपदरी,

चौपदरी आणि सहापदरी रूंद, दर्जेदार रस्ते आहेत. ते केंद्र सरकारच्या अधिकाराखाली येतात आणि त्यांची व्यवस्था 'भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकारण' (N.H.A.I.- National Highways Authority of India) कडून केली जाते. सध्या कर्नाटकात 14 राष्ट्रीय महामार्ग आहेत. त्यांची लांबी 7332 कि.मी आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात याचे प्रमाण सारखे नाही. उत्तर कन्नड, विजयापुर, बेळगावी, शिमोगा, बेंगळूरु ग्रामीण, तुमकुर, दक्षिण कन्नड आणि बळ्ळारी जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गांची संख्या अधिक आहे. रायचूर आणि कोडगु जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग नाहीत.

**तुम्हाला हे माहिती असुद्या**

*N.H.-13 हा कर्नाटकातील सर्वात लांब राष्ट्रीय महामार्ग आहे. हा रस्ता मंगळूरू मधून मूडबिद्री येथे येतो व शिमोगा चित्रदुर्ग, होस्पेट, इलकल, विजापूर येथून जाऊन सोलापूरला पोहोचतो.*

राष्ट्रीय मार्ग N.H-48 आणि N.H-44 हे दोन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण 'सुवर्ण चतुर्भुज चौपदरी योजना' तसेच 'कॅारीडोर योजने' अंतर्गत येतात. ते सहापदरी आहेत. राज्यातून जाणारे आहेत.

2. **राज्य मार्ग:** बेंगळूरु ते जिल्ह्याचे केंद्र, मुख्य शहरे आणि इतर महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांना राज्य मार्ग म्हटले जाते. या रस्त्यांची निर्मिती आणि व्यवस्थापनांची जबाबदारी राज्य सरकारवर असते. कर्नाटकमध्ये 27,880 की.मी. राज्य मार्ग आहेत. बेळगावी जिल्ह्यात सर्वात जास्त राज्य मार्ग आहेत. तर बेंगळूरु मध्ये कमी आहेत. कारण तेथे शहरी रस्ते अधिक आहेत.

3. **जिल्हा रस्ते:** जिल्हा केंद्रे, तालुका ठाणे, मुख्य शहरे, खेडी, रेल्वे आणि मुख्य मार्ग यांना जोडणाऱ्या रस्त्यांना जिल्हा रस्ते म्हटले जाते. या रस्त्यांची बांधणी करून व्यवस्थापन आणि देखरेखीची जबाबदारी जिल्हा परिषदेची असते. कर्नाटक राज्यात 56115 कि. मी. जिल्हा मार्ग आहेत. तुमकूर मध्ये सर्वात जास्त तर रायचूर मध्ये सर्वात कमी जिल्हा मार्ग आहेत.

4. **ग्रामीण रस्ते:** तालुक्यातील मुख्य ठाणे, जिल्हा आणि ग्रामीण भागाला जोडणाऱ्या रस्त्यांना ग्रामीण रस्ते म्हणतात. या रस्त्यांची निर्मिती आणि देखभाल याची जबाबदारी तालुका पंचायत आणि ग्रामपंचायतची असते. या रस्त्यांचा दर्जा चांगला

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

नसतो तर काही भागात प्रवास करणे अवघड असते. कर्नाटकात 1,97,331.61 कि.मी. लांबीचे ग्रामीण रस्ते आहेत.

वर उल्लेख केलेल्या रस्त्याव्यतिरिक्त बहु उद्देशीय आणि स्थानिक राजकारभारासाठीचे रस्ते स्थानिक व्यवस्थापनाखाली असतात. उदा. सार्वजनिक बांधकाम खाते, अरण्य खाते, पाणीपुरवठा विभाग, नगरपालिका, महानगरपालिका यांचे रस्ते.

## रेल्वेमार्ग वाहतूक




कर्नाटकात रस्त्यांच्या खालोखाल रेल्वे वाहतुकीचे स्थान आहे. लांब पल्ल्याच्या आणि मालाच्या स्वतः वाहतुकीचा पर्याय म्हणजे रेल्वे होय. कर्नाटकामध्ये रेल्वे सेवेचा प्रारंभ इ.स. 1864 मध्ये मद्रास रेल्वे कंपनीने बेंगळूरु आणि मद्रास दरम्यान रेल्वे मार्ग सुरू करण्यात आला. इ.स 1956 पर्यंत कर्नाटक राज्यात एकूण 2595. कि.मी. रेल्वेमार्ग दक्षिण विभागांतर्गत सुरू झाले. आता दक्षिण पश्चिम रेल्वे झोन अस्तित्वात आले असुन त्याचे व्यवस्थापन कार्यालय हुबळी येथे आहे. आज कर्नाटकात 3244 कि.मी. रेल्वे मार्ग आहे. कर्नाटकात रेल्वे मार्गाची विभागणी असमान आहे. बेंगलुरु, बळ्ळारी, बेळगावी, हासन, उत्तर कन्नड, चित्रदुर्ग, उडपी, बेंगळूर दक्षिण (रामनगर) आणि दक्षिण कन्नड जिल्ह्यात सरासरी 150 ते 200 कि.मी. चे रेल्वे मार्ग आहेत. कोडगु जिल्ह्यात एकही रेल्वे मार्ग नाही.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## कोंकण रेल्वे:

> **उपक्रम**
>
> *तुम्ही केलेल्या रेल्वे व रस्ते प्रवासासंदर्भात चर्चा करा. यापैकी कोणता प्रवास उत्तम आहे या बद्दल निर्णय घ्या.*

पश्चिम किनारपट्टीवरील सर्वात महत्त्वाचा हा मार्ग आहे. हा मार्ग मंगळुरू ते मुंबई यांना जोडतो. त्यामुळे 41 तासांचा प्रवास अवघ्या 18 तासात शक्य झाला आहे. याची लांबी 273 की. मी. असून 13 मुख्य आणि 310 इतर पूल या मार्गामध्ये येतात. यापैकी शरावती नदी पूल (2.2 कि.मी.) हा सगळ्यात लांब आणि काळी नदी पूल (1.2 की.मी.) हे दोन पूल महत्वाचे आहेत. हा मार्ग अनेक बोगद्यातून आणि पूलावरून जातो. या मार्गावरील नैसर्गिक सौंदर्य आणि दृश्य अत्यंत विलोभनीय आहेत. यामुळे हा प्रवास अगदी आनंददायक होतो.

## मेट्रो रेल्वे:




बेंगळूरु महानगर शहर म्हणून प्रचंड विस्तारीत झाल्यामूळे वाहतुकीचा प्रश्न क्लिष्ट बनला आहे. या समस्येवर मात करण्यासाठी 'नम्म मेट्रो' वाहतूक योजना आखण्यात आली आहे. 20 ऑक्टोंबर 2011 ला व्यापनहळ्ळी ते एम.जी. रोड दरम्यान मेट्रो रेल्वे सेवेस प्रारंभ झाला, असून लाखो लोक त्याचा उपयोग करत आहेत. या रेल्वेने प्रवास अगदी अल्पावधीत होतो. शहरांर्गत अनेक मेट्रो रेल्वे रोड पूर्णावस्थेला येत आहेत. आज मुद्दावर पासून सिल्क इन्स्टीट्यूट पर्यंत मेट्रो धावत आहे.

# हवाई वाहतूक

हे अत्यंत जलद वाहतुकीचे साधन आहे. या वाहतूकीमुळे लोक, टपाल आणि वजनाने हलक्या वस्तू दूरवर कमी वेळेत नेणे शक्य होते. नैसर्गिक आपत्ती, युध्दे किंवा आपत्कालीन स्थितीत मदत पुरविण्यास हवाई वाहतूक महत्त्वाची ठरते. परंतू ही वाहतूक खर्चिक असल्याने सर्वांना उपलब्ध व परवडणारी नाही.

1946 मध्ये कर्नाटकातील पहिली हवाई वाहतूक सेवा बेंगळूरु ते हैदराबादच्या दरम्यान डेक्कन एअरवेजने सुरू केली. हवाई वाहतुकीचे राष्ट्रीयकरण 1953 ला झाले आणि नंतर इंडियन एअरलाइन्सची स्थापना झाली. त्यानंतर बेंगळूरु भारतातील वेगवेगळ्या केंद्राशी जोडण्यात आले. इ.स 1996 मध्ये बेंगळूरला आंतरराष्ट्रीय विमानतळाचा दर्जा देण्यात आला. मंगळूर आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. बेळगांवी, हुबळी, म्हैसूर आणि कलबुर्गी येथे स्थानिक विमानतळे आहेत. हासन आणि कलबुर्गी येथे विमानतळ बांधण्यात आली आहेत.

H.A.L. येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ 34 की. मी. लांब देवनहळ्ळी येथे 24 मे 2008 मध्ये हलविण्यात आले. या विमानतळाचा उपयोग सध्या वैमानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी केला जात आहे. **'देवनहळ्ळी'** आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारतातील पहिले हरितक्षेत्र विमानतळ (Green Field Airport) आहे. हे विमानतळ सर्व अत्याधुनिक सोयींने युक्त आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## जलवाहतूक

कर्नाटकामध्ये अंतर्गत तसेच किनारपट्टीलगतचे जलमार्ग आहेत. त्यांची उपलब्धता मर्यादित आहे, म्हणून वाहतुकीच्या क्षेत्रात त्याचे महत्व कमी आहे. पूर्वी अंतर्गत जलवाहतूक फक्त छोट्या बोटी, डिंगी आणि तराफे यांच्या मार्फत होत असे. सध्या मोटार बोट अस्तित्वात आहेत. त्याचा वापर उडपी, उत्तर कन्नड आणि दक्षिण कन्नड या जिल्ह्यात केला जातो. या जिल्ह्यातील काळी, शरावती आणि नेत्रावती गंगावळी, चक्र, कोलूर, उद्यावर नद्या अंतर्गत जल वाहतुकीला सहाय्यक आहेत. काही ठिकाणी कृष्णा नदी ओलांडण्यासाठी मोटार बोटींचा उपयोग केला जात आहे. रस्ते आणि रेल्वेच्या वाहतूक विकासामुळे जलवाहतुकीचा वापर मर्यादित स्वरुपात आहे.

**बंदरे:** ज्या ठिकाणी बोटी येऊन थांबतात अथवा लागतात त्याला बंदर किंवा धक्का असे म्हटले जाते. जहाजांचा वापर मासेमारी, व्यापार, प्रवासी वाहतूक आणि मालाच्या वाहतुकीसाठी केला जातो. कर्नाटकाला 320 की.मी. किनारा लाभल्यामुळे येथे 23 लहान-मोठी बंदरे आहेत. बंदर विकास प्राधिकरणाची 1957 मध्ये स्थापना झाली. त्यानंतर जलवाहतुकीचा विस्तार होत गेला. 4 मे 1974 रोजी न्यू मंगळूरला देशातील 9 वे मोठे बंदर घोषित करण्यात आले. त्याला 'कर्नाटकाचे प्रवेशद्वार' असे म्हटले जाते. या बंदरातून कच्चे लोखंड, कॉफी, मसाले, काजू, चंदन, कौले, क्रोमाइट, ग्रॅनाइट, डबाबंद फळे आणि मासे निर्यात केले जातात. जहाजातून पेट्रोलियमची आयात केली जाते. मंगळूर बंदरासहित इतर तेरा लहान बंदरांचा, विकास झाला आहे. ते म्हणजे जुने मंगळूर बंदर, माल्पे, हंगरकट्टे, कुन्दापुर, पडुबिद्री, भटकळ, होन्नावर, तदडी, बेलेकेरी आणि कारवार होय. यापैकी कारवार हे अत्यंत सुंदर बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. या बंदराचा वापर बाराही महिने लोखंड, मॅंगनीज, ग्रॅनाईट आणि कृषी उत्पादने निर्यात करण्यासाठी केला जातो.

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. खेडयांना आणि नगरांना __________ जोडतात.
2. कर्नाटकात __________ या वर्षी रेल्वे सेवेला प्रारंभ झाला.
3. कर्नाटकाती जिल्हारस्ते __________ या जिल्हात जास्त आहेत.
4. __________ बंदराला 'कर्नाटकाचे प्रवेशद्वार' म्हटले जाते.
5. कर्नाटकातील किनार पट्टीवरील रेल्वे मार्गाला __________ असे म्हणतात.

**II. गटामध्ये चर्चा करा आणि खालीलप्रश्नांची उत्तरे लिहा :**

6. रस्ते वाहतुकीचे महत्त्व समजावून सांगा.
7. कर्नाटकातील विविध प्रकारच्या रस्त्यांची नावे सांगा.
8. हवाई वाहतुकीचे फायदे कोणते?
9. कर्नाटकातील बंदरांची नांवे सांगा.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**III. खालील जोड्या जुडवा :**

| अ | ब |
|---|---|
| i. सोनेरी चौपदरी सडक योजना | a) मंगळूरु, मुंबई |
| ii. शरावतीपुल | b) बेंगळूर |
| iii. आंतरराष्ट्रीय विमानतळ | c) N.H.44 |
| iv. कोंकण रेल्वे | d) विमानतळ |
| v. नम्म मेट्रो | e) रेल्वे मार्ग |
| | f) 1953 |

**IV. उपक्रम :**

1. कर्नाटकामधून जाणारे राष्ट्रीय मार्ग नकाशात दाखवुन त्यांची नांवे लिहा.

**V. योजना प्रकल्प :**

1. तुम्ही केलेल्या रेल्वे प्रवासाची माहिती लिहा.
2. तुमच्या स्थानिक वाहतूक पद्धतीबद्दल माहिती लिहा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

प्रकरण-29 वे

# कर्नाटकातील उद्योगधंदे

B5A4D1

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *कर्नाटकातील उद्योगांचे महत्व.*
- *कर्नाटकातील प्रमुख औद्योगिक प्रदेश.*
- *लोह पोलाद उद्योगाची उत्पादन क्षमता आणि विभागणी.*
- *कापड, साखर, सिमेंट व कागद उद्योग.*
- *बेंगळूरु - भारतातील प्रमुख माहिती तंत्रज्ञान आणि औद्योगिक केंद्र.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

देशातील कोणत्याही राज्याच्या त्वरित अभिवृद्धीसाठी उद्योगाची वाढ महत्त्वाची ठरते. आपल्या राज्यामध्ये उद्योगांच्या वाढीला मोठी संधी आहे. मुबलक खनिज संपत्ती, कच्चामाल, अनुकूल हवामान, पुरेसा पाणी पुरवठा, उत्तम वाहतूक व्यवस्था, कुशल कामगारवर्ग, विस्तृत बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञान या सर्व गोष्टीच्या उपलब्धतेमुळे कर्नाटक विविध प्रकारच्या उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. आमच्या राज्यात शेतीमालावर आधारित लघुउद्योगांपासून ते आधुनिक कारखान्यापर्यंत विविध उद्योगाची वाढ झाली आहे.

कर्नाटकात उद्योगधंद्याच्या वाढीसाठी सर्.एम्. विश्वेश्वरय्या यांचे योगदान उल्लेखनीय आहे. ''औद्योगिकरण नसेल तर विनाश'' या तत्त्वावर विश्वास ठेऊन त्यांनी आपल्या राज्यात अनेक उद्योगांचा पाया घातला. 1902 मध्ये शिवनसमुद्र येथे जलविद्युत् उत्पादन केंद्र सुरू झाल्यानंतर विविध मूलभूत व दैनंदिन गरजेच्या वस्तू तयार करणारे अनेक उद्योग अस्तित्वात आले. भातगिरण्या, फरशी बनविणारे कारखाने, बिडी, सिगारेट, लोखंड आणि पितळ भट्ट्या या उद्योगाची स्थापना झाली. 1923 नंतर राज्यात लोखंड आणि पोलाद कारखाने, साबणाचे कारखाने, रेशीम व सूतगिरण्या, कागद उद्योग, सिमेंट उद्योग, रंग, साखर, चंदनतेल उद्योग अशा अनेक आधुनिक उद्योगधंद्याची स्थापना झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात म्हैसूर प्रांतातील उद्योगांमुळे ते एक आदर्श राज्य बनले होते. याचे मुख्य कारण म्हणजे ब्रिटिश आणि म्हैसूरच्या राजांनी उद्योगांच्या बाबतीत दाखविलेली आसक्ती होय.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर केंद्र सरकारचे औद्योगिक धोरण राज्यातील कारखान्यांच्या प्रगतीसाठी अनुकूल होते. याचा परिणाम म्हणून अनेक नव्या उद्योगधंद्याची स्थापना झाली.

ते म्हणजे विमान कारखाना, इंजिनियरिंग उद्योग, मशीन टूल्स (HMT, BEL, BHEL) घड्याळे, लोखंड आणि पोलाद, ॲल्युमिनियम, माहिती व तंत्रज्ञान, विद्युत परमाणु (इलेक्ट्रॉनिक्स) आणि जैवतंत्रज्ञान (Bio-Technology) उद्योग वगैरे.

**लोह आणि पोलाद उद्योग :**

दक्षिण भारतातील लोह आणि पोलाद उद्योग स्थापन करणारे प्रथम राज्य बनण्याचा मान कर्नाटकाने मिळविला आहे. सर.एम. विश्वेश्वरय्या यांच्या दूरदृष्टीमुळे बाबाबुडणगिरी टेकड्यातील उत्तम आणि विपुल प्रमाणात मिळणाऱ्या कच्चा लोखंडाच्या साठ्यामुळे 1923 मध्ये शिमोगा जिल्ह्यातील भद्रावती येथे लोह आणि पोलाद उद्योगाची स्थापना झाली. हा कर्नाटकतील लोह आणि पोलद उद्योग आहे. म्हैसूर आयर्न अँड स्टील इंडस्ट्रीज लिमिटेड (MISL-Mysore Iron and Steel Industries Limited) असे म्हणत होते. 1989 मध्ये ज्यावेळी स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड (SAIL-Steel Authority of India Limited) कडे याचे हस्तांतरण करण्यात आले तेव्हापासून तो कारखाना विश्वेश्वरय्या लोह आणि पोलाद उद्योग (VISL-Vishveshwaraiah Iron and Steel Limited) म्हणून ओळखला जातो. या उद्योगासाठी आवश्यक असलेले कच्चे लोखंड केम्मनगुडी येथून, चुनखडी बंडिगुड्डा येथून, पाणी भद्रा नदीतून तर मॅगनीज सोंडूर येथून पुरवले जाते. प्रारंभी भट्टी पेटविण्यासाठी जळावू लाकडांचा वापर करत होते. शरावती येथील जलविद्युत निर्मिती केंद्र सुरू झाल्यावर जलविद्युत शक्तीचा आता वापर केला जात आहे. सध्या येथून विशिष्ट प्रकारचे पोलाद, ओतीव लोखंडाचे (बिडाचे) उत्पादन केले जात आहे. कर्नाटकातील आणखी एक प्रमुख लोह पोलाद उद्योग म्हणजे खाजगी क्षेत्रातील जिंदाल विजयनगर स्टील लिमिटेड होय. 2001 मध्ये अत्याधुनिक कोरेक्स (Corex) तंत्रज्ञानाचा वापर करून बळ्ळारी जिल्ह्यातील तोरंगल येथे याची स्थापना झाली. येथे लोखंड व पोलादाचे उत्पादन केले जाते.

**सुती वस्त्रोद्योग :**

आधुनिक उद्योगधंद्यामध्ये सुती वस्त्रोद्योग हा एक असून राज्यात फार पूर्वीपासून याची स्थापना झाली आहे. हा शेतीवर आधारित उद्योग आहे. प्राचीन काळापासून कर्नाटकात हातमागावर कापड विणणे हा उद्योग चालू होता. आजसुध्दा हातमाग उद्योग सुरू आहेत. कृत्रिम धाग्यापासून बनविलेले कापड, विदेशी सुती कपडे उत्पादित केले जात असतानाही सुती वस्त्रांना राज्यात आजही मोठी मागणी आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

19 व्या शतकाच्या अखेरीस आधुनिक कापड उद्योगाची स्थापना झाली. कापसापासून सरकी काढणे व कापूस पिंजण्याचा उद्योग (Ginning Mill) कापसाच्या धाग्यापासून कापड विणण्याचा उद्योग (Spinning Mill) उत्तरेकडील जिल्ह्यात सुरु झाले. सर्वात प्रथम इ.स. 1884 मध्ये गुलबर्गा येथे एम.एस.के. सूतगिरणी स्थापन झाली. त्यानंतर हुबळी येथे सुती वस्त्रोद्योग प्रारंभ झाला. इ.स. 1900 नंतर मोठ्या सुती वस्त्रोद्योगांची स्थापना झाली. त्यामध्ये बेंगळूर मधील बिन्नी मिल, मिनर्व्हा मिल, म्हैसूर येथील के.आर. मिल, दावणगेरे येथील कॉटन मिल वगैरे उद्योगांची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात झाली होती.

स्वातंत्र्यानंतर उत्तरे कडील पठारी प्रदेशात जेथे मुबलक कापूस पिकतो तेथे सुती वस्त्रोद्योग स्थापन झाले. दावणगेरे हे राज्यातील अतिमहत्त्वाचे कापड उत्पादन केंद्र बनले. त्याला 'कर्नाटकाचे मँचेस्टर' म्हणतात. हुबळी, इलकल, गुळेदगुड्ड, रबकवी, बागलकोट, मोणकालमुरु, गदग, बेटगेरी, बदामी, बेळगावी, नरगुंद, गोकाक, बळ्ळारी, नंजनगुड, पेरियापट्टण, चामराजनगर येथे ही कापूस पिंजण्याचे (Ginning) आणि कापड विणण्याचे उद्योग स्थापित झालेले आहेत. सध्या राज्यामध्ये 44 सुती वस्त्रोद्योग आहेत. तेथे वार्षिक सरासरी 5.1 दशलक्ष मीटर सुती कापडाचे उत्पादन होते.

अलिकडच्या काही काळात काही सुतगिरण्या बंद पडल्या आहेत. याला कारण म्हणजे कापसाची कमतरता, जुनाट यंत्रे, विद्युतशक्तीचा अभाव, वाढता उत्पादन खर्च, कृत्रिम धाग्यापासून बनविलेले कापड, उत्पादकातील स्पर्धा वगैरे होय.

कर्नाटकातील सुती वस्त्रोद्योगांची परिस्थिती सुधारण्यासाठी राज्य सरकारने सुवर्ण वस्त्रोद्योग धोरण 2008 - 13 ही योजना प्रारंभ करुन 11 जिल्ह्यांमध्ये तयार कपड्यांचे पार्क (Finished Goods Parks) स्थापन केले आहेत. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे या उद्योगांमध्ये तयार झालेला पक्कामाल परदेशी निर्यात करणे हा होय. सुती कापड निर्यातीमध्ये कर्नाटकाचा देशात दुसरा क्रमांक लागतो. अशा प्रकारचे उद्योग दोड्डबळ्ळापूर, आनेकल, बेळगावी, म्हैसूर, रामनगर येथे आहेत.

**साखर उद्योग :**

साखर उद्योग हा कर्नाटकातील मोठ्या प्रमाणातील प्रमुख उद्योगधंद्यापैकी एक आहे. हा सुद्धा शेतीवर आधारित उद्योग आहे. याच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले स्थायीकरणाचे घटक राज्यामध्ये पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. उदा: ऊस उत्पादन, उत्तम हवामान, विद्युत पुरवठा, स्थानिक बाजारपेठ, वाहतूक व्यवस्था इत्यादी. हा उद्योग कर्नाटकच्या आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

श्रीरंगपट्टणमधील पालळ्ळी (अष्टग्राम) आणि चिक्कबळ्ळापूर येथे साखरेचे उत्पादन होत असल्याचा उल्लेख सर फ्रान्सिस बुकानन यांनी केला आहे. इ.स.1847 पासूनच या शहरात साखरेचे उत्पादन होत असून लंडन येथील वस्तुप्रदर्शनात भाग घेऊन बक्षिस मिळविल्याचे पुरावे आढळतात.

सर्वात पहिला आधुनिक साखर कारखाना 1933 मध्ये मंड्या येथे म्हैसूर साखर कंपनी या नावाने सुरू झाला. 1951 पर्यंत हा एकच कारखाना होता. आता राज्यामध्ये एकूण 71 साखर कारखाने आहेत. भारतात एकूण वार्षिक उत्पादन कर्नाटकात 16% साखरेचे उत्पादन होते. साखर उत्पादनात कर्नाटकाचा देशात तिसरा क्रमांक लागतो.

**विभागणी:** कर्नाटकातील साखर कारखाने विशेषतः ऊस उत्पादक प्रदेशात विभागले आहेत. कावेरी, कृष्णा आणि तुंगभद्रा नद्यांच्या पाणलोट क्षेत्राच्या जिल्ह्यामध्ये हे कारखाने केंद्रित झाले आहेत. बेळगांव आणि बागलकोट जिल्ह्यात सर्वाधिक साखर कारखाने आहेत. त्यानंतर मंड्या, म्हैसूर, बीदर, विजापूर, गुलबर्गा, बळ्ळारी आणि दावणगिरी हे जिल्हे प्रामुख्याने येतात.




ऊसाचा चोथा (भुसा) व काकवी हे साखर उद्योगातील उपपदार्थ आहेत. उसाचा चोथा कागद तयार करण्यासाठी व इंधन म्हणून वापरतात. काकवी (Molasses) ही मद्य निर्मितीसाठी वापरली जाते.

**तुम्हाला हे माहिती असुद्या**

कर्नाटकातील साखरनगर - मंड्या

कर्नाटकातील साखरेचा जिल्हा - बेळगाव

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कागद उद्योग :**

आधुनिक जगात कागद ही अत्यंत महत्त्वाची वस्तू झाली आहे. शिक्षण, मुद्रण, वृत्तपत्रे आणि संस्कृतीच्या विकासासाठी ही अत्यावश्यक बाब आहे. कागद उद्योग हा अरण्यांवर अवलंबून असतो. या उद्योगासाठी बांबू, लाकडाचा लगदा, गवत, ऊसाचा चोथा, कापडाच्या चिंध्या, रद्दी कागद यांचा कच्चा माल म्हणून वापर करतात. सर्वात प्रथम कर्नाटकातील शिमोगा आणि चिक्कमगळूर जिल्ह्यातील घनदाट अरण्यांचा विचार करून भद्रावती येथे 'म्हैसूर पेपर मिल लिमिटेड' हा कारखाना 1936 मध्ये प्रारंभ झाला. त्यानंतर 'वेस्ट कोस्ट पेपर मिल' या खाजगी कंपनीची दांडेलीमध्ये स्थापना झाली. जवळच्या अरण्यातील बांबू, निलगिरीच्या झाडाच्या लाकडाचा लगदा, काळी नदीचे पाणी व जोग फॉल्स मधून विद्युत शक्तीचा पुरवठा या मिलला होतो. याशिवाय नंजनगुड, कृष्णराजनगर, सत्यगाल, मुंडगोड, मुनिराबाद, येडीयूर आणि बेंगळूरु येथे राज्यातील इतर कागद उद्योग स्थापन झाले आहेत. देशातील कागद उत्पादन करणाऱ्या राज्यांमध्ये कर्नाटकाचा चौथा क्रमांक लागतो. कर्नाटकात प्रतिवर्षी सुमारे 3.6 लक्ष टन कागदाचे उत्पादन होते.

**सिमेंट उद्योग :**

कर्नाटकात शहरीकरण आणि औद्योगिकरणात वाढ झाल्यामुळे सिमेंटची मागणी वाढली आहे. घरबांधणी, मोठमोठ्या इमारतीचे बांधकाम, रस्ते, पूल, धरणे यासाठी सिमेंट आवश्यक आहे.

सिमेंट उद्योगासाठी आवश्यक असणारी चुनखडी राज्यात विपुल प्रमाणात आढळते. त्याबरोबरच जिप्सम आणि बॉक्साईट सुद्धा उपलब्ध आहे. फक्त कोळसा मात्र शेजारच्या राज्यातून आयात करावा लागतो. पाण्याची उपलब्धता, वाळू, वाहतूक व्यवस्था, विद्युत पुरवठा, चिकणमाती, विस्तृत बाजारपेठ, या गोष्टीसुद्धा सिमेंट उद्योगाच्या वाढीसाठी अनुकूल आहेत.

> **उपक्रम :**
> *तुमच्या जवळच्या कारखान्याला भेट देऊन कारखान्यासाठी कच्चामाल कसा मिळविला जातो. याचा अभ्यास करा.*

1939 मध्ये राज्यातील पहिला सिमेंट उद्योग भद्रावती येथे स्थापन झाला. त्यानंतर बागलकोट, तुमकूर जिल्ह्यातील अम्मसंद्र, कलबुर्गी जिल्हातील शहाबाद येथे सिमेंट उद्योग स्थापन झाले. इतर सिमेंट उद्योगाची केंद्रे म्हणजे वाडी, लोकापुर, इट्टिगेहळ्ळी, मडकेरी, कांचीपूर, कलादगी, कुरकुंट, सेडम आणि चित्तापूर येथे कारखाने आहेत. कर्नाटकाचा सिमेंट उत्पादनात मोठा वाटा आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**माहिती तंत्रज्ञान उद्योग :**

कर्नाटक हे भारतातील प्रमुख माहिती व तंत्रज्ञानाचे केंद्र आहे. त्यामुळेच येथे माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगाची मोठ्या प्रमाणात अभिवृद्धी झाली आहे. अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये, संशोधन केंद्रे, संगणकावर आधारित तंत्रज्ञान अभ्यासक्रम हे मोठ्या प्रमाणात असल्यामुळे विपुल आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे. याचा परिणाम म्हणून अनेक सॉफ्टवेअर (तंत्रांश) उद्योगांची येथे स्थापना झाली आहे आज कर्नाटक भारतामध्ये अत्युच्य स्थानावर आहे.

**बेंगळूरुः भारतातील सर्वात महत्त्वाचे माहिती आणि तंत्रज्ञान केंद्र :**

बेंगळूरु हे भारताची 'सिलिकॉन व्हॅली' (IT-BT) शहर म्हणून प्रसिद्धीस आले आहे. सॉफ्टवेअर (तंत्रांश) किंवा संगणक प्रोग्रॅमिंगसाठी उपयोगी पडणाऱ्या सामुग्रीचे उत्पादन व निर्यात करण्यामध्ये बेंगळूर प्रथम स्थानी आहे. हे जगातील दहा प्रमुख, प्रगत तंत्रज्ञान Hi-Tech असलेल्या शहरांपैकी एक शहर आहे. त्यामुळेच याच्या आजूबाजूच्या शहरात सुद्धा सॉफ्टवेअर उद्योग पसरलेले आहेत. या एकाच शहरामध्ये 1200 IT (माहिती तंत्रज्ञान) आणि BT (जैव तंत्रज्ञान) उद्योग असून 4 लाखाहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. जगातील खूप प्रसिद्ध अशा कंपन्यांनी बेंगळूर शहरात आपल्या शाखा स्थापन केल्या आहेत. याला कारण म्हणजे येथील उत्तम हवामान, विद्युत पुरवठा, तंत्रज्ञानातील तज्ञ, अर्थसहाय्य, विस्तृत बाजारपेठा आणि मूलभूत सोयी सुविधांमुळे बेंगळूर हे भारतातील प्रतिष्ठित, प्रगत माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणून उदयास आले आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

राज्य सरकारने अनेक शासकीय कामकाजाचे संगणकीकरण केले आहे. आज संगणकाचा वापर महसूल वसुलीच्या नोंदी, मालमत्तेची नोंदणी, इमारती बांधकामाचा आराखडा आणि विविध प्रकारचे प्रकल्प तयार करणे, शिक्षण आणि व्यापार, व्यवस्था यामध्ये केला जात आहे.

बेंगळूरु मध्ये इन्फोसिस, विप्रो अशा काही प्रतिष्ठित कंपन्या आहेत. त्यांच्या शाखा राज्यातील इतर शहरांमध्येही स्थापन झाल्या आहेत. उदाः म्हैसूरु, हुबळी, कलबुर्गी, शिमोगा, तुमकूरु, मंगळूरु इ. मानव साधन संपत्तीची माहिती, नेमणुका, प्रशिक्षण, अभ्यासक्रम अशा गोष्टी समजण्यासाठी हे उद्योग जास्त उपयुक्त आहेत.

**कर्नाटकातील औद्योगिक क्षेत्रे :**

राज्यामध्ये कारखान्यांनी व्यापलेल्या प्रदेशानुसार कर्नाटकाची पाच औद्योगिक क्षेत्रामध्ये विभागणी केली आहे. ती म्हणजे-

1. बेंगळूरु, कोलार, तुमकुरु औद्योगिक क्षेत्र हा सर्वात जास्त उद्योगधंदे असणारा विभाग आहे.
2. बेळगावी-धारवाड क्षेत्र.
3. दक्षिण कन्नड-उडपी औद्योगीक क्षेत्र
4. बळ्ळारी-रायचूर-कोप्पळ जिल्हा औद्योगिक क्षेत्र.
5. म्हैसूर-मंड्या औद्योगिक क्षेत्र.

## स्वाध्याय

**I. योग्य शब्दांसह रिक्त जागा भरा:**

1. कर्नाटकातील पहिला लोह आणि पोलाद उद्योग __________ येथे स्थापन झाला.
2. 'कर्नाटकचे मँचेस्टर' म्हणजे __________.
3. __________ येथे वेस्ट कोस्ट पेपर मिल आढळते.
4. अम्मसंद्रामध्ये __________ हा उद्योग आहे.
5. 'सिलिकॉन व्हॅली' असे __________ या शहराला म्हणतात.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा:**

6. कागद उद्योगासाठी लागणारा कच्चामाल कोणता ?
7. कर्नाटकातील लोह आणि पोलाद उद्योगाचे वर्णन करा?
8. सुती वस्त्रोद्योगांच्या विभागणीबद्दल थोडक्यात माहिती लिहा.
9. कर्नाटकातील औद्योगीक क्षेत्राचा उल्लेख करा.
10. बेंगळूर मधील माहिती-तंत्रज्ञान उद्योगाच्या केंद्रीकरणाची कारणे सांगा.

**III. जोड्या जुळवा :**

| अ | ब |
|---|---|
| i. भद्रावती | a) म्हैसुर साखर कारखाना |
| ii. तोरंगल | b) औद्योगीक तोटा |
| iii. सर्. एम. विश्वेश्वरय्या | c) कागद म्हैसूर पेपर मिल लिमीटेड |
| iv. मंड्या | d) राज्यातील कापड उद्योग |
| | e) जिंदाल विजयनगर स्टिल लिमीटेड |

**IV. उपक्रम:**

1. तुमच्या क्षेत्रातील औद्योगीक जिल्हांची माहीती गोळा करा.

***

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण-30 वे

# कर्नाटकातील प्रमुख पर्यटन केंद्रे

W1F5Z2

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *कर्नाटकातील नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या पर्यटन केंद्रांचा परिचय व त्यांचे महत्त्व.*
- *प्रमुख प्रेक्षणीय स्थळाचे वर्णन, त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्व.*
- *प्रमुख टेकड्या, धबधबे आणि ऐतिहासिक ठिकाणे.*

''देश पहा आणि कोश वाचा'' अशी एक म्हण आहे. लोक आपल्या कुतूहलापोटी, धार्मिक कृत्यासाठी, मनःशांतीसाठी, विहारासाठी सुंदर नयनरम्य ठिकाणे पाहण्यासाठी, आनंद मिळविण्यासाठी, आरोग्य वृद्धीसाठी आपल्या ठिकाणाहून योग्य स्थळी जाऊन फिरून परत येतात. यालाच पर्यटन म्हणतात. आधुनिक जगात प्रवास करणे ही गोष्ट मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. प्रवासामुळे आपल्याला त्या ठिकाणाची माहिती, तेथील संस्कृती, नागरिकत्व आणि राहणीमानाची पद्धत हे समजून घेण्यास मदत होते.

भारतातील अनेक प्रेक्षणीय स्थळे असलेल्या प्रसिद्ध राज्यांपैकी कर्नाटक हे एक राज्य आहे. कर्नाटकात निसर्ग सौंदर्यानी नटलेली अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. सदाहरित सह्याद्री पर्वत रांगा, येथील नद्या व धबधबे, अतिसुंदर दऱ्या, जंगली प्राणी, चंदनाची जंगले वगैरे गोष्टी आहेत. सुंदर समुद्रकिनारे, ऐतिहासिक ठिकाणे, शिल्प सौंदर्याने नटलेली देवस्थाने, विविध धार्मिक केंद्रे, देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करतात. याचे महत्त्व जाणून कर्नाटकातील प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी कर्नाटक सरकारने 1971 मध्ये 'कर्नाटक राज्य पर्यटन विकास महामंडळ' (KSTDC-Karnataka State Tourism Development Corporation) स्थापन केले आहे. पर्यटकाना मूलभूत सोई उपलब्ध करून देण्यासाठी यात्रीनिवास, प्रवासी गृह, उपहार गृह इत्यादींची व्यवस्था मुख्य प्रेक्षणीय स्थळांच्या ठिकाणी केली आहे.

कर्नाटक हा 'पर्यटकाच्या स्वर्ग' असून तेथील अनेक वैविध्यपूर्ण सुंदर ठिकाणे लाखो पर्यटकांना आकर्षित करतात. यूनोस्कोने हंपी, पट्टदकल पश्चिम घाटातील बेलूर, हळेबीडू आणी सोमनाथपुर येथील होयसला मंदिराना जागतिक वारसा लाभलेली ठिकाणे म्हणून मान्यता दिली आहे. यामुळे जगभरात कर्नाटक प्रसिद्धीस आले आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कर्नाटक सरकारने नूतन पर्यटन धोरण 2024-29 अमंलात आणून खाजगी प्रवासी कंपन्यांनाही पर्यटन क्षेत्रात संधी व प्रोत्साहन दिले आहे. 1996 -97 मध्ये कर्नाटकाला 'उत्तम पर्यटन व्यवस्थापनाचे राज्य' म्हणून पुरस्कार मिळाला आहे.

**खाली नमूद केलेली ही प्रसिद्ध पर्यटन केंद्रे आहेत :**

**कर्नाटकातील थंड हवेची ठिकाणे:**

कर्नाटक हा पुष्कळ अती उंच पर्वतश्रेणी आणि भौगोलीक वैशिष्ट्यांनी समृद्ध असा भाग आहे. त्यामुळे येथे अनेक थंड हवेची ठिकाणे दिसून येतात. चिक्कमंगळूर जिल्ह्यातील कुद्रेमुख हे मुख्य थंड हवेचे ठिकाण आहे. त्याच्या भोवती हिरव्या वनश्रेणीने नटलेली घनदाट अरण्ये, टेकड्या, कॉफीचे मळे, धबधबे असल्यामुळे हे रमणीय ठिकाण बनले आहे.

चिक्कबळ्ळापूर जिल्ह्यातील नंदी हे थंड हवेचे ठिकाण. समुद्र सपाटीपासून सुमारे 1492 मीटर उंचीवर असून तेथे अल्हादायक थंड हवामान आहे. हे स्थळ बेंगळूर पासून जवळ असल्यामुळे लाखो पर्यटक तिकडे आकर्षित होतात. येते निवास व भोजनाची उत्तम व्यवस्था आहे. महात्मा गांधी आपले आरोग्य सुधारण्यासाठी येथे राहील्यामुळे तेथे गांधी भवन निर्माण केले आहे.

अशाच प्रकारे बिळीगिरीरंगनबेट्टा, अगुंबे येथील सूर्यास्त पहाण्याचे ठिकाण, केम्मनगुंडी, देवनारायणदुर्ग चित्रदुर्ग, जिल्हातील जोगी टेकड्या, कोडचाद्री, हिमवद गोपालस्वामी टेकड्या, रामनगर मधिल रॉकी टेकड्या, अंखड दगडतील मधुगिरी टेकडी, याण येथील चित्तवेधक विविध आकाराचे खडक ,मडकेरी वगैरे उन्हाळ्यातील थंड हवेची ठिकाणे असून बऱ्याच पर्यटकांना आकर्षित करतात.

**कर्नाटकातील धबधबे:**

आमचे राज्य हे अनेक धबधब्याचे माहेर आहे. नदीचे पाणी जेंव्हा खडकावरून वाहते आणि उंचावरून खाली कोसळते तेंव्हा त्याला धबधबा म्हणतात. उत्तर कन्नड जिल्ह्यात धबधब्याची संख्या अधिक आहे.

भारतातील सर्वात उंच धबधबा शिमोगा जिल्ह्यातील जोगचा धबधबा आहे. सुमारे 253 मीटर उंचीवरून शरावती नदी वरून चार वेगवेगळ्या प्रवाहाच्या रूपात येतो. राजा, राणी, रोअर, व रॉकेट अशी नांवे आहेत. पावसाळ्यामध्ये या धबधब्यास भरपूर पाणी असते त्यामुळे अविस्मरणीय सौंदर्याचे दर्शन घडते.

कावेरी नदीने मंड्या जिल्ह्यातील शिवनसमुद्र जवळ गगनचुक्की आणि भरचुक्की हे जुळे धबधबे निर्माण केले आहेत. मडकेरी जवळ सुंदर असा अब्बी धबधबा आहे. केम्मनगुंडी

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

येथील थंड हवेच्या ठिकाणी हेब्बे धबधबा आहे. या व्यतिरिक्त, उत्तर कन्नड जिल्हातील उंचळ्ळी धबधबा, बेळगांवी जिल्हामधील गोकाकचा धबधबा आहे. हा धबधबा घटप्रभा नदीवर आहे. याला 'कर्नाटकचा नायगारा' म्हणतात.

**कर्नाटकातील वन्यजीव अभयारण्ये:**

कर्नाटक हा घनदाट व हिरव्यागार अरण्यांनी व्यापलेला प्रदेश आहे. अरण्ये आणि जंगली प्राण्यांच्या संरक्षणासाठी कर्नाटक सरकारने अनेक अभयारण्ये, पक्षीधाम, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प, Tiger Reserves जैववैविध क्षेत्रे स्थापन केली आहेत.

**उपक्रम:**

**हे तुम्हाला माहीत असू द्या**

*आपल्या गावाबद्दल जाणून घेऊया. आमच्या राज्यातील प्रत्येक ठिकाणाला त्याचे स्वतःचे महत्त्व आहे. तुमच्या वडीलधाऱ्या कडून तेथील महत्त्व जाणून घ्या.*

कर्नाटकात पाच राष्ट्रीय उद्याने आहेत. ती म्हणजे नागरहोळे येथील 'राजीव गांधी राष्ट्रीय उद्यान', बंडीपुर, बंनेरुघाट, कुद्रेमुख आणि अणशी राष्ट्रीय उद्यान.

जंगली प्राण्यांना त्यांच्याच नैसर्गिक मूल स्थानामध्ये संरक्षणासाठी 36 वन्यजीव धाम शोधून काढले आहेत. म्हणजे - मेलुकोट वन्यजीव अभयारण्य, कावेरी वन्यजीवन अभयारण्य, मुकांबिका वन्य जीव अभयारण्य, कप्पाटागुड्डा वन्यजीव अभयारण्य, जोगीमट्टी वन्यजीव अभयारण्य, भिमगड वन्यजीव अभयारण्य, चिंचोली वन्यजीव अभयारण्य, तलकावेरी वन्यजीव अभयारण्य अनशी राष्ट्रीयउद्यान इत्यादी.

कर्नाटकात सुंदर असे सागरी किनारे आहेत. ते म्हणजे गोकर्ण येथील ओम बीच उळ्ळाल बीच, मुर्डेश्वर, मरवंते, माल्पे बिच इत्यादी. हे बिच असंख्य पर्यटकांचे आकर्षन ठरले आहेत.

उडपी जवळील सेंट मेरीज बेटावरील वैशिष्ट्यपूर्ण स्तंभाप्रमाणे असलेले नैसर्गिक खडक हे अत्यंत मनोहर आहेत. मुर्डेश्वराचे नेत्राणी बेट, कारवार जवळ देवगड व कुर्मगड ही दोन बेटे आहेत.

**ऐतिहासिक स्थळे:**

कर्नाटकातील राज्यकर्ते कदंब, होयसळ, चालुक्य, विजयनगरचे राजे यांनी आपल्या स्मृती शिल्पसौंदर्याच्या सुंदर स्थापत्य कलेच्या रूपात मागे ठेवल्या आहेत. त्या म्हणजे

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

हंम्पी बेलुर, हळेबिड, सोमनाथपुर, बदामी, पट्टदकल, ऐहोळे, विजयपूरचा (विजापूर) गोल घुमट, लक्कुंडी, बनवासी, बसराळू, बळ्ळीगाळे, म्हैसूर, श्रीरंगपट्टण, विजापूर वगैरे यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्याती लाभली आहे.

**यात्रा स्थळे:**

> **कृती**
> *तुमच्या गावातील व आजूबाजूच्या परिसरातील देवालये व ऐतिहासिक स्मारकाची माहिती संग्रह करा.*

कर्नाटकामध्ये अनेक यात्रा स्थळे आहेत. धर्मस्थळ, उडपी, शृंगेरी, व्हरनाडू, कोल्लूर, गोकर्ण, उळवी, शिर्शी, श्रवणबेळगोळ, कुडलसंगम, मेलुकोटे, आदीचुंचनगिरी, कार्कळ, देवरगुड्डु, मैलारक्षेत्र, गुलबर्गा येथील बंदेनवाज दर्गा, विजयपुरचा इब्राहिम रोजा, सिरा येथील मल्लीक रहान दर्गा, म्हैसूर येथील सेंट फिलोमिना चर्च, मंगळूरचे रोजारियो कैथेड्रल चर्च इत्यादी.

**कर्नाटकातील किल्ले:**

> **उपक्रम**
> *तुमच्या शालेय स्तरावर जिल्हा दर्शनाची व्यवस्था करा आणि जिह्यातील महत्वाच्या पर्यटन केंद्रां ची नांवे लिहा*

अनेक ऐतिहासिक व बळकट किल्ला कर्नाटकामध्ये असून ही पर्यटकांची आकर्षण केंद्रे आहेत. बीदरचा किल्ला, विजयपूर किल्ला, कलबुर्गी किल्ला, विजयनगरचा (हंपी) किल्ला, केळदी किल्ला, चित्रदुर्ग किल्ला, मधुगिरी किल्ला, नंदीहिल्स, पावनगड, मंजराबाद, उचंगीदुर्ग, कवळेदुर्ग, परसगड, श्रीरंगपट्टण, किनारपट्टीवरील किल्ला, बहादूरगड, बसवराज दुर्ग, देवगड, कुर्मगई इत्यादी आहेत.

वर उल्लेखिलेल्या सर्व प्रेक्षणीय ठिकाणांनी कर्नाटकाच्या वैभवात भर टाकली आहे. कर्नाटकाची राजधानी बेंगळूरु शहर अलीकडच्या काळात पर्यटकांना आकर्षूण घेत आहे. येथील उत्तम हवामान, विधानसौध सारखी सुंदर वास्तु, कब्बन पार्क, लालबाग सारखी अनेक सुंदर उद्याने असून याला 'उद्यान नगरी' म्हणून ओळखतात. हे कर्नाटकातील सर्वात मोठे शहर असून देशातील महानगरांपैकी एक आहे.

म्हैसुर हे अंबाविलास पॅलेस, जगमोहनपॅलेस येथे अनेक सुंदर राजवाडे आहेत. येथील दसरा उत्सवाच्या वेळी देश-विदेशातील लाखो लोक भेट देतात. चामुंडी टेकडी, बैलुकोप्पे, कृष्णराजसागर, वृंदावन ही प्रमुख प्रेक्षणीय ठिकाणे आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. नंदी हिल ____________ या जिल्ह्यात आहे.
2. अब्बी धबधबा ____________ या शहराजवळ आहे.
3. 'कर्नाटकाचा नायगारा' असे ____________ धबधब्याला म्हणतात.
4. गोकर्ण जवळ ____________ हे बीच आहे.
5. 'राजवाड्याचे शहर' असे ____________ ला म्हणतात.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

6. प्रवास करण्यामागचे विविध उद्देश कोणते?
7. युनोस्कोच्या जागतीक वारसा यादीत कर्नाटकातील कोणती स्थळे समविष्टे आहेत?
8. बेंगलूर मधील प्रक्षनिय स्थळांची नांवे सांगा?
9. कर्नाटकातील प्रमुख धबधब्याची नावे सांगा?
10. कर्नाटकातील अभयारण्यांची नावे लिहा.
11. कर्नाटकातील ऐतिहासिक महत्व असलेल्या ठिकाणांची नावे लिहा.

**III. जोड्या जुळवा :**

| अ | ब |
|---|---|
| i. बिळिगिरी रंगन बेट्ट | a) राजीव गांधी राष्ट्रीय उद्यान |
| ii. गांधीभवन | b) चामराजनगर जिल्हा |
| iii. नागर होळे | c) सेंटमेरी बेंट |
| iv. म्हैसूर | d) नंदी टेकडी |
| v. उडपी | e) चामुंडी टेकडी |
| | f) मयूरधाम |

**IV. उपक्रम प्रकल्प :**

1. कर्नाटकातील थंड हवेच्या ठिकाणांची यादी करा.
2. कर्नाटकातील प्रमुख प्रेक्षणीय स्थळांना भेट देऊन तेथील अनुभव लिहा.

**V. योजना :**

1. प्रवासी स्थळाचा चित्र संग्रह करून अल्बम तयार करा.

***

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**अर्थशास्त्र**

**प्रकरण-31 वे**

S7H4S3

# पैसे आणि कर्ज

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल:**
- *पैशाचे महत्त्व, कार्य आणि विकास.*
- *देशी बँक आणि कर्जाचे प्रकार.*
- *बँकाच्या विकास आणि त्यांचे प्रकार.*
- *निरनिराळ्या प्रकारच्या ठेवी.*
- *भारताची मध्यवर्ती बँकेची स्थापना आणि कार्य.*

पैसा हा मानवाचा अद्भूत आविष्कार आहे. ज्यामुळे दैनंदिन व्यवहार सोपा होतो. वस्तू आणि सेवाची किंमत करता येते. भविष्यात व्यवहार करता येतात. आपण असेही म्हणू शकतो की, पैशाच्या शोधामुळे माणसाची व्यवहारी बाजू अस्तित्वात आली.

पैशापासून वस्तू व सेवा विकत घेता येतात. पैशाने रक्कम फेडता येते, मोजता येते, आणि साठवता येते. राबर्ट सनच्या मतानुसार पैसा ही अशी वस्तू आहे की, जी सर्वत्र स्वीकारली जाते. वस्तू बद्दल वापरली जाते. किंवा व्यापार विषयक इतर बंधने झुगारली जाऊ शकतात.

मनी (Money) हा इंग्रजी शब्द पैशाचा समानार्थी शब्द आहे. आणि तो रोमन भाषेतील मोनेटा जुनो (Moneta Juno) पासून घेतलेला आहे. भारतीय रुपया संस्कृतमधील 'रूप्या' शब्दापासून घेतलेला आहे. (रूप्या) म्हणजे चांदी.

**पैशाचा विकास:** आज आपण पैसा म्हणून कागदी नोटा, नाणी वापरतो पण पैशाची ही अवस्था एका रात्रीत घडून आलेली नाही. या अवस्थेपर्यंत येण्यासाठी हजारो वर्षे उलटली. पैशाच्या विकासाचे अनेक टप्पे आहेत. सर्वात पुरातन आणि पहिला टप्पा म्हणजे वस्तुविनिमय पद्धत. आता आपण पैशाच्या विकासाच्या निरनिराळ्या टप्यावर चर्चा करूया.

**वस्तू विनिमय पद्धत:** अगदी प्राथमिक अवस्थेत लोक वस्तूंच्या बदल्यात वस्तू देत व घेत होते, पैशाचा वापर केला जात नव्हता. ही पद्धत अतिशय आवघड होती. त्यासाठी फारच वेळ व श्रम खर्च होई. उदाहरण- 'अ' कडे गाय आहे, त्यास शेळी हवी आहे. त्यासाठी त्याला अशी एखादी व्यक्ती शोधावी लागेल की, ज्याला गाय तर हवी आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पण त्याच्याकडे त्या ऐवजी शेळी द्यायची आहे. सरतेशेवटी समजा 'अ' ला अशी व्यक्ती आढळली तर आणखी एक प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे गाईच्या बदल्यात किती शेळ्या द्यायच्या. म्हणून वस्तुविनिमय पद्धतीत अनेक तोटे होते. जसे दोघांना एकाच प्रकारची गरज असणे, किंमत कशी ठरवायची, वस्तूचे लहानात लहान गोष्टीत रूपांतर न करता येणे, ठेवण्याची अडचण इत्यादी. यानंतरचा टप्पा होता वस्तूरुपी पैशांचा.

**वस्तूरुपी पैसा:** ठराविक आकाराची आणि वजनाची वस्तू पैसे म्हणून स्वीकारली जाते आणि प्रत्येक वस्तू त्या प्रमाणित वस्तूने मोजली जाते. वेगवेगळ्या अर्थ व्यवस्थेत वेगवेगळ्या वस्तूंना पैसा म्हणून वापर केला जात असे. उदा. ग्रीसमध्ये गुरेढोरे, रोममध्ये शेळी, चीनमध्ये दात इत्यादी. हिशेबलेखनाचे घटक म्हणून पैशाची ओळख जरी झाली असली तरी वस्तूविनिमय पद्धती मधील समस्यांचे निवारण झाले नाही.

**धातूरुपी पैसा:** धातूचे पैसे विशेषतः मौल्यवान धातू सोने, चांदी, तांबे, मिश्र धातू वापरले जायचे. विनिमय माध्यम म्हणून सोने आणि चांदीचे मोहरे उमटलेली प्रमाणशील व सुंदर नाणी वापरली जात होती. पैशाची फेड करण्यासाठी निरनिराळ्या किंमतीची, सहजासहजी कमीत कमी भाग करता येतील अशी एका ठिकाणातून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाता येतील, उपयुक्त होतील अशी ही नाणी होती. पैशाच्या विकासात नंतर टप्पा होता तो कागदी पैशांचा.

**लक्षात असू द्या**

*इतिहासातील विविध राज्यकर्त्यांनी सुरू केलेली आणि त्यांच्या वापरात असलेल्या नाण्यां बद्दल माहिती गोळा करा.*



**धांतूची नाणी / पैसा**

**कागदी पैसा:** धातुरुपी पैसा हा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाण्यास सुरक्षित नव्हता. म्हणून व्यापाऱ्याने लिखित दस्तऐवज वापरण्यास सुरुवात केली. अर्थ पुरवठा करणारे लोक पैशाची गुणवत्ता ठरवू लागले. हा लिखित दस्तावेज म्हणजे खरोखरच

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पैसे नव्हते, पण गरज असेल तेव्हा पैशाच्या ऐवजी स्वीकारले जायचे, क्रमाक्रमाने लोक या बँकेच्या नोटाशी जुळवून घेऊ लागले. पण फक्त पैशाच्या बद्दलच म्हणून नव्हे तर खरोखरच पैसे म्हणून त्यांनी स्वीकारले. ज्या सरकारांनी आपापल्या केंद्रीय बँकांना या नोटांची मक्तेदारी दिली तो एक कायदेशीर पुरावा मानण्यात आला.



कागदी पैसा

त्या देशात कोणासही हा कायदेशीर पुरावा नाकारता येत नव्हता. भारत - रुपया, यु. एस.ए. - डॉलर, इंग्लंड - पाउंड, जर्मनी - मार्क, जपान - येन, चीन - युआन इत्यादी.

**बँकेचा पैसा:** जेव्हा व्यवसाय व व्यापाराची भरभराट होऊ लागली. तेंव्हा बँकाँचा पैसा अस्तित्वात आला. चेक, ड्राफ्ट, क्रेडिट आणि डेबिट कार्ड इत्यादी काही उदाहरणांची मदत घेऊन पैसे एका ठेवीतून दुसऱ्या ठेवीत किंवा एका ठेवीतून पैशात रूपांतरीत करता येऊ लागले. वस्तू आणि सेवांच्या व्यवहारासाठी चेक्स वापरले जाऊ लागले.

₹



चेक

**क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्ड:**



क्रेडिट कार्ड

निश्चित पुरवठादारावर विश्वास ठेवून वस्तू आणि सेवा मिळवण्यासाठी क्रेडीट कार्डचा वापर केला जातो. एका इलेक्ट्रॉनिक यंत्रामध्ये क्रेडिट कार्ड ओढले जाते. खरेदी करणाऱ्याच्या खात्यावरून विक्री करणाऱ्याच्या खात्यावर पैसे जमा होतात. डेबिट कार्डचे कार्य याचप्रमाणे चालते. पण डेबिट कार्ड मध्ये खरेदीदाराच्या बचत खात्यातील रक्कम कमी होते.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**पैशाची कार्ये:** पैशाच्या कार्याचे प्रकार

1. प्राथमिक किंवा मुख्य कार्य
2. पूरक कार्ये आणि,
3. इतर कार्ये

1. **प्राथमिक किंवा मुख्य कार्ये:** पैसा जी महत्त्वाची कार्ये करतो त्याचे प्रकार:

अ. **विनिमयाचे माध्यम किंवा रक्कम फेडण्याचे माध्यम:** वस्तू आणि सेवा खरेदीसाठी पैसा वापरतात. पैसा दोन प्रकारे व्यवहार करतो, पहिल्या प्रकारात बाजारात उपभोग्य वस्तूंची विक्री करून पैसा मिळवला जातो. दुसऱ्या प्रकारात बाजारात वस्तू व सेवांची खरेदी करून पैसा मिळवला जातो.

ब. **मूल्यमापन:** वस्तू आणि सेवांचे मूल्य पैशात करता येते. वस्तू विनियम पद्धतीतील दोष यामध्ये नाहीत. वेगवेगळ्या वस्तू आणि सेवांचे दर त्यामुळेच निश्चित करता येतात.

2. **पूरक कार्य: तीन महत्वाची पूरक कार्ये :**

अ. **विलंबाने रक्कम फेडता येते:** भविष्यातील रक्कम पैशाने फेडता येते. खरेदीदारांने आज खरेदी केलेल्या वस्तूची रक्कम भविष्यातील एखाद्या निश्चित दिवशी फेडता येते. त्याचप्रमाणे एखाद्याने आज वस्तू आणली व आणतानाच त्याने भविष्यातील एखादा दिवस पैसे निश्चितीसाठी किंवा देण्यासाठी ठरवला तरी तो ते पैसे त्या दिवशी देऊ शकतो.

ब. **मुल्य संग्रह किंवा खरेदी करून साठविण्याची शक्ती:** काही उपभोग वस्तू नाशवंत असल्यामुळे वस्तुविनिमय पद्धतीत अडचणी यायच्या पण पैशाच्या वापरामुळे नाशवंत वस्तू सुद्धा सहजासहजी खरेदी करता येऊ लागल्या. पण वाढणाऱ्या चलनवाढीच्या किंवा कमी होणाऱ्या दरावर पैशाचे मूल्य ठरते. भांडवलाचा साठा करणे शक्य होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**क. मूल्य स्थलांतर किंवा खरेदी करणाऱ्या शक्तीचे स्थलांतर:** दूरच्या अंतरावर किंवा परदेशात सुद्धा वस्तूंची अदलाबदल करणे शक्य आहे. सहाजिकच एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी खरेदी करणाऱ्या शक्तीचे स्थलांतर स्वाभाविक बनले. उसने घेणे आणि भाड्याने देणे पैशामुळे शक्य झाले. शिल्लक राहिलेला पैसा दुसऱ्याला कर्जरूपात दिल्यामुळे व्याज मिळते व त्याचा चांगला उपयोगही होता.

3. **इतर कार्ये: प्राथमिक आणि पूरक कार्याशिवाय पैशाची इतरही कार्ये आहेत. ती याप्रमाणे :**

**अ. विश्वासाचा पाया:** पैसा हा विश्वासाचा पाया आहे. बँकेकडे दिले जाणारे चेक्स हा याचा उत्तम पुरावा.

**ब. भांडवलाच्या उत्पादन क्षमतेत वाढ:** भांडवलाच्या रूपातील पैशाचे अनेक उपयोग आहेत. पैशाच्या प्रवाहीपणामुळे भांडवलाचे कमी उत्पादनामुल्याकडून जास्त उत्पादन मुल्याकडे वहन होते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**कर्जाचे प्रकार:**

कर्ज देणारा कर्ज घेणाऱ्यास पैसे, वस्तू आणि सेवाचा पुरवठा करतो. शिवाय भविष्यात कर्ज देणाऱ्यास पैसे, वस्तू आणि सेवा यांचा मोबदला फेडण्याचे वचन कर्ज घेणारा देतो. या ठरावास कर्ज असे म्हणतात. भारतात आपल्याला कर्जाचे दोन प्रकार आढळून येतात. जसे की औपचारिक कर्ज पद्धत आणि अनौपचारिक कर्ज पद्धत होय.

1. **अनौपचारिक कर्ज पद्धत:** प्राचीन काळापासून भारतात देशी बँकाद्वारे अनौपचारिक कर्ज पद्धत अस्तित्वात आहे. सराफ महाजन, शेठ, सावकार, शेट्टी, अशा अनौपचारिक पद्धतीने कर्ज देणाऱ्या बँका अस्तित्वात होत्या.

   19 व्या शतकाच्या मध्यापर्यंत या देशी बँकामार्फत भारताचा आर्थिक व्यवहार सुरू होता. युरोपियन बँकांच्या आगमनानंतर या देशी बँकाची मक्तेदारी संपुष्टात

येण्यास सुरुवात झाली, पण या देशी बँकांना भारतात सरकारी आश्रय मिळत होता. असे असूनही, कर्ज देणारे लोक किंवा या बँका महत्त्वाची भूमिका बजावत होत्या. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने या बँकाच्या तडाख्यातून कर्ज पद्धत प्रथमतः मुक्त केली. 1969 मध्ये 14 व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले 1980 मध्ये सहा ग्रामीण भारतासाठी म्हणून प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन केल्या. दुर्दैवानं, आजही या देशी बँका (सावकारी) ग्रामीण भागात कर्जपुरवठा करत आहेत.

2. **औपचारिक कर्ज पुरवठा:** सहकारी संस्था आणि बँकाकडून औपचारिक कर्ज पुरवठा होतो. या संस्था अमर्याद दर आकारत नाहीत. भारतातील रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण व देखरेख या बँका वर असल्यामुळे फक्त फायदा मिळविणे एवढाच उद्देश यांचा असच नाही, तर सामाजिक जबाबदारी सुद्धा त्यांच्यावर असते.

   **बँका आणि ठेवी:** आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत बँका फारच मोलाची भूमिका बजावतात. बँक म्हणजे नक्की काय? त्याचा अर्थ काय याबाबतीत मतैक्य नाही. काहीचां असा विश्वास आहे की, इंग्रजी मधील बँक हा शब्द मुळ इटालियन भाषेतील 'बँको' पासून घेण्यात आला आहे. याचा अर्थ 'बेंच' असा होतो. तर आणखी काहीचा असा विश्वास आहे की, जर्मन भाषेतील 'बँक' पासून हा शब्द बनला आहे. याचा अर्थ 'एकत्रसाठा निधी' अथवा 'सामान्य निधी' असा होतो.

1949 चा भारतीय बँकिंग नियंत्रण कायदा, बँकींग कंपनीचा अर्थ स्पष्ट करताना म्हणतो ''भारतात बँकिंग व्यवहार करणारी कोणतीही कंपनी'' आणि बँकिंग या शब्दाचा अर्थ कर्ज देणे, गुतवंणे, स्वीकारणे, लोकांकडून पैशाच्या स्वरुपात ठेवी स्वीकारणे, मागणी करताच परत देणे, चेक, ड्राफ्ट, ऑर्डर, काढून घेता येणारी रक्कम.

**बँकेचे महत्व:** आर्थिक विकासात बँका महत्त्वाची भूमिका बजावतात. लोकांच्या बचतीवर आकर्षक व्याज दर आणि भांडवल उभारणीच्या प्रक्रियेमध्ये बँका मदत करतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

चेकद्वारे रक्कम देण्याची सुविधा बँका पुरवतात. निश्चित ठेवीवर बँक सर्वोच्च व्याज दर देतात. कर्ज घेणाऱ्या लोकांकडून व्याजाचा दर जास्त घेतात. त्यामुळे कृषी उद्योग आणि सेवाना त्याच्या फायदा होतो. बँका हुंडी घेताना व देताना सूट देतात. डिमांड ड्राफ्ट, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड इत्यादी सुविधा बँक पुरवतात. कर्ज सुधारणा प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात.

**बँकाचे प्रकार:** बँकाचे अनेक प्रकार आहेत. प्रत्येक प्रकार हा एका विशिष्ट प्रकारचा व्यवहार करतो.

1. **औद्योगिक बँका:** या बँका उद्योगांना कमी व दीर्घ मुदतीची कर्जे देतात. या बँका दीर्घकाळासाठी पैसे पुरवतात. आणि निश्चित भांडवलचा पुरवठा करतात. उदा: इंडस्ट्रियल फायनान्स कार्पोरेशन, इंडस्ट्रीयल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कार्पोरेशन, इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट बँक ऑफ इंडिया आणि स्टेट फायनान्स कार्पोरेशन्स.

2. **विनिमय बँका:** या बँका देशाच्या परकीय व्यवहारासाठी अर्थपुरवठा करतात आणि परकीय चलनात व्यवहार करतात. हुंडीची अदलाबदल करणे, हा मुख्य हेतू. शिवाय सूट देणे, परकीय हुंड्या स्वीकारणे, गोळा करणे हा हेतू असतो. या बँका सर्वसाधारण व्यवहार सुद्धा खूप कमी प्रमाणात करतात.

3. **बचत बँका:** कमी उत्पन्न गटातील लोकांना बचतीची सवय लागावी म्हणून या बँका प्रोत्साहन देतात. लोकांची कमीत कमी बचत स्वीकारण्यात या बँका गुंतलेल्या आहेत. अमेरिका आणि युरोपीयन देशात अशा प्रकारच्या बँका आढळतात. भारतात मात्र पोस्ट ऑफिस आणि सहकारी बँका अशा सेवा पुरवतात.

4. **सहकारी बँका:** सहकारी तत्त्वावर या बँका चालतात को-ऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्ट अंतर्गत त्यांची नोंदणी झालेली असते. सभासदा पुरते मर्यादित त्यांचे व्यवहार चालतात. त्यांच्याकडून ठेवी स्विकारतात आणि व्याजाचा दर आकारून कर्जे देतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

5. **जमीन तारण बँका:** या सुद्धा सरकारी बँकाच आहेत. या बँका दीर्घ मुदतीची कर्जे शेतकऱ्यांना देताना कायमस्वरूपी जमिनीची सुधारणा, नाला बांधणे पाणी पुरवठा सोई करणे व यासारख्या अनेक कारणासाठी या बँका कर्ज देतात. त्यांना जमीन सुधारणा बँक असेही म्हटले जाते.

**व्यापारी बँकांच्या ठेवी:** व्यापारी बँकाचे महत्त्वाचे आणि मुख्य कार्य म्हणजे ठेवी स्विकारणे. ठेवीचे मुख्य प्रकार म्हणजे चालू खाते, बचत खाते, मुदत ठेवी खाते.

**चालू खाते:** व्यापारी-संस्था, सार्वजनिक संस्था, अशा प्रकारची खाती बँकेतून काढतात. यांना व्याज मिळवण्याऐवजी चेक द्वारे रक्कम चुकती व्हावी म्हणून असे खाते काढले जाते. मागणी करताच वारवार बँकेचे व्यवहार करता यावेत यासाठी असे खाते उघडले जाते.

**बचत खाते:** चालू उत्पन्नातून बचत व्हावी म्हणून ग्राहक असे खाते उघडतात. ग्राहक त्यांना हवे तेव्हा अशा खात्यातून व्यवहार करतात. या खात्यावरील पैशावर बँका थोडे व्याज सुद्धा देतात.

**मुदत ठेवी:** गुंतवणूक करण्याऱ्यांसाठी सुरक्षित आणि जादा उत्पन्न मिळावे म्हणून या ठेवी ठेवल्या जातात. काही ठराविक काळासाठी या ठेवी ठेवल्या जातात. त्यांना निश्चित ठेव असेही म्हणतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भारतीय रिझर्व्ह बँक (RBI):**

भारतीय रिझर्व्ह बँक ही देशाची मध्यवर्ती (केंद्रीय) बँक म्हणून ओळखली जाते. दिनांक 1 एप्रिल 1935 रोजी रिझर्व्ह बँकेची स्थापना औपचारिकरित्या करण्यात आली. आणि ती शेअर धारकाची बँक म्हणून 1 जानेवारी 1949 रोजी या बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. तेव्हापासून या बँकेची मालकी व ताबा भारत सरकारकडे आहे.



**भारतीय रिझर्व्ह बँक**

## हे तुम्हाला माहीत आहे का ?

*भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावनेत रिझर्व्ह बँकेची मुख्य कार्ये वर्णन करताना असे म्हटले आहे की, बँक नोटा देण्यावर नियंत्रण आणि भारतात पैशाचे स्थैर्य निर्माण करण्याच्या दृष्टिकोणातून ठेवी सुरक्षित ठेवणे आणि चलन व्यवस्थित ठेवणे आणि देशातील कर्ज पद्धतीचा फायदा उचलणे.*

**केंद्रीय बँकेचे कार्ये (RBI):**

1. **नोटा जारी करण्याची मक्तेदारी:** भारतीय चलनी नोट 2 रु. आणि त्याच्या पेक्षा वरील चलनी नोटा व्यवहारात आणण्याची मक्तेदारी रिझर्व्ह बँकेकडे आहे. रु. 5, रु. 10, रु. 100, रु 200. रु. 500 च्या चलनी नोटा व्यवहारात आणल्या जातात.



**भारतीय नोटाचे दर्शनी मूल्य**

तसेच सरकारी माध्यमातून 1 रुपयाची नोट जारी करण्याचा अधिकार असला तरी केंद्र सरकार मार्फत रु. 1 ची नोट भारतीय रिझर्व्ह बँक छापते आणि वितरित करते.

2. **सरकारची बँक:**

रिझर्व्ह बँक ही केंद्र व राज्य सरकारच्या ठेवी स्वीकारते. ती सरकारच्या वतीने वेगवेगळे कर आणि इतर संबंधित गोष्टीत मध्यस्थ म्हणून कार्य करते. काही विशेष सूचना केल्या असता सरकार तर्फे पैसे दिले जाण्यासाठी सुध्दा ही बँक कार्यरत असते. ती सरकारी रोखे देण्यासाठी मध्यवर्ती भूमिकेत ही बँक काम पाहते. आणि सरकारची आर्थिक सल्लागार म्हणून ही काम पहाते.

केंद्र व राज्य सरकारांना आर्थिक समस्येतून मार्ग काढण्यासाठी रिझर्व्ह बँक मदत करते. 'वेज अँड मिन्स अॅडव्हान्सेस' (WMA) ही फक्त व्यापारी बँक संस्था नाही

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

सरकारी महसुल गोळा करणे आणि खर्च करणे यात ताळमेळ घालवण्यासाठी तात्पुरती सेवा या पद्धतीने पुरवली जाते. संबंधित सरकार आणि रिझर्व्ह बँक याच्यात ठराव होऊन कमाल रक्कम आणि वेळेची निश्चिती करून ती रक्कम वापरता येते.

**3. बँकांची बँक:**

ही 'बँकांची बँक' म्हणून काम करते, ती देशातील सर्व बँकावर नियंत्रण ठेवते. देशातील सर्व बँकांना त्याच्या्या रिझर्व्ह बँक मधील ठेवी पैकी एक भाग राखीव म्हणून ठेवावा लागतो. जेव्हा-जेव्हा बँकांना अतिरिक्त पैशाची गरज लागते तेव्हा तर रिझर्व्ह बँक त्यांना क्रेडीट प्रदान करते, ही बँकांना चलन व्यवस्थापनात मार्गदर्शन करते.

**4. नॅशनल क्लिअरिंग हाऊस:**

बँकांचे व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी क्लिअरिंगचे काम रिझर्व्ह बँक करते. या सुविधेमुळे बँकांना इतर बँकांशी सुरळीत संबंध ठेवता येऊ शकतात.

**हे तुम्हाला माहीत आहे का ?**

- *इ.स. 1668 मध्ये स्थापन झालेली स्वीडनची रिक्स बँक सर्वात जुनी बँक.*
- *1694 साली इंग्लंडमध्ये केंद्रीय बँक स्थापन झाली. तिचे नाव बँक ऑफ इंग्लंड.*
- *अमेरिकेतील केंद्रीय बँक फेडरल रिझर्व्ह सिस्टमची इ.स. 1913 ला स्थापना झाली.*

**5. कर्ज नियंत्रण:**

पैशाची किती आवश्यकता आहे त्यानुसार व्यापारी बँकांना कर्ज नियंत्रण ठेवण्यास भाग पाडते. तसेच संख्यात्मक व गुणवत्ता पूर्ण काम व्हावे म्हणून रिझर्व्ह बँक या पत धोरणावर नियंत्रण ठेवते.

**6. विदेशी विनिमयाची रखवालदार:**

विदेशी विनिमयाचे रखवालदार म्हणून रिझर्व्ह बँक काम पाहते. विदेशी विनिमय दर ठरवण्याचे काम पाहते. चलनवाढीचा दर नियंत्रित रहावा, विदेशी चलन खरेदी विक्री व्यवस्था सुरळीत रहावी, आर्थिक परिस्थिती नियंत्रणात रहावी म्हणून काम पाहते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**7. आर्थिक आकडेवारी आणि माहिती प्रकाशित करते:**

RBI अर्थशास्त्र आणि आर्थिक आकडेवारी गोळा करते आणि वेळावेळी प्रकाशित करते. हे चलन आणि वित्त आर्थिक परिस्थिती राज्य वित्त भारतीय अर्थव्यवस्थेवरील आकडेवारीचे हस्तपुस्तक असते आणि इतर अहवाल प्रकाशित करते.

**8. बँकिंगची सवय वाढविणे:**

RBI बँकिंग सवयीच्या जाहिराती द्वारे बचत संस्थात्मक बनवते. आणि बँकिंग प्रणालीचा विस्तार करण्याचा प्रयत्न करते.

**9. शेतीसाठी सुविधा:**

RBI नियमितपणे शेतीला अप्रत्यक्ष आर्थिक सुविधा पुरवते. नाबार्ड माध्यमातून अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्ज पुरवठा प्रदान करते. कृषी आणि सलग्न क्रियाकलापांना आर्थिक सुविधा देते.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास धोरणात, RBI महत्त्वाची भूमिका बजावत आहे. रिझर्व्ह बँकेचे डेटा संकलन नंतर आर्थिक संशोधन सतत सुरू असते. ज्ञानाची माहिती विस्तारत असते. राष्ट्राला भेडसावणाऱ्या अनेक आर्थिक संकटांशी मुकाबला करण्यासाठी रिझर्व्ह बँक नेहमीच तत्पर असते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागा भरा.**

1. भारतीय रुपया ____________ पासून घेतलेला आहे.
2. चेक ही ____________ ची व्यवस्था आहे.
3. ज्या बँका परकीय चलन व्यवहार करतात, अशा बँकांना ____________ म्हणतात.
4. भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना ____________ या वर्षी झाली.

5. जपानच्या पैशाला ____________ म्हणतात.

6. भारत सरकारने 14 व्यापारी बँकाचे ____________ यावर्षी राष्ट्रीयीकरण केले.

## II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

7. वस्तुविनिमय पद्धत म्हणजे काय?

8. पैशाचा अर्थ सांगा.

9. भारताची केंद्रीय बँक कोणती?

10. पैशाची कार्ये स्पष्ट करा.

11. बँकाचे निरनिराळे प्रकार सांगा.

12. भारतीय रिझर्व्ह बँकेची कार्ये स्पष्ट करा.

## III. उपक्रम

1. तुम्ही स्वतः अभ्यास करून व्यापारी बँक आपली कार्ये कशी पार पडतात. यावर एक अहवाल तयार करा.

2. तुमच्या जवळील बँकेला भेट द्या. बँक कोणकोणती कार्य करते. याचे निरीक्षण करा.

## IV. प्रकल्प

1. चित्रांचा उपयोग करून पैशाचा विकास कसा झाला ते स्पष्ट करा.

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्रकरण-32 वे

# श्रम आणि उद्योग

Q6S4B6

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल.**

- *श्रमाची प्रामुख्यता आणि त्याचे प्रकार*
- *श्रम विभागणीचे फायदे आणि तोटे*
- *उत्पादक आणि अनुत्पादक श्रम*
- *भारतातील महिलांची भूमिका आणि स्त्री-पुरुष असमानता*
- *बेरोजगारी आणि त्याचे प्रकार*
- *वेठबिगारी आणि बाल कामगार निर्मूलन कायदा*

श्रम हा उत्पादनाचा महत्त्वाचा आणि अत्यावश्यक घटक आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या उद्योगासाठी वेगवेगळ्या प्रकाराच्या श्रमिकांची गरज असते. जमीन आणि भांडवल सोबत श्रम हे एक प्रमुख घटक आहे. श्रमाशिवाय कोणतेही उत्पादन करणे अशक्य आहे. लोक श्रमाशिवाय संपत्ती निर्माण करू शकत नाहीत.

**माहिती असू द्या:**

*श्रम म्हणजे वस्तू आणि सेवाच्या उत्पादनासाठी मानवाने वापरलेली शारीरिक आणि बौद्धिक क्षमता किंवा मानसिक दृष्ट्या काम करण्याचे सामर्थ्य या संदर्भात केवळ मानवी श्रमंची गणना केली जाते. प्राण्यांच्या श्रमाची गणना केली जात नाही.*

श्रमामध्ये उपजीविकेसाठी सर्व शारीरिक आणि मानसिक प्रयत्नांचा अंतर्भाव होतो. याचा परिणाम म्हणजे वस्तू आणि सेवा किंवा दोन्हींचे उत्पादन करणे. कोणालातरी आनंद व्हावा म्हणून किंवा दानधर्म करण्याचे काम म्हणजे श्रम नव्हे. एखादा वैद्य, शिक्षक, न्यायाधीश, बँक कर्मचारी पगार स्वीकारून करण्याऱ्या कामाला श्रम म्हणतात. पण आपल्या आजारी मुलाची आईने केलेली सेवा म्हणजे श्रम नव्हे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**माहिती असू द्या:**

*एखाद्या चांगल्या कार्यासाठी मन आणि शरीराचा पूर्णपणे किंवा अंशत: उपयोग करून पण एखाद्याच्या आनंदासाठी नव्हे, जे काम केले जाते त्यास श्रम म्हणतात.*

**-अल्फ्रेड मार्शल.**

**श्रमाची वैशिष्ट्ये :**

1. श्रम हे काम करणाऱ्या व्यक्ती पासून वेगळे करता येत नाही.
2. श्रम संग्रह करता येत नाही.
3. कालानुसार श्रमाचा पुरवठा बदलत जातो.
4. श्रम करण्याची क्षमता (सामर्थ्ये) बदलत असते.
5. श्रम हा एक क्रियाशील घटक आहे.
6. श्रम कार्यक्षमतेमध्ये भिन्न भिन्नता असते.

**श्रमाचे महत्व:** उत्पादन क्षेत्रात महत्त्वाचा घटक म्हणजे श्रम. श्रमामुळे उत्पादन होते. म्हणूनच फक्त हा घटक महत्त्वाचा नसून त्यामुळे उत्पादन पद्धतीतील इतर घटकांचा सुद्धा उपयोग होऊन उत्पादन सुरळीत होते. म्हणूनच 15 ते 60 वर्षे वयोगटातील लोकांची संख्या ज्या देशात जास्त असते, त्यावरून तेथील श्रम शक्तीचा अंदाज येतो. सहसा, 15 वर्षाच्या आतील व 60 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तीचा उत्पादन घटकात वापर केला जात नाही. 2011 मध्ये भारतात एकूण लोकसंख्येच्या 40% लोकसंख्या ही श्रमशक्ती होती.

**श्रमाचे प्रकार:** श्रमाचे अनेक प्रकार आहेत. ते या प्रमाणे-

1. कामाचे स्वरूप- शारीरिक आणि मानसिक श्रम
2. कौशल्य- कुशल, अर्ध कुशल आणि अकुशल श्रम
3. प्रशिक्षण- व्यावसायिक आणि व्यवस्थापकीय श्रम
4. उत्पन्न मिळविणे- उत्पादित आणि अनुत्पादक श्रम.

**श्रम विभागणी (Division of Labour) :**

श्रमाची विभागणी मानव जन्माइतकी जूनी आहे. मानवाच्या अगदी प्राथमिक अवस्थेपासूनच्या स्त्री आणि पुरुषांच्या श्रमात फरक आढळतो. पुरुष शिकारी आणि मासेमारी करायचा तर स्त्री स्वयंपाक, कपडे शिवणे, मुलांची काळजी घेणे अशी कामे करायची.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

उत्पादन प्रक्रियेतील निरनिराळ्या कामगारांकडे निरनिराळी कामे सोपविणे म्हणजे विभागणी होय. आधुनिक अर्थशास्त्रात श्रम विभागणीचे महत्त्व फारच वाढलेले दिसून येते. प्रामुख्याने बऱ्याच ठिकाणी एक व्यक्ती किंवा व्यक्तीचा गट उत्पादन प्रक्रियेतील फक्त एकच घटकाशी संबंधित असतो.

**माहिती असू द्या:**

***ॲडम स्मिथचे उदाहरण:*** *अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथ यांचे प्रसिद्ध पुस्तक 'द वेल्थ ऑफ नेशन्स' (1776) यामध्ये त्याने श्रम विभागणीचे फायदे स्पष्ट केले आहेत. एक व्यक्ती तार खेचतो, दुसरी व्यक्ती तार सरळ करतो, तिसरी व्यक्ती तार कापतो, चौथी व्यक्ती त्याला अणकुचीदार टोक करतो आणि पाचवी व्यक्ती त्याच्या वरचा भाग वाकवितो. हा पिन तयार करण्याचा महत्त्वाचा व्यवसाय आहे. त्यांच्या मतानुसार एक पिन तयार करण्यासाठी 18 वेगवेगळे कामाची यादी करतात. 10 व्यक्ती एका दिवसात 48000 पिना तयार करतात, पण असे न केल्यास एक व्यक्ती एका दिवसात फक्त 10 पिन तयार करू शकतो.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**श्रम विभागणीचे फायदे:**

1. **श्रमाची कार्यक्षमता:** श्रम विभागणीचा मुख्य फायदा म्हणजे कार्यक्षमता वाढते.
2. **उत्पादनाची गुणवत्ता:** श्रमाच्या कार्यक्षमतेमुळे उत्पादनाच्या प्रमाणात तर वाढ होतेच शिवाय वस्तू आणि सेवांच्या गुणवत्तेत सुध्दा वाढ होते.
3. **नफा:** उत्पादित वस्तू आणि सेवांच्या प्रमाणात वाढ व गुणवत्तेत वाढ झाल्यामुळे प्रचंड नफा होतो.
4. **सरासरी दर:** श्रम विभागणीच्या वाढीमुळे उत्पादन खर्चात बचत होऊन सरासरी दर कमी होतो व ग्राहकांना वस्तू अतिशय स्वस्तात उपलब्ध होतात.
5. **संशोधन आणि विकास:** श्रम विभागणीमुळे दीर्घ कालावधीकरिता संशोधन आणि विकासासाठी मदत होते. वेगवेगळी नवीन उत्पादने निर्माण होतात.

**श्रम विभागाणीचे तोटे:**

1. **कामाचा कंटाळा:** श्रम विभागणी मुळे एखादा कामगार वर्षानुवर्षे एकच प्रकारचे काम करतो. त्यामुळे काही काळानंतर त्या कामगारास कामाचा कंटाळा येऊ शकतो.

2. **जबाबदारीची उणीवः** उत्पादित वस्तूची गुणवत्ता अपेक्षेप्रमाणे नसेल तर कोणावरही त्याची जबाबदारी येत नाही.

3. **अवलंबित्व वाढतेः** उत्पादित वस्तू निरनिराळ्या प्रक्रियेत विभागली जाते आणि असंख्य निरनिराळ्या कामगाराकडून ती पूर्णत्वास जाते. त्यामुळे कामगारांची एकमेकावर अवलंबून राहण्याची वृत्ती वाढते.

4. **निरुद्योगीपणः** श्रम विभागणीमुळे वृत्ती वैशिष्ट्ये वाढतात. एकदा कामगार एखादी वस्तू पूर्ण करण्यापेक्षा त्यातील एखादा घटकच पूर्ण करतो. जर त्याला किंवा तिला कामावरून काढून टाकले तर त्याला किंवा तिला जे काम अगोदर करत होते. त्याच प्रकारचे काम शोधण्याची वेळ येते.

5. **वर्ग कलहः** श्रम विभागणी मुळे मोठ्या प्रमाणात वस्तूंचे उत्पादन होते. त्यामुळे उत्पादन कर्त्याला प्रचंड फायदा होतो. ते लोक कामगारांना फार कमी वेतन देतात. यातून समाजात काम करणारे आणि न काम करणारे दोन वर्ग निर्माण होतात (श्रीमंत आणि गरीब).

**लिंगानुसार श्रम विभागणी (Gender Dimension of Labour) :**

भारतात ग्रामीण भागात 31% तर शहरी भागात 20% स्त्रिया श्रमशक्ती आहेत. पुरुषांच्या तुलनेत हे प्रमाण फारच कमी आहे, पण क्रमाक्रमाने यात वाढ होत आहे. देशाची वाढ आणि विकास होण्यासाठी स्त्री-पुरुष सारखेच महत्त्वाचे आहेत.

जसजसा आर्थिक विकास होत आहे. तसतसा भारतातील स्त्री शक्तीचा प्रभाव सुद्धा वाढत आहे. पण दुर्दैवाने सामाजिक-आर्थिकरित्या स्त्रियांचा दर्जा वाढत राहिलेला नाही. वेगवेगळ्या मार्गाने स्त्रियांचे शोषण वाढत आहे.



**विविध क्षेत्रातील महिलांचा सहभाग**

भारतात 2011 च्या शिरगणती नुसार 587 दशलक्ष स्त्रिया आहेत. लिंग प्रमाणतेनुसार स्त्री-पुरुष प्रमाणात खूपच तफावत आढळते. सरकारने सुद्धा या प्रमाणावरच अंदाजपत्रक (बजेट) ठरविले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**लिंग भेद :** स्त्रियांचा आर्थिक मागासलेपणा आणि त्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या सोयी-सुविधा लिंग तारतम्य दर्शवितात. जेव्हा पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना समान दर्जा व संधी मिळत नाहीत तेव्हा त्याला लिंग असमानता म्हणतात.

भारतात स्त्री-पुरुष असमानता प्रचंड पसरलेली आहे. स्त्रियांना अनेक क्षेत्रात समान वागणूक मिळत नाही. स्त्री-पुरुष प्रमाणात तफावत, स्त्रियांचा शैक्षणिक स्तर कमी आहे. त्यांची अकुशल कामे, स्त्रियांची आर्थिक व्यवहारात असणारी कमी गुंतवणूक, सरकारच्या उच्च पदस्थ नोकरीत स्त्रियांचे अत्यल्प प्रमाण, (IAS, IPS आणि IFS)लोकसभेत आणि विधानसभेत सुध्दा यांचे अत्यल्प प्रमाण आहे.

पुरुषापेक्षा महिलांच्यावर कामाचा ताण जास्त असतो. स्त्रियांवर घरगुती कामाचे ओझे वाढतच चालले आहे. श्रम क्षेत्रात सुद्धा त्यांचे काम वाढतच चालले आहेत. त्यांचे हे दोन्हीकडील काम विचारात घेतले जात नाही. सामाजिक निती नियमात सुध्दा गृहित धरले जात नाहीत. बाल विवाह आणि गर्भधारनेचे प्रमाण कमी होत आहे. महिलांच्यावर घरात आणि कामाच्या ठिकाणी आत्याचार सुरुच आहेत.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**उत्पादक श्रम:** जे श्रम केल्यामुळे उत्पन्न मिळते किंवा उत्पन्न मिळविण्यासाठी ज्या श्रमाचा उपयोग होतो असे श्रम म्हणजे उत्पादक श्रम. समाज विघातक कृत्यांना श्रम म्हणत नाहीत कारण ते दुसऱ्यांची संपत्ती लुबाडतात. ॲडम स्मिथच्या मतानुसार भौतिक वस्तू आणि मालमत्ता निर्माण करणाऱ्या श्रमांना उत्पादक श्रम म्हणतात.

**पुनरुत्पादक श्रम:** घरी करण्यात येणाऱ्या श्रमांना पुनरुत्पादक श्रम म्हणतात. यालाच घरगुती श्रम असेही म्हणतात. घरी स्त्रियांकडून असे मजुरी रहित श्रम केले जातात. मुलांचे पालन-पोषण, त्यांची काळजी, स्वच्छता राखणे, स्वयंपाक इत्यादी पुनरुत्पादक श्रमाची उदाहरणे आहेत. पुनरुत्पादक श्रम हे स्त्रियांद्वारे केले जाणारे श्रम असे सांगितले जाते. स्त्री पुरुष असमानता हे याचे कारण आहे. पुरुषाकडून स्त्रियांची पिळवणूक होण्याची कारणे म्हणजे पुरुष प्रधानता, निरक्षरता, अज्ञान आणि अंधविश्वास.

**वेठबिगारी पद्धत रद्द:** एक कामगार जो घर मालकाच्या घरी घरमालकाने ठरवलेल्या मोबदल्यानुसार ठरविलेल्या कालावधीकरिता किंवा कर्जाची परत फेड होईपर्यंत करणाऱ्या कामाला वेठबिगारी म्हणतात. कर्जाच्या रकमेची परतफेड होईपर्यंत घरमालकाकडे त्याला सांगितलेली कामे करावी लागतात. अशा मजुरांना भरपूर काम व मोबदला कमी देऊन

त्यांचे शोषण केले जात असते, ही पण एक प्रकारची गुलामगिरी आहे. भारत सरकारने 1976 साली वेठबिगारी पद्धत रद्द केली आहे. ही सामाजिक दुष्ट पद्धत कायद्याने जरी बंद झाली असली तरी अजूनही कुठे कुठे ही पद्धत अस्तित्वात आहे.

**बालकामगार पद्धत रद्द:** 14 वर्षाखालील जी मुले मजुरी करतात, त्यांना बाल-कामगार असे म्हणतात. ही एक भारतातील अतिशय गंभीर समस्या आहे. शेती आणि इतर संबंधित क्षेत्रात ग्रामीण भागातील 90% बाल कामगार आहेत. शहरी भागात हॉटेल, लहान उद्योग, काडी पेटी तयार करणे, गॅरेज वर्कशॉप इत्यादी मध्ये काम करतात. या मुलांचे शैक्षणिक, आरोग्य आणि भविष्याचे नुकसान होते. भारत सरकारने 1986 मध्ये बालकामगार पद्धत रद्द केली. 14 वर्षाखालील कोणत्याही मुलास जोखमीचे काम सांगणे हा कायद्याने गुन्हा आहे.

**उद्योग:** लोक त्यांचे जीवन जगण्यासाठी, योग्य उत्पन्न मिळविण्यासाठी निरनिराळ्या उत्पादक घटकांत श्रम करतात त्यास नोकरी (उद्योग) असे म्हणतात.

**बेरोजगारी:** काम करण्याची इच्छा, आवड असुनहीज्याला काम मिळत नाही त्याला बेरोजगार म्हटले जाते.

भारतात बेरोजगारांची संख्या वाढत आहेत. शिक्षित, कुशल ग्रामीण-शहरी असे सर्व प्रकारचे लोक यामध्ये येतात. 1951 मध्ये एकूण बेरोजगारांची संख्या पाच दशलक्ष होती. 2009-10 मध्ये एकूण 468.8 दशलक्ष श्रमशक्ती असून त्यामध्ये 9.8 दशलक्ष बेरोजगारीचे प्रमाण आहे.

**तरुणांची बेरोजगारी:** 15-30 वर्षे वयोगटातील व्यक्तींना काम मिळाले नसेल तर अशांना तरुणांची बेरोजगारी म्हणतात. ही बेरोजगारी ग्रामीण आणि शहरी भागात आढळते. त्यातूनही जे शिक्षित लोक आहेत, व ज्यांना पांढरपेशी नोकरी (शारीरिक श्रम नसलेले काम)(White-collar job) हवी आहे. अशा मध्ये प्रामुख्याने आढळतात.

**तुम्हाला माहीत असू द्या:**

*एकूण श्रम शक्ती - कार्यरत श्रमशक्ती = बेरोजगारी*

Labour force - workforce = unemployment

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**बेरोजगारीचे प्रकार:**




**ग्रामीण बेरोजगारीचे प्रकार:**

1. **छुपी बेरोजगारी:** गरजेपेक्षा जास्त कामगार जिथे काम करतात, आणि त्यामुळे त्यातील काही कामगाराची उत्पादकता शून्य असते. तेव्हा अशा स्थितीला छुपी बेरोजगारी म्हणतात. जरी त्यांना काढून टाकले तरी उत्पादनात फारशी परिस्थिती बदलत नाही. उदा. समजा एखाद्या शेतात घरातील चार लोक काम करत असतील शिवाय आणखी दोन मजुरांना कामावर ठेवले, व त्यामुळे उत्पादनात कोणतीही वाढ दिसून आली नाही. तर अशा वेळी ते दोन मजूर हे छुपे बेरोजगार म्हणून समजले जातात. अशी परिस्थिती भारतासारख्या विकसनशील देशातील ग्रामीण भागात बहुतेक आढळून येते. थोडक्यात, गरजेपेक्षा जास्त लोक जेव्हा एखाद्या क्षेत्रात काम करतात, तेव्हा त्यास छुपी बेरोजगारी म्हणतात.

2. **हंगामी बेरोजगारी:** कृषी क्षेत्र, त्यावर आधारित उद्योग, जसे साखर कारखाना, भातगिरण्या यामध्ये विशिष्ट कालावधीकरिता काम करतात. त्यामुळे वर्षातील कांही काळाच हे उद्योग व रोजगार पुरवतात. जेव्हा हंगाम संपतो तेव्हा त्यातील मजूर बेरोजगार राहतात. यालाच हंगामी बेरोजगारी असे म्हणतात.

**शहरी बेरोजगारीचे प्रकार:**

1. **औद्योगीक बेरोजगारी:** औद्योगीक क्षेत्रातील बदलांमुळे एखादी व्यक्ती विशिष्ट कालावधीत बेरोजगार. झाली तर त्या स्थितीला औद्योगीक बेरोजगारी म्हणतात. उदा. ग्रामीन लोक जे कामासाठी शहरामध्ये स्थलांतरीत होतात त्यांना प्रशिक्षण आणि कौशल्यांच्या अभावामुळे नोकऱ्या मिळत नाहीत.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. **सुशिक्षित बेरोजगारी:** ज्या परिस्थीतीत सुशिक्षित लोक काम करण्यास तयार असतात परंतु त्यांना रोजगार मिळत नाही अशा परिस्थीतीला सुशिक्षित बेरोजगार म्हणतात.

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. ॲडम स्मिथचे प्रसिद्ध पुस्तक ___________ आहे.
2. वेठबिगारी पद्धत बंदीचा कायदा ___________ या वर्षी करण्यात आला.
3. जेव्हा एखाद्या श्रमाची उत्पादकता शून्य असते. तेव्हा ती पद्धत ___________ म्हणून ओळखली जाते.
4. श्रम विभागणी मुळे ___________ वाढते.
5. बालकामगार पद्धत कायदा ___________ मध्ये अस्तित्वात आला.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या :**

6. श्रम विभागणी म्हणजे काय?
7. बालकामगार पद्धत म्हणजे काय?
8. बेकारीचा अर्थ स्पष्ट करा.
9. श्रम विभागणीचे फायदे स्पष्ट करा.
10. श्रम विभागणीच्या तोट्यांची यादी करा.
11. उत्पादक आणि अनुत्पादक श्रमाचा अर्थ स्पष्ट करा.
12. बेरोजगारीच्या प्रकारांची यादी करा.
13. छुपी बेरोजगारी आणि हंगामी बेरोजगारी यातील फरक सांगा.
14. औद्योगिक बेरोजगारी सुशिक्षित बेरोजगारपेक्षा कशी वेगळी आहे.

**III. उपक्रम :**

1. एखाद्या संस्थेस भेट देऊन तेथील श्रम विभागणीचे निरीक्षण करा आणि नंतर तुमच्या प्रत्यक्ष अनुभवाद्वारे अहवाल तयार करा.

**IV. प्रकल्प :**

1. निरनिराळ्या बेरोजगारीच्या पद्धतीवर एक अहवाल तयार करा आणि भारतातील आजची स्थिती मांडा.
2. लिंग आधारित श्रमविभागणीवर अहवाल तयार करा.

***

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## प्रकरण-33 वे

# बाजाराचे व्यवस्थापन

W3I8D8

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *बाजार अर्थ आणि प्रकार.*
- *बाजाराची भूमिका अर्थ कार्य आणि महत्त्व.*
- *विक्री व्यवस्थेचे मिश्रण व उत्पादन, किंमत, जागा, बढती (कार्य).*
- *उत्पादक-मध्यस्थ-ग्राहक.*
- *ग्राहकांचे हक्क आणि ग्राहक मंच.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**बाजार अर्थः** बाजार हा शब्द मुळ लॅटिन भाषेतील मर्कटस (Mercatus) पासून घेतला आहे. याचा अर्थ व्यापार किंवा व्यवसायाची जागा. सामान्य भाषेत बाजार म्हणजे अशी एक निश्चित जागा की, जेथे विक्रेते आणि खरेदीदार एकमेकांना भेटतात. आणि वस्तूची खरेदी विक्री करतात. दुसऱ्या शब्दात जेथे वस्तू विकल्या व खरेदी केल्या जातात अशी एक जागा.

**बाजाराचे प्रकारः** बाजारांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते. त्यातील काही याप्रमाणे

1. **भौगोलिक प्रदेशावर आधारितः**

   **स्थानिक बाजारपेठाः** निश्चित स्थानिक जागे पुरत्या मर्यादित स्वरूपात या बाजारपेठा बघावयास मिळतात. खरेदी-विक्री स्थानिक स्वरूपात चालते.

   **प्रादेशिक बाजारपेठाः** ही बाजार एका प्रदेशापुरती मर्यादित असते.

   **राष्ट्रीय बाजारपेठाः** एखाद्या विशिष्ट देशाच्या सीमेअंतर्गत चालणारी ही व्यवस्था असते.

   **आंतरराष्ट्रीय बाजारपेठाः** एकाद्या विशिष्ट देशाच्या सिमेबाहेर घडणाऱ्या बाजारातील घडामोडी संबंधित असा हा बाजार आहे.

2. **वस्तूंवर आधारितः**

   **उपयोगी वस्तूच्या बाजारपेठाः** या बाजारपेठांमध्ये ग्राहक हिताच्या अनेक वस्तूंची खरेदी विक्री या प्रकारच्या बाजारपेठांमधून होते.

**आर्थिक बाजार:** या बाजाराची स्थापना विशेषतः अशा व्यवसायसाठी केली जाते की व्यवसायिक संस्थासाठी अर्थपुरवठा, खरेदी आणि विक्री करतात. उदाहरण शेअर बाजार, मनी मार्केट

**भांडवली बाजारपेठा:** आर्थिक संस्था आणि स्टॉक एक्सचेंज मार्फत दीर्घ मुदतीच्या कर्ज पुरवठा करणारा असा हा एक बाजाराचा प्रकार आहे.

3. **संबंधावर आधारित (On the basis of Link):**

**प्राथमिक बाजारपेठा:** या प्रकारात उत्पादन, आपण उत्पादित केलेला वस्तू घाऊक विक्रेत्यांना विकतात (सामान्यपणे उत्पादनाची ही बाजार व्यवस्था आहे.)

**दुय्यम बाजारपेठा:** या प्रकारात घाऊक विक्रेते आपल्याकडील वस्तू किरकोळ विक्रेत्यांना विकतात.

**शेवटच्या बाजारपेठा:** या प्रकारात मोठ्या प्रमाणात वरील वस्तू किरकोळ विक्रेत्यांना विकल्या जातात.

4. **विस्तारावर आधारित:**

**घाऊक बाजारपेठा:** या प्रकारच्या मोठ्या प्रमाणावरील वस्तू किरकोळ विक्रेत्यांना विकल्या जातात.

**किरकोळ बाजारपेठा:** ग्राहकांना गरजेनुसार अत्यंत कमी स्वरूपात विकल्या जातात.

5. **व्यवहार करण्याच्या पद्धतीवर आधारित:**

**स्थानिक (Spot) बाजारपेठा:** या प्रकारात विक्रेता जेव्हा आपल्या वस्तू विकावयास राजी होतो. व खरेदीदार सुद्धा वस्तू खरेदी करण्यास तयार होतो. तेव्हा जागच्या जागी या वस्तूचा व्यवहार होतो.

**भविष्यातील बाजार:** पैसे अगोदर घेऊन वस्तूचा पुरवठा काही दिवसानंतर केला जातो.

6. **वस्तूंच्या स्वरूपावर अधारीत :**

**ग्राहक बाजारपेठा:** व्यक्तीच्या स्वतःच्या उपभोगासाठी वस्तू खरेदी केल्या जातात.

**विक्रेत्यांच्या बाजारपेठा:** उत्पादनाच्या पुढच्या प्रक्रियेसाठी वस्तू खरेदी केल्या जातात.

7. **कायद्यावर आधारित (नियंत्रित):**

**नियंत्रित बाजारपेठा:** या प्रकारच्या बाजार हा कायद्यावर संबंधित आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**अनियंत्रित किंवा मुक्त बाजारपेठा:** अशा प्रकारच्या बाजार व्यवस्थेवर कायद्याचे नियंत्रण असत नाही ती सर्वांसाठी मुक्त असते.

**8. सांप्रदायिक आणि असांप्रदायिक बाजारपेठा (पारंपरिक व अपारंपरिक) :**

**पारंपरिक बाजारपेठा:** हा एक सर्वात जुन्या प्रकारचा बाजार आहे. यामध्ये पूर्व योजना नुसार वस्तूंची अदलाबदल होते. पारंपरिक जागेवर हा व्यवसाय आधारित आहे. यामध्ये भौगोलिक प्रदेशावर जागा खरेदीदार व विक्रेता वस्तूची स्थिती आकार इत्यादी सर्व गोष्टी एका विशिष्ट पद्धतीने हाताळल्या जातात.

**अपारंपरिक बाजारपेठा:** या प्रकारच्या बाजार व्यवस्थेसाठी निश्चित जागा नसते. खरेदी करणारे आणि विक्री करणारे कोठूनही व्यवहार करतात यांची उदाहरणे

- पोस्ट ऑफिसमधून विक्री करणाऱ्या संस्था (Mail order Houses)
- दूरस्थ व्यापार (Tele Shopping)
- प्रस्ताविक दुकाने (Virtual Shops)
- रोज व्यवहार बदलणाऱ्या बाजारपेठा (Catalogue Market)
- अंतरजाळे बाजारपेठा (Online Market)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**विक्री व्यवस्था Marketing :**

**अर्थ आणि व्याख्या:** उत्पादकाकडून ग्राहकापर्यंत वस्तू आणि सेवाचा पुरवठा करताना ज्या अनेक घडामोडी घडतात त्यांना विक्री व्यवस्था म्हणतात.

अमेरिकन मार्केटिंग असोसिएशनने केलेली व्याख्या ''व्यक्ती आणि उद्योग यांची उद्दिष्टेपूर्ती करण्यासाठी योजना करण्याची प्रक्रिया कल्पना अमलात आणणे, किंमत ठरवणे, विस्तार करणे, कल्पना वस्तू आणि सेवा यांचे वितरण करणे म्हणजे विक्री व्यवस्था होय''

वरील व्याख्येवरून हे स्पष्ट होते की वस्तू आणि सेवाच्या भौतिक वितरणाबरोबर ग्राहक हित पाहिले जाणे म्हणजे विक्री व्यवस्था होय.

**विक्री व्यवस्थेची कार्ये:**

1. खरेदी आणि एकत्रीकरण (Buying and Assembling)
2. विक्री (Selling)
3. वाहतूक व्यवस्था (Transportation)

4. साठागृह आणि वखार (Storage and Ware housing)
5. बाजार संशोधन (Market Research)
6. प्रमाणिकीकरण आणि प्रतवारीकरणे (Standardisation)
7. वर्गीकरण (Grading)
8. व्यापाराची खूण (Branding)
9. विमा (Insurance)

1. **खरेदी आणि एकत्रीकरण:** उत्पादनाच्या वापरासाठी वस्तू विकत घेणे आणि मध्यस्थामार्फत पुनर्रविक्रीसाठी वस्तू विकत घेणे म्हणजे खरेदी. निरनिराळ्या जागी खरेदी केलेला वस्तू एकाच केंद्राच्या ठिकाणी एकत्र केल्या जातात त्यास एकत्रीकरण म्हणतात ही क्रिया खरेदी केल्यानंतर सुरू होते.

2. **विक्री:** विक्रत्याकडून खरेदीदार पर्यंत योग्य विक्रीची वस्तू व्यवस्थित ठेवणे व त्यांना नफ्यासह हस्तांतरित करतात.

3. **वाहतूक व्यवस्था:** वाहतूक व्यवस्थामुळे वेळ आणि जागेची उपयुक्तता वाढते. आणि वस्तूची किंमतही वाढते.

4. **साठागृह आणि वखार:** उत्पादकच्या वस्तू विक्रीच्या वेळेपर्यंत सुरक्षित ठेवणे याला साठागृह म्हणतात. वखारीमुळे वस्तूच्या साठा करणे सोपे जाते.

5. **बाजार संशोधन (Marketing Research):** ही पद्धत बाजारातील परिस्थितीबद्दल संभवनीय कल आणि मागणी शोधण्याच्या संग्रह आहे. म्हणजेच ग्राहकांची संख्या त्याच्या गरजा खरेदीची सामर्थ्ये (प्राधान्य) आणि खरेदीचा वेग याबद्दल संशोधन आणि माहिती गोळा करण्याची एक पद्धत आहे.

6. **प्रमाणिकरण आणि प्रतवारीकरण (Standardisation):** उत्पादित वस्तूंचा दर्जा आणि गुणवत्ता ठरविण्यासाठी प्रमाणिकरण केले जाते. वस्तूंचे बाह्यस्वरूपामधील साम्य आणि अंतर्गत घटक यावर त्या वस्तूचा दर्जा ठरतो, यामुळे वस्तूची खरेदी विक्री सोपी होते.

7. **वर्गीकरण (Grading):** निश्चित केलेला कसोट्यांवर आधारित वस्तूची प्रतवारी केली जाते. यालाच वर्गीकरण म्हणतात. वेगवेगळे वर्ग किंवा श्रेणीमध्ये यांची विभागणी करण्याची एक प्रक्रिया (असते) आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

8. **व्यापाराची खूण (Branding):** व्यापारी खूण वस्तूवर असल्यामुळे वस्तूची किंमत ठरते. वस्तुवरील चिन्हामुळे त्या वस्तूचा खप वाढतो विक्रेत्याला ओळख देते.

**उदा:** Reebok, Shoes, colgate, Paste, Rin Soap, Parker pen इत्यादी. ट्रेड्मार्क्स कायद्या अंतर्गत त्यांची नोंदणी करणे सक्तीचे आहे. इतर कोणीही ते नाव वापरू शकत नाही. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. प्रत्येक पॅकेज किंवा उत्पादनावर ® अक्षर नोंदविले जाते. विक्रेत्याच्या नावाचा गैर वापर झाल्यास मूळ विक्रेत्याला कायद्याने संरक्षण मिळते.

9. **विमा:** विक्री व्यवस्थेत अनेक धोके संभवू शकतात. मालाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहतूक करताना किंवा वखारी मध्ये ठेवला जातो. तेव्हा नाश होण्याचा धोका असतो. हे टाळण्यासाठी सामान्य विमा कंपन्या वस्तूवर विमा काढतात आणि उतरवलेले साहित्य नष्ट झाल्यास विमा कंपन्या नुकसान भरपाई देतात.

## विक्री व्यवस्थेचे महत्व (Importance of Marketing)

एखाद्या राष्ट्राच्या विकासात विक्री व्यवस्थेचे फार महत्त्वाचे स्थान आहे.

1. **राहणीमानाचा दर्जा सुधारतो :** वेगवेगळ्या प्रकारची उत्पादने आणि सेवांची उपलब्धता आणि उपभोग यावर राहणीमानाचा दर्जा वाढतो.

2. **ग्राहकांचे समाधान:** ग्राहकांना वस्तू आणि सेवा नवनवीन प्रकारच्या उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या उपभोग घेण्याची संधी मिळते. त्यामुळे ग्राहकांचे समाधान होतेच आणि उत्पादनात वाढही होते.

3. **नोकरीच्या संधी:** बऱ्याच समस्या विक्री व्यवस्थेच्या प्रक्रियेत गुंतलेल्या आहेत. या संस्था म्हणजे घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, वाहतुकीची सेवा पुरविणाऱ्या संस्था, बँक, विमा, वस्तू पुरवठा करणाऱ्या या संस्था इत्यादी. या सर्व संस्थांमध्ये अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध होतात.

4. **साधनसंपत्तीचा (संसाधने) योग्य वापर:** विक्री शास्त्रात वेगवेगळ्या उपक्रम ातून देशातील साधनसंपत्तीचा, वस्तू आणि सेवा उत्पादनासाठी उपयोग होतो. यामुळे ग्राहकांना जास्त समाधान मिळते.

5. **आंतरराष्ट्रीय विक्री व्यवस्था:** आंतरराष्ट्रीय विक्री व्यवस्थापनामुळे परकीय चलन मिळते. आणि राष्ट्र-राष्ट्रातील संबंध वाढतात.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

6. **आर्थिक प्रगती:** नैसर्गिक साधनाची योजना पूर्वक वाटणी झाल्यामुळे नोकरीच्या संधी वाढतात. आणि राहणीमानाचा दर्जा सुधारतो. बचत आणि उत्पन्न वाढल्यामुळे सर्वसमावेशक आर्थिक विकास होण्यास मदत होते.

## विक्री व्यवस्थेचे मिश्रण (Marketing Mix)

विक्री व्यवस्थेच्या पद्धतीची मांडणी आणि या पद्धती अमंलात आणणे, यालाच विक्री व्यवस्थेचे मिश्रण म्हणतात.

हॉवर्ड बिझनेस स्कूल ऑफ अमेरिकेतील प्रो.एन्.एच्. बॉर्डन् यांनी पहिल्यांदा हा शब्दप्रयोग केला .त्याच्या मतानुसार या मिश्रणाच्या दोन याद्या करता येतात-

1. विक्री व्यवस्था करण्याऱ्या कार्यक्रमाच्या महत्त्वाच्या घटकांची यादी.
2. विक्री व्यवस्था करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रभावी यादया.

## बाजारपेठेतील मिश्रणाचे मुख्य (अंश) घटक

1) उत्पादनाचे मिश्रण 2) किंमतीचे मिश्रण

3) वाढीचे मिश्रण 4) जागेचे मिश्रण

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. **उत्पादनाचे मिश्रण:** उत्पादनाचे मिश्रण म्हणजे वस्तूच्या उत्पादनाशी संबंधित निरनिराळे घटक एकत्र करून त्यांची विक्री केली जाते. यामध्ये सेवेचे मिश्रण सुद्धा येते. उत्पादन करणारा त्यांची उत्तम गुणवत्ता जोपासतो. ग्राहकांचे समाधान हे सुद्धा मुख्य असते. तसेच विविध उत्पादनावर सुद्धा भर दिला जातो. उत्पादनाची रचना (design) गठ्ठयात बांधण्याची पद्धत (packaging), रंग, चिठ्ठ्या (label) लावणे, हे घटक सुद्धा यातच येतात.

2. **किंमतीचे मिश्रण:** वस्तूची अदलाबदल करताना ग्राहक जे मुल्य देतो, त्यास त्या वस्तूंची किंमत म्हणतात. एकाद्या वस्तूचा दर ठरविण्यासाठी त्या वस्तूच्या प्रक्रियेसाठी आलेला खर्च गृहीत धरला जातो. सुट, जादा भत्ता, ठराविक काळासाठी कर्जाऊ रक्कम दिली जाते.

3. **जागेचे मिश्रण:** बाजारात एखादी वस्तू उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अनेक कार्ये केली जातात. त्यासाठी वितरणाच्या साखळीवर जोर दिला जातो यामध्ये वस्तूच्या मालकी हक्क बदलून तो ग्राहकांकडे हस्तांतरित होतो. ग्राहकाच्या निवडीनुसार वस्तूची एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होणारी हालचाल आणि त्यामुळे होणारा विस्तार सुद्धा जागेच्या मिश्रणात येतो.

4. **वाढीचे मिश्रण** **(Promotion):** यालाच दळणवळणाचे मिश्रण असेही म्हणतात. विक्रेत्यांनी आपल्या वस्तू अपेक्षित ग्राहकापर्यंत पोहोचण्यासाठी जी कार्ये केलेली असतात त्यांना वाढीचे मिश्रण म्हणतात. जाहिरात, विक्रेत्याचे कौशल्य, विक्री वाढ, प्रसिद्धी हे घटक यात येतात. थोडक्यात ग्राहकांनी वस्तू खरेदी करावी म्हणून करावी लागणारी प्रक्रिया म्हणजे वाढीचे मिश्रण होय.

### बाजापेठेतील मिश्रणाचे महत्व

1. व्यवसाय संस्थेची विक्री आणि नफा वाढण्यास मदत होते.
2. व्यवसाय संस्था आणि ग्राहक यांच्यातील दुवा आहे.
3. ग्राहकाच्या गरजा पूर्ण करते.

### उत्पादकाची भूमिका-मध्यस्थ आणि ग्राहकांचे पात्र किंवा (मध्यस्था कडून होणारी वस्तूची अदलाबदल)

### (Role of Producers Middle Men and consumers in the exchange of goods.)

जागेच्या मिश्रणात वितरण साखळी महत्वाची भूमिका बजावते. या साखळीत वस्तूची अदलाबदल आणि मालकी हक्काचे हस्तांतर उत्पादकाकडून ग्राहकापर्यंत होते.

या साखळीचे दोन भागात वर्गीकरण करतात.

अ) प्रत्यक्ष वितरण किंवा प्रत्यक्ष विक्री

ब) अप्रत्यक्ष वितरण किंवा अप्रत्यक्ष विक्री

अ) **थेट अथवा प्रत्यक्ष विक्री:** प्रत्यक्ष वितरणात उत्पादकाकडून ग्राहकाकडे प्रत्यक्षरित्या वस्तू विकल्या जातात.

**उदाहरण:** बाटाचे बूट, रेमंडचे कपडे, दुकाने, इत्यादी.

ब) **अप्रत्यक्ष विक्री:** वस्तू वितरण खालील साखळी प्रमाणे होते.

1) उत्पादक ⟶ किरकोळ विक्रेता ⟶ ग्राहक

2) उत्पादक ⟶ घाऊक विक्रेता ⟶ किरकोळ विक्रेता ⟶ ग्राहक

3) उत्पादक ⟶ मध्यस्थ ⟶ घाऊक विक्रेता ⟶ किरकोळ विक्रेता ⟶ ग्राहक

4) उत्पादक ⟶ घाऊक विक्रेता ⟶ ग्राहक

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. **उत्पादक (उत्पादन करणारा) → किरकोळ विक्रेता → ग्राहक:** या वितरणाच्या व्यवस्थेत उत्पादक आपल्या वस्तू किरकोळ विक्रेत्यांना विकतो. व हा विक्रेता या वस्तू ग्राहकांना थेटपणे विकतो. या साखळीत येणाऱ्या वस्तूचे मूल्य जास्त असते. शिवाय या वस्तू टाकाऊ असतात. यामध्ये तयार कपडे, मोटारीचे सुटे भाग येतात, किरकोळ विक्रेते येथे फक्त मध्यस्थाची भूमिका पार पडतात.

2. **उत्पादक → घाऊक विक्रेता → किरकोळ विक्रेता → ग्राहक:** या प्रकारच्या वस्तू वितरणात वस्तू फार मोठ्या संख्येने घाउक विक्रेत्यांना विकल्या जातात. नंतर या वस्तू किरकोळ स्वरूपात किरकोळ विक्रेत्यांना विकल्या जातात. त्यानंतर त्याच्या कडून ग्राहकांना वस्तू विकल्या जातात. उदाहरण किराणामाल, औषधे, हार्डवेअर, लेखन साहित्य, इत्यादी. येथे घाऊक विक्रेते वाढीसाठी पुष्कळ मदत करतात. वस्तूची विक्री म्हणून मदत करतात.

3. **उत्पादक → मध्यस्थ → घाऊक विक्रेता → किरकोळ विक्रेता → ग्राहक:** या वितरण साखळीत उत्पादक काही मध्यस्थांची नेमणूक करतो. हा मध्यस्थ वस्तू किरकोळ विक्रेत्यांना विकतो. त्यानंतर किरकोळ विक्रेते वस्तू ग्राहकाला विकतात, औद्योगिक उत्पादने किंवा कृषी उत्पादने वितरण करताना या वितरण साखळीचा उपयोग केला जातो.

4. **उत्पादक → घाऊक विक्रेता → ग्राहक:** या वितरण साखळीत अतिशय लांब, मोठी आणि पूर्ण वितरण साखळी येते. या साखळीत उत्पादन करणारा वस्तू मध्यस्थांना विकतो. मध्यस्थ आपला फायदा काढून या वस्तू घाऊक विक्रेत्यांना विकतो. घाऊक विक्रेते आपला फायदा घेऊन किरकोळ विक्रेत्यांना विकतात. किरकोळ विक्रेते आपला फायदा घेऊन वस्तू ग्राहकांना विकतात.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## वितरण साखळीत मध्यस्थाची भूमिका

वस्तूची वितरण साखळी वस्तू उत्पादित करणाऱ्या पासून सुरू होते, आणि ग्राहकापर्यंत येऊन थांबते. उत्पादन करणारा आणि ग्राहक यामध्ये बरेच मध्यस्थ असतात. ते एकतर वस्तूची खरेदी विक्री करतात, किंवा विक्रीत मध्यस्थी करतात. खरेदी विक्री प्रक्रियेत मध्यस्थसुध्दा व्यापार वितरण साखळीत गृहीत धरले जातात. हे त्या वस्तूचे मालक बनतात. पण मध्यस्थी करणारे त्या वस्तूचे मालक बनत नाहीत. मध्यस्थाची उपलब्धता,

वागणूक, किंमती यावर ही वितरण साखळी अवलंबून असते. मध्यस्त जर जास्त असतील तर वस्तूचे मुल्य वाढते. असे असले तरी ग्राहकाची फसवणूक झाल्याची प्रकरणे अधिक आहेत. यासाठीच ग्राहक संरक्षण कायदा लागू करण्यात आला आहे. याबद्दल तुम्ही पुढच्या वर्गात जाणून घ्याल.

**ग्राहक शब्दाचा अर्थ:** ग्राहक म्हणजे एक व्यक्ती की जी वस्तू घेते, भाड्याने घेते किंवा उपयोगी सेवा घेते त्याला ग्राहक म्हणतात.

**ग्राहक संरक्षण:** उत्पादन आणि व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या भ्रष्ट व्यवहाराविरुद्ध ग्राहकांचे संरक्षण करणे. त्यामुळे ग्राहक संरक्षणाची खात्री दिली जाते. ग्राहकांचे हक्क सुरक्षित ठेवण्यात आले आहेत.

**ग्राहकांचे हक्क व ग्राहकांना न्याय मिळणारे कायदे:** ग्राहकांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आमच्या देशाने अनेक कायदे केलेले आहेत. त्यापैकी काही:

1. भारतीय करार कायदा 1872
2. वस्तू विक्री कायदा 1930
3. भारतीय मानक संस्था कायदा 1952
4. अत्यावश्यक वस्तुच्या कायदा 1955
5. ग्राहक संरक्षण कायदा 1986.
6. ग्राहक संरक्षण कायदा 2019.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

संयुक्त राष्ट्र संघटनेने तयार केलेली मार्गदर्शक तत्त्वे भारत सरकारने ग्राहकांचा हिताच्या संरक्षणासाठी मान्य करून ग्राहक संरक्षण कायदा 1986 साली मंजूर झाला व या कायध्याचा 1987 मध्ये अमलबजावणी सुरु झाली या कायद्यात 1992, 1993 आणि 2002 मध्ये दुरुस्ती करण्यात आली. प्रस्तुत ग्राहक संरक्षण कायदा 2019 मध्ये अमलात आला.

ग्राहक संरक्षण कायदा हा जम्मू आणि काश्मिर सोडून भारतातील सर्व राज्यांना व केंद्र शासित प्रदेशांना लागू होतो. हा कायदा सर्व वस्तू आणि सेवाना लागू होतो.

**कायद्याचे ठळक मुद्दे:**

- **संरक्षण हक्क:** ग्राहकाचे जीवन आणि हितसंबंध धोक्यात आणणाऱ्या वस्तूची कृती विरुद्ध संरक्षण करण्याचा हक्क.

- **माहिती हक्कः** गुणवत्ता, संख्या, स्वच्छता, दर्जा, इत्यादी गोष्टी माहिती, अयोग्य व्यापारी सेवेबद्दल मागता येते.
- **वस्तू निवड करण्याचा हक्कः** जेव्हा अनेक प्रकारच्या वस्तू स्पर्धात्मक व किंमतीत उपलब्ध असतात. तेव्हा वस्तू निवडीचा हक्क ग्राहकाला असतो.
- **वस्तू विषयी जाणून घेण्याचा हक्कः** ग्राहकांची आवड-निवड विचारात घेऊन त्याचा हक्क मान्य करण्यात येतो.
- **नुकसान भरपाई मिळण्याचा हक्कः** अयोग्य व्यापारी सुविधा किंवा विवेक रहित भ्रष्टाचार करण्याच्या विरुद्ध नुकसान भरपाई मागता येते.
- **ग्राहक शिक्षणाचा हक्कः** ग्राहकांना आपले हक्क कोणते आहेत. याचे शिक्षण मिळविण्याचा हक्क.
- भ्रष्टाचार थांबवण्याच्या हक्क.
- **आरोग्यपूर्ण वातावरणाचा हक्कः** चांगले शरीर आयुष्याची गुणवत्ता वाढवते.

केंद्रीय ग्राहक संरक्षण संस्था राष्ट्रीय स्तरावर, राज्य ग्राहक संरक्षण संस्था, राज्य स्तरावर, जिल्हा ग्राहक संरक्षण संस्था जिल्हा स्तरावर काम करते. केंद्र सरकार मधील ग्राहक खाते सांभाळणारा मंत्री आणि न्यायालयाच्या आदेशावर या संस्था काम करतात. जिल्हाधिकारी हे जिल्हा स्तरावरील संस्थेचे अध्यक्ष असतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

### ग्राहकांना वाद-विवादात्मक भरपाई देणारी संस्था
### (Consumer Grievances Redressed Agencies)

**1. जिल्हा ग्राहक वाद निवारण आयोग :** राज्यसरकार मार्फत जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशाची अध्यक्ष म्हणून निवड करतात. वस्तू आणि सेवा मूल्य एक कोटी पेक्षा कमी असेल तर या मंचाकडे तक्रार दाखल करता येते. यामध्ये दोन सदस्य असतात. त्यापैकी एक स्त्री सदस्य असते.

**2. राज्य ग्राहक वाद निवारण आयोग :** उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचे अध्यक्ष असतात आणखीही काही प्रसिद्ध व्यक्ती सदस्य म्हणून काम पाहतात. एक कोटी ते दहा कोटीपेक्षा कमी रकमेची तक्रार या मंडळात दाखल करता येते.

**3. राष्ट्रीय ग्राहक वाद निवारण आयोग :** केंद्र सरकारकडून नेमण्यात आलेल्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश हे या आयोगाचे अध्यक्ष असतात. या मध्ये इतर चार सदस्य

असतात. हे चार सदस्य सार्वजनिक व्यवहार किंवा प्रशासकीय अनुभव घेतलेले असतात. यामध्ये एक महिला सदस्य असते. दहा कोटी व त्या पेक्षा जास्त भरपाईचा दावा करण्याच्या तक्रारीचे निवारण येथे केले जाते.

## स्वाध्याय

**I. योग्य शब्द भरून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

1. सामान्यपणे विक्रेते आणि खरेदी करणारे वस्तूची खरेदी विक्री करण्यासाठी जेथे जमतात त्या जागेस ___________ म्हणतात.
2. एकद्या विशिष्ट भौगोलिक प्रदेशात जो बाजार भरला जातो त्यास _____ म्हणतात.
3. खरेदी आणि विक्री बाजार ___________ कायद्याद्वारे नियंत्रित केले जातात.
4. उत्पादनाची वेळ आणि विक्रिची वेळ यामध्ये वस्तू जेथे साठवून ठेवतात त्या जागेस ___________ म्हणतात.
5. ग्राहकांनी उत्पादित केलेल्या वस्तू विकत घ्याव्यात. म्हणून ज्या क्रिया केल्या जातात त्यास ___________ चे मिश्रण म्हणतात.
6. उत्पादकाकडून प्रत्यक्षरित्या ग्राहकाला मिळणारी वस्तू याचे उत्तम उदाहरण म्हणजे ___________ .
7. उत्पादनाची व्यापारी खूण त्या गठ्ठ्यावर उमटवलेली असते. त्यातून ___________ सूचित होते.
8. वस्तूच्या गुणवत्तेच्या दर्जाची खात्री ग्राहकाला मिळते त्यास _____ म्हणतात.

**II. खालील प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे द्या.**

9. भौगोलिक दृष्ट्या आधारित बाजाराचे चार प्रकार कोणते?
10. मनी मार्केट म्हणजे काय? कॅपिटल मार्केट पेक्षा ते कसे वेगळे आहे?
11. उत्पादकांची बाजार म्हणजे काय? ग्राहकांची बाजारपेठ म्हणजे काय?
12. स्थानिक बाजारपेठ म्हणजे काय? भविष्यकालीन बाजारपेठापेक्षा हे वेगळे कसे आहे?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

13. अपारंपारिक बाजारपेठचे चार प्रकार वर्णन करा.

14. विक्री व्यवस्थापनाचे मिश्रण म्हणजे काय?

15. ग्राहक संरक्षणाची गरज का आहे?

16. वस्तूंचे व्यापारी चिन्ह खूण म्हणजे काय?

**III. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.**

17. विक्री व्यवस्थापनाची कार्ये सांगा. त्यापैकी कोणतेही एक कार्य स्पष्ट करा?

18. विक्री व्यवस्थापन मिश्रणाचे घटक कोणते? त्यापैकी एकावर टिपा लिहा?

19. विक्री व्यवस्थापनाचे महत्त्व काय? राहणीमानाचा दर्जा आणि नोकरीच्या संधीमध्ये त्यांची कशी मदत होते?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**IV. उपक्रम**

1. कोणत्याही दहा वस्तू गोळा करा आणि त्यांचा तपशील खालील रकान्यात भरा.

| क्र.सं. | उत्पादनाचे नाव | तपशील | उत्पादनाची तारीख, मुदत संपण्याची तारीख (Date of expiry) वस्तुची किंमत (MRP) |
|---|---|---|---|
| | | | |

2. ग्राहकांच्या शोषणाविषयी वृतपत्रात आलेली माहिती संग्रहित करा. ग्राहक संरक्षण कायद्यानुसार त्याला कशाप्रकारे नुकसान भरपाई देता येईल ते लिहा.

***